
## जपुजी साहिब

साधकांनी गुरू नानकदेवांना विचारले,
"किव कूडै तुटै पालि?" व
"किव सचिआरा होईये?" आम्ही कशा रितीने मोहमायेच्या पाशातून मुक्त होऊ व प्रभू कृपेस पात्र होऊ? नानकदेव म्हणतात. "हुकमि रजाई चलणा" परमेश्वराच्या आज्ञे प्रमाणे (इच्छे प्रमाणे) जीवन व्यतीत करा. साधकाच्या मनात प्रश्न आला. "ह्या परमेश्वराचे स्वरूप काय? तो कोठे राहतो? त्याचा दरबार कसा आहे? त्याने ही सृष्टी का व केव्हा उत्पन्न केली? ह्या सृष्टीचे व्यवहार कसे चालतात? जीवांच्या भरण पोषणांची व्यवस्था त्याने कशी केली आहे? आम्ही कोणत्या मार्गाने गेलो असता प्रभु कृपेस पात्र होऊ? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नाम जपाचा व नाम श्रवणाचा मार्ग ३८ पायऱ्याचा सोपान गुरू नानकदेवांनी साधकास दिला आहे.
त्या साठी वाचा

**"जपुजी साहिब" मराठी भावानुवाद.**



## सब सिखन को हुकम है, गुरू मानियो ग्रंथ



श्री गुरूग्रंथ साहिब मध्ये अंकित गुरूंची वाणी



श्रीगुरू नानकदेवजी
(सन १४६९-१५३९)



श्रीगुरू अंगददेवजी
(सन १५०४-१५५२)



श्रीगुरू अमरदासजी
(सन १४७९-१५७४)



श्रीगुरू रामदासजी
(सन १५३४-१५८१)



श्रीगुरू अरजनदेवजी
(सन १५६३-१६०६)



श्रीगुरु तेग़बहादरजी
(सन १६२१-१६७५)

गुरू नानकांची वाणी

# जपुजी साहिब

(मराठी भावानुवाद)


अनुवादक
विनायक लिमये
तारासिंह गोरोवाडा



प्रकाशक
तारासिंह गोरोवाडा
सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे.
फोन: (नि.) २४३७५२९६,
मो. ९८२२८६७७७८

प्रकाशक :
तारासिंह गोरोवाडा
सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे
सर्व्हे नं. ३७/१२ अ/ब, धनकवडी, पुणे ४३.

© सर्व हक्क प्रकाशकांचे आधीन

अक्षरजुळणी :
श्री. काळूराम खिलारे
सागर आर्टस्
४/२, एरंडवणा गावठाण,
पुणे ४११ ००४.

मुखपृष्ठ :
संजीव पेठकर
(SAD डिजिटल)

छपाई :
साई टाईप सेटिंग सर्व्हीस
डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स,
सी/४, शॉप नं. १८, शनिवार पेठ, पुणे ३०.

प्रथमावृत्ती : ऑगस्ट २००४
चतुर्थ आवृत्ती : ऑक्टोबर २००६

टीप : गुरुवाणी ही ईश्वरीय वाणी आहे. तिचे मुल्य रुपये पैशात करता येत नाही. आम्ही हे पुस्तक गुरूसेवा म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. त्यामागे आर्थिक लाभाचा लवमात्र उद्देश नाही म्हणून अत्यल्प किंमतीत हे पुस्तक आम्ही आपणास देत आहोत. त्याचा योग्य आदर व्हावा ही विनंती.

मूल्य : प्रेम आणि श्रद्धा. प्रति : १०००

## अनुक्रम

| | |
|---|---|
| प्रस्तावना | १ |
| अनुवादकाचे मनोगत | ५ |
| प्रकाशकीय | ७ |
| गुरू नानक देवजी यांचे संक्षिप्त चरित्र | ९ |
| जपुजी साहिबची जन्मकथा व रचना | १३ |
| जपुजी साहिब (भावानुवाद) | १५ |
| समारोप | ७१ |
| अभिप्राय | ७५ |

## सूचना

पंजाबी भाषेत शब्दाच्या शेवटी
व्यंजनास जर ऱ्हस्व इ अगर ऱ्हस्व उ हा
स्वर लागला असेल तर त्या स्वराचा
उच्चार होत नाही
उदा. <u>उपरि</u> वाचताना <u>उपर</u> असे
वाचावे <u>पवनु</u> हे <u>पवन</u> असे वाचावे

# सिख धर्मप्रचार कमिटी पुणे यांचे

## विनम्र आवाहन

श्री गुरु ग्रंथ साहिब व त्यातील उपदेश हा केवळ सिख समाजापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण मानव जातीसाठी आहे. गुरुजींची वाणी सर्वांपर्यंत पोचावी व हे अमृत सर्व मानवास चाखावयास मिळावे म्हणून आम्ही - **'सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे'** ही संस्था स्थापन केली आहे.

सिखांचा इतिहास देशभक्तीने रसरसलेला, मानवतावादाने नटलेला, त्यागाने व गुरुदेवांच्या बलिदानाने भरलेला आहे. हा इतिहास मुडद्यांमध्येही स्फुरण निर्माण करतो. पण दुर्दैवाने ही गोष्ट आमच्या मराठी बांधवांना क्वचितच माहित असते.याला आम्ही सिख बांधवच जबाबदार आहोत. कुराण, बायबल यांचे मराठी अनुवाद उपलब्ध आहेत पण श्री गुरु ग्रंथसाहिबजीचा मराठी अनुवाद अद्याप उपलब्ध नसावा ही मोठी खेदाची गोष्ट आहे. म्हणून **'सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे'** या न्यासाने हे काम हाती घेतले आहे.

हे कार्य अत्यंत कष्टाचे, जिकिरीचे व खर्चाचे आहे. याची आम्हास जाणीव आहे.

सर्व सिख बांधवास विनम्र आवाहन आहे की या कामी आपले सक्रीय सहकार्य मिळावे. आपण सर्वांनी मिळून हे कार्य पूर्णत्वास नेऊन गुरुवाणीचा कल्याणकारी संदेश मराठी बांधवांपर्यंत पोचवू या.

**तारासिंह गोरोवाडा**
सिख धर्मप्रचार कमिटी करिता

सूचना : आर्थिक सहाय्य चेक, ड्राफ्ट, मनीऑर्डरने **'सिख धर्म प्रचार कमिटी'** या नावे काढून ह्या पत्त्यावर पाठवावे.

**'सिख धर्म प्रचार कमिटी'**
१०३७ धनकवडी, पुणे ४११ ०४३.

## प्रस्तावना

'जपुजी साहिब' म्हणजे गुरू नानकदेवांच्या अमृतवाणीचा मराठी भावानुवाद होय. गुरू नानकदेवांची सर्व पदे ही गुरू ग्रंथसाहिब या ग्रंथात संग्रहीत झाली आहेत. 'जपुजी' ही त्यांची सर्वात मुख्य रचना होय. तिच्यातून त्यांच्या अनुभूतीचे चिंतन आणि उपदेश अभिव्यक्त झाला आहे. गुरू नानकदेवांच्या जीवन चरित्रात साधुत्व, संतत्व, प्रतिभा आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम झाला आहे. अगदी लहानपणाची गोष्ट. पंडित गोपाळ पांडे नावाचे गुरुजी त्यांना शिकवायला येत. त्याचवेळी त्यांनी आपली भूमिका मांडताना म्हटले होते,

**''जालि मोहु घसि मसु करि मति कागद करि सारु करि चित्तु लिखारी गुरू पुछि लिखु विचारु'** - ''हे चित्तरूपी लेखका, मोहाला जाळून त्यागरूपी शाई बनव. मग बुद्धिरूपी कागदावर प्रेमरूपी लेखणीने सत्याचे विचार लिही.''

पुढे हेच सत्याचे विचार त्यांच्या अमृतवाणीतून बाहेर पडले ते जपुजीच्या रूपात. आपल्या चारही उदासी म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी आणि लोकांना प्रभूमार्गाचा बोध देण्यासाठी केलेल्या पदयात्रा संपवून रावी नदीच्या तीरावर करतारपूर येथे गुरुनानकदेव स्थायिक झाले आणि तेथे त्यांनी धर्मपीठ स्थापन केले. एके दिवशी काही बैराग्यांचा एक जथा - नानकदेवांची कीर्ती ऐकून कर्तारपूरला आला आणि 'नानकदेवांनी आम्हाला उपदेश करावा'' अशी विनंती केली. त्यानंतर नानकदेवांनी पूर्वी उदासीमध्ये सुमेर पर्वतावर, सिद्ध पुरुषांच्या सान्निध्यात झालेल्या चर्चेचे साररूप असलेली 'जपुवाणी' कथन केली. त्यातून जीवनाचे तत्त्व तसेच विश्वाचे आणि परमात्म्याचे स्वरूप सांगितले आणि नीतिबोधाचा उपदेश केला. तोच उपदेश म्हणजे 'जपुजी साहिब' होय. गुरुनानकदेवांच्या अंतरमनातून प्रगटलेले आणि चिंतनातून व्यक्त झालेले हे विचार गुरू ग्रंथ साहिबच्या अग्रस्थानी विराजमान

झाले आहेत. भक्तांची आर्तता पाहून गुरुनानकदेवांनी आत्मउद्धारासाठी आणि ईश्वरप्राप्तीसाठी 'जपुजी साहिब' ही ३८ पायऱ्यांची शिडी भक्तांना दिली. पंजाबीमध्ये पायरीला 'पउडी' असे म्हटले जाते. प्रत्येक रचना ही एक पउडी आहे. आणि प्रत्येक पउडीचा उपदेश ग्रहण करून आत्मिक जीवनाची एकेक पायरी चढत चढत उन्नत अवस्था गाठायची आहे. अशा ३८ पउडींचा म्हणजेच रचनांचा शुद्ध आणि सोपा मराठी अनुवाद प्रस्तुतच्या ग्रंथात श्री. विनायक लिमये आणि तारासिंह गोरोवाडा यांनी केला आहे. गुरुनानकदेवांचे विचार मराठी भाषिकांसमोर मांडणे हाच त्यातील प्रधान हेतू आहे. शिख संप्रदायाचे सर्व धार्मिक वाङ्मय हे गुरुमुखी लिपीत आणि तत्कालीन पंजाबी भाषेत आहे. ते सोप्या आशयपूर्ण आणि सुलभ मराठीमध्ये सांगितल्यास गुरुनानकदेवांचे विचार आणि महाराष्ट्रातील संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत तुकारामादी संत परंपरेचे विचार यात केवढे विलक्षण साम्य आहे हे लक्षात येते. श्री. लिमये आणि श्री. गोरोवाडा यांनी हे काम अतिशय निष्ठेने आणि प्रयत्नपूर्वक केले आहे. श्री. लिमये हे संत साहित्याचे उपासक आहेत. तर श्री. तारासिंह हे उत्तम शाहीर आहेत. अनेक पुरूषार्थ प्रधान रचना करून त्यांनी मराठी शाहीरी परंपरेतही आपल्या शाहिरीचा वेगळा ठसा उमटविला आहे. दोघांकडेही चांगली प्रतिभा आहे. विचारांची दिशा आहे म्हणूनच प्रत्येक पउडी म्हणजे रचनेतील प्रत्येक शब्दाला मराठीतील पर्यायी शब्द देऊन, त्यातील सरळ भावार्थ मांडून त्याखाली प्रत्येक पदावर स्वतंत्र चिंतन लिहून त्यांनी जपुजी साहिब मधील पदांचे एक सुंदर निरूपणच घडविले आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लेखनामागची भूमिका मांडताना लिहिले आहे,

*तैसा वाग्विलासू विस्तारू।*
*गीतार्थेसी विश्व भरू।*
*आनंदाचे आवारू*
*मांडू जगा॥*

वाणीच्या विलासाचा विस्तार करू. गीतार्थाने विश्व भरून टाकू आणि संपूर्ण जगात आनंदाचा वर्षाव करू. गुरुनानकदेवांनीही म्हटले आहे की, "**नानक नाम चढदी कला, तेरे भाने सरबत दा भला**" परमेश्वरा तुझ्या नामाचा सतत जयजयकार व्हावा आणि तुझ्या कृपेने सर्व जगाचे कल्याण होऊन सर्वांवर आनंदाचा वर्षाव व्हावा. संतांच्या वाङ्मय रचनेचे मुख्य प्रयोजन म्हणजे आनंदाची प्राप्ती



**होय. गुरुनानकदेवांनीही जपुजी मधून परमात्मा, सृष्टीक्रम, अहंकार, माया, जीव, आत्मा, मनुष्ययोनीचे श्रेष्ठत्त्व, ईश्वरप्राप्तीचा मार्ग, सद्गुरू संकल्पना, नाम, परमात्म्याशी मीलन ह्या साऱ्या गोष्टींचे चिंतन करून सात्त्विक आनंदाचाच अविष्कार घडविला आहे. गुरुनानकदेवांच्या जपुजीमधील पदांचे मराठी गद्य भाषांतर करून श्री. लिमये आणि श्री. तारासिंह गोरोवाडा यांनी गुरुनानकदेवांच्या वाणीला रसाळ मराठीचा साज चढवून महाराष्ट्र सारस्वतात एका आगळ्यावेगळ्या वाङ्मय रचनेची भर घातली आहे. त्यांच्या ह्या वाङ्मय सेवेच्या कार्यास माझ्या शुभेच्छा.**

**– डॉ. रामचंद्र देखणे**
**सी ३/४ डी एस् के चिंतामणी**
**५१३ शनिवार पेठ, पुणे ३०**

**गुरुपौर्णिमा शके १९२६**
**२/७/२००४**

सरदार तारासिंघ गोरोवाडा व परिवार

यांचेकडून

स्व. इंदर कौर गुरांदित्तामल गोरोवाडा (आई)

स्व. रामप्यारी सुरजनसिंघ गोरोवाडा (वहिनी)

स्व. स. जगतसिंघ गुरांदित्तामल गोरोवाडा (भाऊ)

स्व. शीलावंती जगतसिंघ गोरोवाडा (वहिनी)

स. जीतसिंघ गुरांदित्तामल गोरोवाडा (भाऊ)

यांचे स्मरणार्थ

ह्या आवृत्तीच्या प्रकाशनाचा

सर्व खर्चासाठी देणगी दिली.

सिख धर्म प्रचार कमिटी त्यांचे

आभारी आहे.



## अनुवादकाचे मनोगत

ईश्वरी लीला अतर्क्य आहे. माझे हातून गुरू नानकदेव रचित 'जपुजी साहिब'चा मराठी भाषेत अनुवाद होईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. पण आज तसे घडले आहे. त्या प्रभू परमात्म्याने ते प्रत्यक्ष घडवून आणले आहे. म्हणून म्हणतो, ईश्वरी लीला अतर्क्य आहे.

हे कसे घडले? हे असे घडले. पुण्यातील सुखसागर सांस्कृतिक मंडळाने स्वामी विवेकानंद स्मृतिशताब्दि निमित्त 'सर्व धर्म समादर परिषदेचे' आयोजन केले होते. त्यात पुण्यातील सरदार तारासिंह गोरोवाडा यांनी शिख संप्रदायाचे विवेचन केले. त्यातून श्री गोरोवाडांचा व माझा परिचय वाढत गेला. सर्व धर्म समादर परिषदेत असा एक विचार मांडला गेला की सर्व धर्मांचा अभ्यास करावा. त्यातील समान विचार जनतेसमोर मांडावेत व त्यातून साऱ्या भारतीयांमध्ये एकात्मतेचा भाव निर्माण करावा. शिख संप्रदायाचा एकमेव धर्मग्रंथ, 'श्री गुरू ग्रंथसाहिब', त्याचा अभ्यास केला तर शिख संप्रदायाच्या अध्यात्मिक विचारांची आपणास ओळख होऊ शकेल असे वाटल्यावरून श्री गुरू ग्रंथ साहेबचा मराठी अनुवाद उपलब्ध आहे का असे मी श्री गोरोवाडा यांना विचारले. पण तसा मराठी अनुवाद उपलब्ध नसल्याचे त्यांनी मला सांगितले.

महाराष्ट्रात शिख संप्रदायाचे अनुयायी बरेच आहेत. महाराष्ट्रातील गोदावरी तीरावर मराठवाड्यात वसलेले 'नंदीग्राम' म्हणजेच 'नांदेड' हे शहर शिख संप्रदायातील दहावे गुरू गोबिंदसिंह यांच्या वास्तव्याने पुनित झाले आहे. ह्याच ठिकाणी 'गुरूद्वारा सचखंड साहिब' हे शिख संप्रदायाचे पवित्र स्थान व धर्मपीठ आहे. असे असूनही मराठी माणसास शिख संप्रदायाची म्हणावी अशी ओळख नाही. श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये मराठी संत श्री नामदेव महाराज यांच्या एक दोन नव्हे तर तब्बल ६१ रचनांचा समावेश आहे. म्हणजे तेराव्या शतकापासून मराठी वारकरी संप्रदायाची पंजाबशी व पुढे शिख संप्रदायाशी नाळ जोडली गेली आहे. असे असूनही शिख संप्रदायाच्या अध्यात्म विचाराशी मात्र मराठी माणूस अपरिचित असावा हे दुर्दैव होय. असे का घडावे?

शिख संप्रदायाचे सर्व धार्मिक वाङ्मय गुरुमुखी लिपीत व तत्कालिन पंजाबी भाषेत आहे व त्याचा मराठीत अनुवाद झालेला नाही. भारतोत्भव वैदिक, बौद्ध, जैन संप्रदायांचे धार्मिक वाङ्मय मराठीत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. येवढेच नव्हे तर खिश्चन, इस्लाम पंथियांचे धर्मग्रंथ बायबल, कुराण, यांचे ही मराठी अनुवाद उपलब्ध आहेत. पण शिख धर्मग्रंथ 'श्री गुरूग्रंथ साहिब' याचा मात्र मराठीत अनुवाद नसावा हे खेदजनक आहे. त्यामुळेच मराठी माणूस शिख धर्मविचार जाणण्यास पारखा झाला आहे. अशी आमची चर्चा चालत असे.

एक दिवस श्री गोरोवाडा माझ्याकडे काही कागद घेऊन आले. 'जपुजी साहिब'च्या काही पद्यांचा तो मराठी अनुवाद होता. त्यातील मराठी हे पंजाबी ढंगाचे मराठी होते. मराठी माणसाला समजेल, आवडेल अशा भाषेत ते लिहिण्याची त्यांनी मला विनंती केली. त्यासाठी त्यांनी मला अनेक पुस्तके संदर्भासाठी आणून दिली. त्यात 'जपुजी साहिब'चा हिंदी अनुवाद दिला होता. अन्यही उपयुक्त माहिती त्यात होती. मग सुरू झाल्या आमच्या बैठका. रोज एकत्र बसावे एकेका पउडीचा पंजाबीतून हिंदीत अनुवाद वाचावा त्याला योग्य मराठी प्रतिशब्द शोधावे. वाक्य रचना ठरवावी व त्या पउडीचा भावानुवाद लिहावा असा क्रम सुरू झाला.

जपुजी साहिबच्या मराठीकरणाची मूळ कल्पना तारासिंहजींची, त्याचे मराठी सादरीकरण माझे. अशी ही आम्हा दोघांची संयुक्त साहित्य कृती आहे. हे वाचकांनी जाणून घ्यावे. हा 'जपुजी साहिब'चा भावानुवाद कितपत जमला आहे हे वाचकांनीच ठरवावयाचे आहे. निदान शिख संप्रदायाच्या अध्यात्मिक विचाराशी मराठी माणसाची ओळख व्हावी हा उद्देश सफल झाला तरी आम्ही समाधानी आहोत. सरदार तारासिंह गोरोवाडा यांनी मला ही संधी दिली त्या बद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

प्रभू परमेश्वराने माझेकडून ही सेवा करवून घेतली ह्या बद्दल मी त्याचाही ऋणी आहे अशीच सेवा माझे कडून करवून घ्यावी ही प्रभू चरणी विनम्र प्रार्थना!

॥ हरी ॐ तत् सत् ॥

– वि. ना. लिमये



## प्रकाशकीय

'जपुजी साहिब'चा मराठी भावानुवाद प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे. बरेच दिवस मनात जपलेले एक स्वप्न साकार झाल्याचे समाधान वाटत आहे.

गेले ५० वर्षाहून अधिक काळ मी पुण्यात वास्तव्य करून आहे. माझ्या असे लक्षात आले की आमच्या मराठी बांधवांना शिखांचा इतिहास माहीत असतो. पण, शिख धर्माचा अध्यात्म विचार अभावानेच माहीत असतो. याचे कारण गुरु ग्रंथसाहिब मधील विचार मराठी भाषेत अनुवादित झालेले नाहीत. ह्याला खरं तर आम्ही शिख बांधवच जबाबदार आहोत. भारतोद्भव (हिंदू, जैन, बुद्ध) व भारता बाहेरील (ईस्लाम व ख्रिस्ती) धर्माचे धर्म ग्रंथ मराठीत अनुवादित झाले आहेत. पण, गुरु ग्रंथसाहिबचा मराठीत अनुवाद उपलब्ध नाही. त्यामुळे असा अनुवाद केला पाहिजे, असे मनात सतत येत होते. गणेश पेठ पुणे येथील गुरुद्वाराचे ग्यानीजी ग्यानी बलवंतसिंह खालसा यांच्या प्रोत्साहनाने जपुवाणीच्या मराठी अनुवादाचे काम सुरू केले.

ईश्वरी लीला अगाध आहे. याचवेळी श्री लिमयेकाकांचा व माझा परिचय झाला. तो क्षण माझ्या जीवनातील परमसौभाग्याचा क्षण होता. त्यांच्या सक्रीय सहकार्यानेच जपुवाणीचा मराठी भावानुवाद मी आज प्रकाशित करू शकत आहे. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या ग्रंथास माझे मित्र डॉ. रामचंद्र देखणे यांनी सुंदर प्रस्तावना लिहून आम्हास उपकृत केले आहे. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र आळंदी येथील पू. श्री संत किसनमहाराज साखरे यांनी अभिप्राय लिहून आम्हास आशीर्वाद दिले. याबद्दल आम्ही त्यांचे प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. या ग्रंथाची अक्षरजुळणी व मुद्रणप्रत तयार करण्यासाठी

श्री. काळूराम खिलारे, श्री संजय पेठकर (Sad digital) यांनी सुंदर मुखपृष्ठ तयार करून दिले. साई टाईपसेटिंग यांनी ग्रंथ छपाईचे काम सुबकपणे केले. सौ. माधवी जोशी यांनी मुद्रण संशोधनाचे काम केले. याबद्दल या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

वाचकहो, ह्यापूर्वीही गुरु ग्रंथसाहेबचा मराठी अनुवाद करण्याचे प्रयत्न झाले आहेत. सन् १९६७ मध्ये सरदार ईश्वरसिंघ ठाकूर यांनी 'श्री गुरुवाणी विलास' हा ग्रंथ लिहून सुरुवात केली होती. तसेच सरदार प्रीतमसिंह जुनेजा यांनी ही असा प्रयत्न केला होता. परंतु ह्या दोनही महान् व्यक्तींच्या अकाली निधनाने हे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यांचे अपूरे राहिलेले काम आम्ही पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी परमेश्वराने आम्हास शक्ती द्यावी व आमचेकडून हे काम पूर्ण करून घ्याने ही प्रभूचरणी नम्र प्रार्थना.

वाचकहो, संपूर्ण गुरु ग्रंथसाहिबचा मराठी अनुवाद करणे, हे काम साधे नाही, सोपे नाही. तसेच ते खूप खर्चिकही आहे व त्याची आम्हास जाणीव आहे. त्यासाठी सर्व समाजबांधवांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. शिख समाजात असे अनेक विद्वान लोक आहेत की जे हा अनुवाद आमच्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने चांगला करू शकतील. अशा बांधवांनी हे एक पवित्र कार्य समजून आम्हास निरपेक्ष सहकार्य करावे असे आम्ही आवाहन करतो. ह्या कामासाठी आम्ही सिख धर्मप्रचार कमिटी पुणे ही संस्था स्थापन केली आहे. तसेच दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन ग्रंथ प्रकाशनास सहाय्य करावे, ही नम्र विनंती.

**तारासिंह गोरोवाडा**
प्रकाशक



# गुरु नानक देवजी यांचे संक्षिप्त चरित्र

'जपुजी साहिब' ज्याचा भावानुवाद आपण पुढे वाचणार आहोत ती, गुरू नानक देवांची रचना आहे. श्रीगुरू ग्रंथ साहिब मध्ये त्याची अग्रभागी योजना केली आहे. ह्यावरून त्याचे श्रेष्ठत्त्व व महत्त्व आपले ध्यानी येईल. गुरू नानक देवांची अध्यात्मिक बैठक जाणून घेतल्यास, नानक देवांची विचार पद्धती जाणून घेतल्यास जपुजी साहिबचा अर्थ समजून घेणे अधिक सोईचे होईल असे वाटल्यावरून गुरू नानक देवांचे संक्षिप्त चरित्र येथे प्रस्तुत करत आहोत.

गुरू नानक देवांचा जन्म कार्तिक शु. १५ संवत १५२६ (इ. स. १४६९) रोजी पूर्वीच्या पंजाब प्रांतात (वर्तमान पाकिस्तान) तलवंडी गावी (आता ते गाव नानकानासाहिब म्हणून ओळखले जाते) बेदी कुलात झाला. वडिलांचे नाव कल्याण दास उर्फ कालू मेहता व आईचे नाव तृप्तादेवी. त्यांच्या मोठ्या बहिणीचे नाव नानकी असे होते.

नानकास लहानपणापासून शालेय शिक्षणात रस नव्हता. व्यवहारिक शिक्षणातही रस नव्हता. तो बहुतेक वेळ कसल्यातरी विचारात गढल्याप्रमाणे गंभीर व अबोल असे. साधुसंतांच्या, गोसावी बैराग्यांच्या संगतीत मात्र त्यांचे मन रमे. काळू मेहतांनी नानकाला संस्कृत शिकण्यासाठी ब्रजलाल पंडितांकडे तसेच मौलवी कुतूबुद्दीन यांचेकडे पारशी शिकण्या करता पाठवले. पण त्यात नानक रमले नाहीत. त्याने व्यापार उमीद शिकावा म्हणून कालू मेहतांनी वीस रुपये देवून सोबतीस एक नोकर देवून जवळच्या चुहडकाणा गावी खरेदीस पाठवले व सांगितले की, "बाळा, खरा लाभदायक सौदा करून ये." नानकांना वाटेत साधूंचा एक तांडा भेटला. ते साधू बरेच दिवसांचे उपाशी असावेत अशी त्यांची चर्याच सांगत होती. पण तरीही ते ईश्वर भजनात रंगून गेले होते. नानकाने जवळच्या वीस रुपयातून त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली. नानक रिकाम्या हाताने घरी परतलेले पाहून

वडिलांना अत्यंत राग आला. रागाच्या भरात त्यांनी नानकला मारलेही. तेव्हा नानक म्हणाले, "साधूसंतांच्या सेवेपेक्षा अधिक लाभदायक खरा सौदा कोणता?" तेव्हा काल्‍ू मेहतांच्या लक्षात येवून चुकले की नानक व्यवहारिक जीवन जगण्यास अयोग्य आहे. ते निराश झाले.

पण नानकाच्या अंगी लोकविलक्षण गुण आहेत, प्रतिभा आहे ह्याची जाणीव त्यांची थोरली बहीण बेबे नानकी हिला होती. ती नानकला आपल्या गावी सुलतानपूरला घेवून आली. येथे मात्र नानक काहीसा रमला. बेबे नानकीचे पती जयराम यांनी नानकची सुलतानपूरच्या नबाबाकडून मोदीखान्यात धान्य गोदामात मापाडी म्हणून नेमणूक करून घेतली. नानक कामात अत्यंत चोख होता. त्याची सचोटी व कामाचा उरक पाहून नबाब नानकावर खूष होता. नानकाचे लग्न केल्यास तो संसारात पूर्ण रमेल असे वाटून बेबे नानकीने त्यांचा विवाह सुलखणादेवीशी ठरवला (जेष्ठ २० संवत १५४४). पुढे संवत १५५१ मध्ये बाबा श्रीचंद व संवत १५५४ मध्ये बाबा लखमीचंद असे दोन सुपुत्रही या दांपत्यास प्राप्त झाले.

नबाबाचे धान्य कोठारात काम करत असताना एकदा नानकांचा द्वेष करणाऱ्या मंडळींनी नबाबांकडे चुगली केली की नानक गरीबांना नबाबांचे धान्य फुकट देऊन टाकत आहे. नबाबाने हिशोब तपासले. एक अश्रफीचाही घोळ आढळला नाही. प्रकार असा होता की नानक आपला संसार अत्यंत काटकसरीने चालवत व पगारातील फार मोठी रक्कम शिल्लक टाकत. ह्या रकमेतून गोरगरीबांना वाटलेल्या धान्याच्या किमतीची भरपाई सरकारी खजिन्यात करत. हे समजल्यावर नबाबांची त्यांच्यावरील श्रद्धा दृढ झाली.

बेबे नानकींना आता हायसे वाटू लागले. आपला भाऊ नानक आता संसारात रमला असे वाटून बेबे नानकींनी सुटकेचा निःश्वास सोडला. पण कसले काय? नानक परत एकदा अंतरमुख झाले. दिवसेंदिवस ते परत एकदा अधिक गंभीर होऊ लागले, अबोल होऊ लागले, विचारात मग्न होऊ लागले.

एक दिवस नानक जवळच्या वई नदीवर स्नानासाठी गेले. बरोबर एक नोकर होता. त्याचे जवळ कपडे दिले व त्यांनी नदीत उडी मारली. बराच वेळ झाला नानक वर येईनात. तासामागून तास गेले, नानक कोठेच दिसेनात. हे पाहून नोकर घाबरून गेला. शेवटी घरी जावून त्याने झाला प्रकार बेबे नानकी व जयरामजी यांचे कानावर घातला. जयरामजींनी ही खबर सुलतानपुरचे नबाबांचे कानावर घातली. त्याने ताबडतोब आपले सैनिक नदीचे परिसरात नानकांचा तपास करण्यासाठी



पाठवले. कोळी लोकांनीही नदीचे पात्र दूरपर्यंत धुंडाळले. पण नानकांचा तपास काही लागला नाही. सर्वजण निराश होऊन घरी परत आले. तीन दिवसानंतर नानक एका उन्मनी अवस्थेत घरी परत आले. त्यांच्या तोंडी एकच वाक्य होते. 'न कोई हिंदू, न कोई मुसलमान.'

नानक देव हे तीन दिवस कोठे होते ते कोणासही माहित नाही. पण ह्या तीन दिवसातील तपःसाधना ही नानकच्या परिवर्तनास कारणीभूत ठरली. ह्याच वेळी त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला व दिव्य अनुभूती प्राप्त झाली. बोधी वृक्षाखाली सिद्धार्थ गौतमास ज्ञान प्राप्त झाले व तो गौतम बुद्ध झाला. रामकृष्णांच्या परमशिष्यास, नरेंद्रास कन्याकुमारी येथील त्या त्रीसागर संगमातील श्रीपाद शिलेवरील तीन अहोरात्र केलेल्या तपाअंती आपले जीवीत ध्येय गवसले. तसेच येथेही घडले असावे. ह्या तीन दिवसाच्या तपश्चर्येनंतर कालू मेहतांचा नानक - धर्मसंस्थापक गुरू नानकदेव झाले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आता नानकांचे चित्त संसारातून पूर्णपणे विरक्त झाले. काही एक निश्चय मनाशी झाला. नानकाने सर्वसंग परित्याग करून गृहत्याग केला व लोककल्याणासाठी बाहेर पडले. (संवत १५४४) अशाप्रकारे जगाच्या व्यवहाराप्रती उदास होऊन ईश्वरप्राप्तीसाठी केलेल्या पर्यटनास पंजाबीत 'उदासी' असे म्हणतात. सं. १५४४ मध्ये गृहत्याग केल्यावर सं १५६५ मध्ये नानक घरी परत आले. त्यांनी चार वेळा भ्रमण केले. यात त्यांनी जवळजवळ दोन तपे म्हणजे २४ वर्षे घालवली. त्यात त्यांनी पूर्ण भारतवर्षाचे परिभ्रमण केले एवढेच नव्हे तर सिलोन, चीन, तिबेट या बौद्ध देशांचा व अफगाणिस्तान, अरबस्तान, इराक, इराण, तुर्कस्तान आदी मुस्लिम देशांचाही प्रवास केला व सर्व धर्मांचे ज्ञान प्राप्त केले. भारतीय संतामध्ये येवढ्या प्रदीर्घ व विस्तृत मुलुखांचे परिभ्रमण कोणी केल्याचे आढळत नाही.

सं. १५८८ मध्ये ते कर्तारपूरला येवून स्थाईक झाले. तेच त्यांनी आपले धर्मपीठ बनवले व तेथे राहून ते धर्मप्रचार करू लागले. हिमालयाकडे जाणारे साधू, संन्यासी, गोसावी, बैरागी, यात्रेकरू यांचे मार्गावर कर्तारपूर येते. येथून जाणाऱ्या सर्व लोकांची सेवा घडावी, त्यांच्या निवासाची, भोजनाची सोय व्हावी म्हणून त्यांनी कर्तारपूरला लंगर सुरू केला. येथे कोणासही मज्जाव नसे. हिंदू, मुसलमान, गरीब, अमीर, स्पृश्य, अस्पृश्य सर्व समान. सर्व एका पंगतीत बसून भोजन करीत, सर्व समानतेचा हा वस्तुपाठच होता. ह्याची सर्व व्यवस्था त्यांचे शिष्य लहणाजी (की जे पुढे त्यांचे अध्यात्मिक वारस, शिखांचे दुसरे गुरू - गुरू अंगददेव म्हणून घोषीत केले गेले.) पहात असत. 'संगत' व 'पंगत' ही शीख

धर्माची खास विशेषता आहे.

संवत १५९६ मध्ये गुरू नानक देवजींनी या इहलोकाचा निरोप घेतला व ते ब्रह्मतत्त्वात विलीन झाले.

### गुरूदेव नानकांचा अध्यात्म विचार

संवत १५४४ मध्ये वई नदीमध्ये ३ दिवस नानकांनी जी जलसमाधी घेतली होती त्यावेळी त्यांना आत्म साक्षात्कार झाला व आपल्या जीवित कार्याचे ज्ञान झाले, हे आपण वर पाहिलेच आहे. तेव्हांपासून त्यांनी जो विचार समाजापुढे ठेवला तो असा की "ना कोई हिंदू, ना कोई मुसलमान। सब है एक ही ईश्वर के संतान" ईश्वर एक आहे. सृष्टीचा रचयिता, सृष्टींचा पालनकर्ता परमेश्वर एकच आहे. सृष्टी मध्ये जे काही घडत आहे, ते त्याच्याच इच्छेने. माणसाने हे जाणावे. माणूस जे काहीं करतो ते खरोखर परमेश्वराचे इच्छेने घडत असते, माणसाच्या नव्हे. म्हणून 'मी करतो' हा अहंकार सोडून माणसाने प्रभूच्या इच्छेप्रमाणे आपले जीवन व्यतित करावे. त्या परमेश्वरास जाणण्याचा प्रयत्न करावा व अंती त्याच्याशी एकरूप होऊन जावे. हेच जीवनाचे सार्थक होय. 'जपुजी साहिब' मध्येही हेच सांगितले आहे. कसे ते आपण पुढे पाहणारच आहोत.

* *



## जपुजी साहिबची जन्मकथा व रचना

जपुजी साहिबची रचना गुरू नानकदेवांनी केंव्हा केली? कोणास ती ऐकवली? हा उपदेश कोणास केला? वगैरे प्रश्न मनात उत्पन्न झाले. त्यांचा शोध घेता असे वाचनात आले की गुरू नानकदेवजी आपल्या तिसऱ्या उदासी (परिक्रमा) मध्ये सुमेरू पर्वतावर गेले असता तेथे त्यांना हे काव्य स्फुरले.

आणखी एक कथा असे सांगते की –

आपल्या चारही उदासी संपवून रावी नदीचे तीरावर करतारपूर येथे गुरू नानकदेव स्थायिक झाले व तेथे त्यांनी आपले धर्मपीठ स्थापन केले. (१३ माघ संवत १५६५) व तेथे ते आपल्या शिष्यांना उपदेश करू लागले. त्यांच्या चारही परिक्रमात (उदासी) अनेक लोक त्यांचे शिष्य झाले होते. तेही आता करतारपूरला दर्शनार्थ येवू लागले. अन्य यात्रेकरूही त्या मार्गाने जात तेंव्हा ते ही गुरू नानक देवांच्या दर्शनार्थ तेथे थांबत असत. या सर्वांच्या निवासाची व भोजनाची सोय व्हावी म्हणून नानक देवांनी तेथे लंगरची सोय केली व त्याची जबाबदारी आपला शिष्य लहणाजी याचेवर सोपवली.

एक दिवस काही बैराग्यांचा एक जथा गुरू नानकदेवजीची कीर्ती ऐकून त्यांच्या दर्शनार्थ कर्तापूरला आला. लहणाजींनी त्यांचे आगत्यपूर्वक स्वागत केले व भोजन निवासाची व्यवस्था केली. बैराग्यांनी लहणाजींना पुढील प्रश्न विचारले –

१) आपण कोणत्या मताचे आहात?
२) आपल्या पंथाचा नाम मंत्र कोणता?
३) आपल्या पंथाचा मूळ मंत्र कोणता?
४) आपला माला मंत्र कोणता?

लहणाजींनी सांगितले आम्ही अद्वैत-अभेदमतवादी आहोत. आम्ही माणसा माणसात कोणता ही भेद मानत नाही. सारी एकाच परमेश्वराची लेकरे

आहोत, म्हणून सारे समान आहोत. कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. सारे समान. हे झाले पहिल्या प्रश्नाचे उत्तर. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तरात लहणाजी म्हणाले की, 'राम नाम' हा आमचा नाम मंत्र आहे. जो सर्व देवदेवतांच्या मंत्राचा मुख्य मंत्र आहे. (पुढे शिखांचे दशमेश गुरू गोबिंदसिंहांनी खालसा पंथाची स्थापना केल्यावर 'वाहे गुरू' हा शिख संप्रदायाचा नाममंत्र झाला.) ''उरलेल्या दोन प्रश्नाची उत्तरे गुरूदेव तुम्हास उद्या देतील'' असे लहणाजींनी त्या बैराग्यांना सांगितले.

थोड्या वेळाने काबूल, पिशौर आदी दूरवरच्या ठिकाणाहून गुरू नानकदेवजींचे काही भक्त गुरू नानकदेवजींच्या दर्शनार्थ करतारपूरला आले. लहणाजींनी त्यांचेही स्वागत केले व त्यांच्या भोजन-निवासाची व्यवस्था केली. ते लोक लहाणाजींना म्हणाले, ''गुरूदेवांच्या दर्शनाने आमचे जीवन कृतार्थ होईल पण आमची मुले बाळे, सगेसोयरे जे येथे येवू शकत नाहीत त्यांचा उद्धार कसा होणार? आम्हास गुरूदेवजींकडून काही उपदेश मिळाला तर फार बरे होईल.''

रात्री सर्व कामे उरकल्यावर लहणाजींनी सारा प्रकार, बैराग्यांचे प्रश्न व यात्रेकरूची विनंती गुरूदेवांच्या कानावर घातली. लहणाजींची विनंती ऐकून गुरू नानकजी म्हणाले, ''ऐक, आपला मूलमंत्र आहे –

''१ ओंकार सतिनामु करता पुरखु निरभउ
निरवैरू अकाल मूरति अजूनी सैभं गुरूप्रसादि ॥''

व त्यानंतर पूर्वी उदासीमध्ये सुमेरू पर्वतावर सिद्ध पुरुषांच्या सान्निध्यात झालेल्या चर्चेचे साररूप असलेली जपुवाणी कथन केली तो हा 'जपुजी साहिब!' हाच धर्माचा 'माला मंत्र' आहे तोच मंत्र गुरू ग्रंथ साहिबाचा अग्रस्थानी विराजमान झालेला आहे.

**



# जपुजी साहिब
## (भावानुवाद)

गुरू नानक देवांनी आपल्या चार उदासी (परिक्रमा) संपल्यानंतर करतारपूर मुक्कामी शीख संप्रदायाचे धर्मपीठ स्थापन केले. तेथे अनेक भाविक गुरूदेवांचे दर्शनार्थ येत असत. अशाच एका वेळी आलेल्या भक्तांनी अत्यंत आर्त स्वरात गुरू देवांना प्रश्न केला, ''गुरूदेव, आम्ही धर्मनिष्ठ आचरण करतो. सर्व व्रत वैकल्पे करतो. पण आम्हास आंतरिक समाधान, शांती मात्र मिळत नाही. असे का होते? आम्हास ईश्वर प्राप्तीची अनिवार ओढ लागली आहे. आम्हास त्या परमपिता परमेश्वराचे दर्शन कसे घडेल? आम्हास ह्या संसार सागरातील तापत्रयींपासून कशी मुक्ती मिळेल? आम्हास ते परमपद कसे प्राप्त होईल?''

भक्तांची ती तीव्र आर्तता पाहून गुरूदेवांनी त्यांना ईश्वर प्राप्तीचा सोपा मार्ग सांगितला. ह्या संसारिक मार्गावरून मार्गक्रमण करत असताना परमेश्वर प्राप्तीचा मार्ग अत्यंत अवघड आहे. हा एक चढण्यास अवघड असा चढ आहे. तो चढण्यास तशाच भक्कम शिडीची, सोपानाची आवश्यकता आहे. हे जाणून गुरू नानक देवांनी 'जपुजी साहिब' ही ३८ पायऱ्यांची (पउडी) शिडी भक्तांना दिली आहे. त्या मार्गाने जावून प्रत्येक जीवमात्राने आपले जीवन सार्थ करावे हीच गुरू नानकदेवांची आपणास सांगी आहे.

'जपुजी साहिब' च्या सुरवातीस गुरूनानकदेवांनी शीख संप्रदायाच्या मूलमंत्राचा उच्चार केला. तो असा –

१ ओंकार सति नामु करता पुरखु निरभउ निरवैरु
अकाल मूरति अजूनी सैभं गुर प्रसादि ॥

**अर्थ – १-** एक. **ओं –** ओंकार परमात्मा; **सति नामु –** सत्य, सदैव अस्तित्वात असलेला; **करता पुरखु –** कर्ता पुरुष; **निरभउ –** ज्याला कोणते ही

भय नाही; **निरवैरु** – ज्याचे कोणाशी वैर नाही; **अकाल मूरति** – कालातीत; **अजूनी** – कोणाही योनीतून न जन्मलेला; **सैभं** – स्वयंभू; **गुरप्रसादि** – सद्गुरूच्या कृपेने प्राप्त होणारा;

ह्या मूल मंत्रात गुरू नानकदेवजी परमेश्वराच्या स्वरूपाचे वर्णन करतात.

ज्यावेळी भक्त 'मला परमेश्वर भेटवा असे म्हणतो, तेव्हा त्याला सगुण साकार मूर्तीच्या दर्शनाची अपेक्षा असते. ही कल्पना दूर करण्यासाठी सर्व प्रथम त्या परमपित्या परमेश्वराचे, ईश्वराचे वास्तव स्वरूप भक्तांना स्पष्ट करून सांगणे गरजेचे असते. म्हणून गुरू नानकदेवांनी त्या परमेश्वराचे सत्य स्वरूप ह्या मूल मंत्राद्वारे भक्तांपुढे मांडले आहे.

परमेश्वर कसा आहे ? गुरूदेव सांगतात, ''तो ओंकार रूप आहे.'' श्री ज्ञानेश्वर माऊलीही ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी ईश्वराचे वर्णन करताना म्हणतात, ''ॐ नमोजी आद्या, वेद प्रतिपाद्या, जय जय स्वसंवेद्या, आत्मरूपा॥''

ईश्वर ओंकार स्वरूप आहे. 'ओं' हा ध्वनी अ, उ, म या तीन स्वर लहरींच्या एकत्रीकरणातून निर्माण झाला आहे. म्हणजे ईश्वर ह्या संसाराची निर्मिती प्रतिपालन व लय करणारी मूळ उर्जा आहे, शक्ती आहे. ईश्वर सगुण साकार नव्हे, तर सर्वांचा मूळ स्त्रोत आहे, केवल चैतन्यरूप आहे.

भक्तांच्या मनात अजून एक शंका असते. ती म्हणजे ईश्वराला कोणी निर्माण केले ? गुरू नानक देव सांगतात. ईश्वर स्वयंभू आहे. त्यानेच त्याला निर्माण केले आहे. तो कोणत्याही योनीतून सर्जित झालेला नाही. तो अयोनी आहे. तो योनी संभव नाही. म्हणून त्यास मरण ही नाही. तो अजन्मा आहे. अमर आहे. जन्ममरणाच्या अतीत आहे. हे सारे ब्रह्मांड त्यानेच निर्माण केले असल्यामुळे त्याला कोणाचीही भीती नाही, तो निर्भय आहे. त्याचे कोणाशी वैर नाही. वैर, भय आदी भाव भावना योनी संभव जीवाचे ठायी असतात. पण ईश्वर अयोनी असल्यामुळे भय, वैर आदी भाव भावना त्याचे ठाई नाहीत. तो काळाच्या पलिकडे आहे, म्हणून त्यास 'अकाल मूरत' असे संबोधले आहे. ह्या सर्व ब्रह्मांडाचा तो चालक मालक, पालक, सर्वेसर्वा आहे. म्हणून त्यास 'कर्ता पुरुष' असे म्हटले आहे. जसे प्रत्येक कुटुंबास एक कर्तापुरुष असतो, की जो त्या कुटुंबाचा भार वाहतो, तसेच ह्या विश्व कुटुंबाचा ईश्वर हा करता पुरुष आहे असे गुरू नानकदेवजी म्हणतात.

हे सर्व जाणणे सहज सोपे नाही. त्या ईश्वराचे हे चिन्मय स्वरूप जाणण्यासाठी तशाच समर्थ सद्गुरूच्या कृपेचीच आवश्यकता आहे. असेही गुरू नानकदेवजी



आवर्जून सांगतात.

थोडक्यात परमेश्वर हा चैतन्य स्वरूप आहे. तो सर्व सृष्टीचा कर्तापुरूष आहे. तो अंतिम सत्य आहे. तो स्वयंभू आहे. अयोनी संभव आहे. तो निर्भय व निर्वैर आहे. तो कालाच्या अतीत आहे व त्यास जाणण्यासाठी सद्गुरूच्या कृपेची आवश्यकता आहे. असे गुरू नानकदेव ह्या मूल मंत्राद्वारे भक्तांना सांगत आहेत.

ह्या मूलमंत्रात ओंकारचे पूर्वी १ हा आकडा लिहिला आहे. हे शीख धर्माचे खास वैशिष्ट्य आहे. ह्या १ आकड्यातून गुरू नानक देव सांगत आहेत की, परमेश्वर एक आणि एकच आहे. तो एकमेवाद्वितीय आहे. एकेश्वर वादाचाच हा महामंत्र आहे.

ह्या मूलमंत्रानंतर जपुजीस सुरवात करण्यापूर्वी जपुजीच्या मंगला चरणाच्या रूपाने गुरूनानक देवजी ईश्वराचे अधिक वर्णन करताना म्हणतात –

**आदि सचु जुगादि सचु**
**है भी सचु। नानक होसी भी सचु॥ १॥**

**आदि** – सर्वाच्या आधी, **सचु** – अंतिम सत्य , परमेश्वर; **जुगादि** – युगांच्याही आधी; **है भी** – आज ही आहे; **होसी भी** – भविष्यात ही असेल;

गुरू नानक देव म्हणतात, ही ईश्वरी शक्ती, जेव्हा काहीही नव्हते, तेव्हांही अस्तित्त्वात होती. परमेश्वराने सृष्टी निर्माण केली. काल चक्र सुरू झाले. त्या आधीही ही शक्ती, हे चैतन्य अस्तित्त्वात होते. चारही युगात अस्तित्त्वात होते. आजही ह्या कलियुगात ते अस्तित्त्वात आहे. एवढेच नव्हे तर कल्पांतानंतर ही सृष्टी नष्ट झाल्यावरही, ही शक्ती अस्तित्त्वात असणार आहे.

न्यूटनने गुरुत्त्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. पण त्या पूर्वीही तो अस्तित्त्वात होताच. आजही तो अस्तित्त्वात आहे व उद्या प्रलय होऊन सारी मानव जात नष्ट झाली, सारे ज्ञान नष्ट झाले, तरीही गुरुत्त्वाकर्षणाचा नियम आपले कार्य करतच रहाणार आहे. तसेच हे आहे. हे ईश्वरी चैतन्य, सृष्टी निर्माण होण्यापूर्वी ही होते. आजही आहे व पुढे ही राहणार आहे. ही सारी त्या परमेश्वराचीच लीला आहे व त्याच्याच इच्छेने या साऱ्या सृष्टीचे व्यवहार चालू आहेत. सर्व भक्तांनी ईश्वराचे हे चैतन्यरूप नीट समजावून घेतले पाहिजे. तरच त्याला ईश्वरप्राप्तीचा पुढे सांगितला जाणारा मार्ग नीट समजेल.

शीख संप्रदायाच्या मूलमंत्रात आणि जपुजी साहेबाच्या मंगलाचरणात परमेश्वराच्या स्वरूपाचे इतके सविस्तर वर्णन करून गुरुनानकदेवजी ईश्वर प्राप्तीसाठी 'जपुजी' साहिबची ही अडतीस पायऱ्यांची शिडी आपणास देत आहेत. पंजाबी

भाषेत पायरीसाठी 'पउडी' असा शब्द वापरतात. आपणही पउडी ह्याच शब्दाचा वापर करू या.

गुरू नानक देवजी सांगतातः-

### पउडी – १

**सोचै सोचि न होवई जे सोची लख वार ॥**
**चुपै चुप न होवई जे लाइ रहा लिव तार ॥**
**भुखिआ भुख न उतरी, जे बंना पुरीआ भार ॥**
**सहस सिआणपा लख होहि त इक न चलै नालि ॥**
**किव सचिआरा होईऐ, किव कूड़ै तुटै पालि ॥**
**हुकमि रजाई चलणा, नानक लिखिआ नालि ॥१॥**

अर्थ – **सोचै** – पवित्र राखणे; **सोचि** – पवित्रता; **न होवई** – होत नाही; **चुपै** – मौन, **चुप** – शांती; **लाई रहा** – लावून रहाणे, **लिव तार** – एकाग्र चित्ताने ळावलेली समाधी; **भूख** – वासना, तृष्णा, हाव; **न उतरी** – संपत नाही; **बंना** – बांधून घेणे; **पुरीआ** – सर्व लोक, सृष्टी; **भार** – वस्तू; **सहस** – सहस्त्र, हजारो; **सिआणपा** – (हुषारी), शहाणपण; **किव** – कशा प्रकारे, (कोणत्या मार्गाने); **सचिआरा** – प्रभू कृपेस पात्र; **होईऐ** – होईन; **हुकमि** – आज्ञा; **रजाई** – परमेश्वर; **नालि** – विश्वाच्या आरंभापासून; **कूडै** – खोटेपणा, देखावा; **तुटै** – मायापाश दूर होईल; **पालि** – पडदा;

जपुजीच्या ह्या पहिल्या पायरीवर भक्त गुरुनानकदेवजींना विचारतात, "**किव सचिआरा होईए किव कूडै तुटै पाली ॥**

"काय केले असता आम्ही परमेश्वराचे कृपेस पात्र होवू ? काय केले असता आम्ही संसाराच्या ह्या मोह पाशातून मुक्त होऊ ते आम्हास कृपया सांगावे." "स्नान, मौन, खूप ग्रंथ वाचन, पठण-पाठण, ध्यान-धारणा सर्व मार्गांचा आम्ही अवलंब करून पाहिला पण सारे व्यर्थ. खूप खूप विचार केला पण मार्ग सापडत नाही. तरी कृपावंत होउन आम्हास मुक्तीचा मार्ग दाखवा." त्यावर गुरुनानकदेव सांगतात –

एकवेळ नव्हे लाख वेळा स्नान केले तर काय होईल. फार तर शरीराची - तनाची स्वच्छता होईल. बाह्य स्वच्छ होईल. पण मनाचे काय ? असल्या उपायाने मनाची शुद्धी होणार नाही. मौनव्रत धारण केले तरी मनाचे संकल्प विकल्प चालूच राहतात. ते कधीही थांबत नाहीत. ह्या संसारात मानव वासनांच्या विळख्यात



इतका बांधला गेला आहे की साऱ्या जगातील साऱ्या भोगवस्तू त्याला मिळाल्या तरी त्याची वासना भागत नाही. मनुष्य कितीही विद्वान असला तरी त्याची ती विद्वत्ता हे भवपाश तोडण्यास यत्किंचितही उपयोगी पडत नाही. ह्या पाशातून मुक्त होण्याचा मार्ग सांगताना गुरुनानक देव सांगतात – माणसाचा अहंकार माणसास ह्या मोहपाशात बांधून ठेवतो. 'मी करतो' हा अहंभावच माणसाच्या दुःखाचे मूळ आहे. वास्तविक करता, करविता, सर्व काही तो परमेश्वर आहे. हे समजले, उमजले तरच माणूस मोहपाशातून मुक्त होईल.

माणसाचा हा अहंकार माणसास प्रभू कृपेपासून दूर ठेवत आहे. नीट लक्षात घ्या की ह्या जगात तुम्ही काहीच करू शकत नाही. ह्या साऱ्या सृष्टीचे व्यवहार परमेश्वरी आज्ञेप्रमाणे होत असतात. त्याच्याच इच्छेने सारे काही घडत असते. म्हणून 'मी करतो' हा भाव सोडून द्या. अहंकाराचा त्याग करा. स्वतःस परमेश्वराचे आधीन करा व त्याच्या आज्ञेत वागा. त्याचे नाम स्मरण करा. ह्यानेच तुम्ही प्रभू कृपेस पात्र व्हाल व संसाराच्या भवपाशातून मुक्त व्हाल.

### पउडी २

**हुकमी होवनि आकार, हुकमु न कहिआ जाई ॥**
**हुकमी होवनि जीअ, हुकमि मिलै वडिआई ॥**
**हुकमी उतमु नीचु, हुकमि लिखि दुख सुख पाईअहि ॥**
**इकना हुकमी बखसीस, इकि हुकमी सदा भवाईअहि ॥**
**हुकमै अंदरि सभु को, बाहरि हुकम न कोइ ॥**
**नानक हुकमै जे बुझै, त हउमै कहै न कोई ॥२॥**

**अर्थ – हुकमी** – ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे, (इच्छेप्रमाणे); **होवनि** – होते; घडते; **आकार** – शरीर, बाह्यस्वरूप; **न कहिआ जाई** – सांगता येत नाही; **जीअ** – जीव, प्राणी; **वडिआई** – आदर, उच्चपद; **उतमु** – उत्तम पद, श्रेष्ठपद; **लिखि** – लिहिल्याप्रमाणे; **पाईअहि** – प्राप्त करतो; **इकना** – काही माणसांना; **बखसीस** – बक्षीस, दान, कृपा; **इकि** – काही माणसे; **भवाईअहि** – (फिरवले जाते), जन्ममृत्यूच्या फेऱ्यात फिरवले जाते; **अंदरि** – परमात्म्याच्या इच्छेप्रमाणे, **सभु को** – सगळ्यांना, सर्व जीवांना; **बाहरि** – बाहेर; **बुझै** – समजेल; **हउमै** – अहंकार;

पहिल्या पउडी मध्ये गुरू नानकदेवांनी प्रत्येकाने अहंकाराचा, मीपणाचा, त्याग करून परमेश्वरास अनन्य भावाने शरण जाऊन त्याच्या आज्ञेप्रमाणे आपले

जीवन चालवावे असे सांगितल्यानंतर त्या प्रभूच्या लीलेचे अधिक विवरण करताना गुरू नानक देव सांगतात –

प्रभूची लीला अपार आहे. त्याचे मानवी भाषेत, मानवी शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य आहे. कितीही आणि कोणतेही शब्द वापरले तरी ते पुरे पडणार नाहीत. ही जी सारी सृष्टी आपणास दिसते, ती त्यानेच उत्पन्न केली आहे. सृष्टीतील सर्व जीव त्यानेच निर्माण केले आहेत. ह्या जीवांमध्ये कोणी लहान, कोणी मोठे, कोणी श्रेष्ठ, कोणी कनिष्ठ, कोणी विद्वान, कोणी मूढ, कोणी बलवान, कोणी दुर्बळ हे जे जे फरक आपण पाहतो ती ही त्याचीच लीला आहे. हे जग जे चालले आहे हे सर्व त्याच्या हुकुमात (आज्ञेत) चालले आहे. त्याच्या हुकुमाशिवाय काहीच होत नाही.

सर्व जीवांना तो परमात्मा परत परत जन्मास घालतो. त्यास जन्ममृत्यूच्या फेऱ्यात फिरत ठेवतो. हे जोवर माणसास समजत नाही, तोवर तो अहंकाराने हे मी केले, है वैभव मी मिळवले असे म्हणत राहतो.

ज्याने अहंकार टाकून दिला व प्रभू चरणी लीन झाला त्याच्यावर प्रभूची कृपा होते. त्याच्यावर प्रभू प्रसन्न होतो व त्यास ह्या जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त करून आपल्या जवळ स्थान देतो.

**पउडी ३**

**गावै को ताणू होवै किसै ताणू ॥**
**गावै को दाति जाणै नीसाणु ॥**
**गावै को गुण वडिआईआ चार ॥**
**गावै को विदिआ विखमु वीचारु ॥**
**गावै को, साजि करे, तनु खेह ॥**
**गावै को, जीअ लै फिरि देह ॥**
**गावै को जापै दिसै दूरि ॥**
**गावै को, वेखै हादरा हदूरि ॥**
**कथना कथी न आवै तोटि ॥**
**कथि कथि कथी, कोटि कोटि कोटि ॥**
**देदा दे, लैदे थकि पाहि ॥**
**जुगा जुगंतरि खाही खाहि ॥**
**हुकमी हुकमु चलाए राहु ॥**
**नानक विगसै बेपरवाहु ॥३॥**



**अर्थ – गावै** – गातो; **को** – कोणी माणूस, व्यक्ती; **ताणु** – परमेश्वरी सामर्थ्य; **होवै** – असेल; **किसै** – ज्या कोणा मानवात;

**दाति** – दिलेले दान; **जाणै** – जाणतो; **नीसाणु** – प्रतिक, खूण, निशाणी; **वडिआईआ** – मोठेपण, श्रेष्ठत्व; **चार**– सुंदर; **विदिआ** – विद्या; **विखमु** – कठीण, अवघड, दुर्बोध, गहन; **वीचारू** – विचार, ज्ञान; **साजि करे** – उत्पन्न करतो, निर्माण करतो; **तनु** – शरीर, देह; **खेह** – राख; **जीअ** – जीव; **लै** – घेतो, धारण करतो; **फिरि** – परत; **कथना** – सांगणे, व्याख्या करणे. **कथी न आवै तोटि** – सांगूनही पूर्ण वर्णन होत नाही; **देदा** – देणारा, दानी; **दे** – देणे; **लैदे** – घेणारा; **थकि पाहि** – थकणे, दमून जातो; **जुगा जुगंतरि** – युगानुयुगे, सतत, अविरत; **खाही खाहि** – उपभोग घेत आहे; **हुकमी** – परमेश्वर; **हुकमी हुकमु** – परमेश्वराची आज्ञा, परमेश्वराची इच्छा, परमेश्वराची लीला; **राहु** – मार्ग, जगाची रहाटी; **विगसै** – प्रफुल्ल, ताजा टवटवीत, प्रसन्न; **बेपरवाहु** – चिंतामुक्त, निश्चिंत;

प्रभू परमात्मा हा महादानी आहे. तो सदैव देत असतो व तुम्ही आम्ही घेणारे जीव घेत असतो. तो अनंत हस्ते देत असतो. आपणच घेता घेता थकून जातो. पण त्याचा हात कधीच थांबत नाही तो सदैव देतच असतो.

कोणी त्याच्याकडून बल घेतो. कोणी धन घेतो. कोणी विद्वत्ता घेतो. आणि मग जो तो प्रभूचे गुणगान करू लागतो. प्रभूचे वर्णन करू लागतो, पण त्याला प्रभूचे समग्र ज्ञान झालेले असते का ? नाही! प्रभूच्या आगाध सामर्थ्याचे संपूर्ण ज्ञान कोणालाही झालेले नाही. ज्याला ज्याला जे जे मिळाले तो तो त्याला प्राप्त झालेल्या गुणांप्रमाणे परमात्म्याची स्तुती करतो. त्या जीवाला परमेश्वराकडून मिळालेली देणगी ही त्याच्यावर झालेली प्रभूकृपेची निशाणीच आहे. असे तो समजतो.

कोणी प्रभूच्या गुणांचे वर्णन करतो. कोणी त्याच्या मोठेपणाची महती गातो. कोणी विद्वान माणूस आपल्या विद्वत्तेच्या जोरावर, बुद्धिमत्तेच्या जोरावर त्याचे वर्णन करू पाहातो.

कोणी असे सांगतात की परमेश्वर जीवास जन्मास घालतो व त्यांचा शेवटही तोच करतो. कोणी म्हणतात मरणोत्तर परमेश्वर पहिल्या शरीरातील आत्मा दुसऱ्या शरीरात घालतो.

कोणी म्हणतात परमेश्वर फार दूर आहे. त्याला प्राप्त करणे महा कठीण आहे. तर कोणी म्हणतात, अरे परमेश्वर तर सर्वत्र आहे. जळी स्थळी, काष्ठी,

पाषाणी, सर्वत्र तो विराजमान आहे. तो सर्वज्ञ आहे. सर्व काही पहात आहे, म्हणजे तो सर्वसाक्षी आहे.

अशा प्रकारे कोटी कोटी जीव आपल्या परीने त्या प्रभू परमात्म्याचे वर्णन करत असतात. त्या वर्णनांना पार नाही, अंत नाही. कोणीही, कितीही, वर्णन केले तरी ते अपुरेच आहे. कारण परमेश्वराचे समग्र ज्ञान कोणासच झालेले नाही.

पण एक गोष्ट निश्चित. तो परमेश्वर ह्या साऱ्या सृष्टीचे व्यवहार त्याच्या इच्छेप्रमाणे चालवीत आहे. त्यानेच हे सर्व जीव निर्माण केले आहेत. त्यांच्या उपजीविकेची सर्व साधने ही त्याने भरभरून निर्माण करून ठेवली आहेत. जेणे करून त्या जीवांना आपला चरितार्थ चालवावयास काहीही कमी पडू नये. त्याने निर्माण केलेले हे संसार चक्र इतक्या शिस्तीने व काटेकोरपणे चालले आहे की तो प्रभू त्याबद्दल निश्चिंत आहे व सदैव प्रसन्नचित्त आहे.

## पउडी ४

**साचा साहिबु, साचु नाइ, भाखिआ भाउ अपारु ॥**
**आखहि मंगहि देहि देहि, दाति करे दातारु ॥**
**फेरि कि अगै रखीऐ, जितु दिसै दरबारु ॥**
**मुहौ कि बोलणु बोलीऐ, जितु सुणि धरे पिआरु ॥**
**अंम्रित वेला सचु नाऊ, वडिआई विचारु ॥**
**करमी आवै कपड़ा, नदरी मोखु दुआरु ॥**
**नानक एवै जाणीऐ, सभु आपे सचिआरु ॥४॥**

**अर्थ – साचा** - सत्य, सदैव अस्तित्यवान; **साहिबु** - परमेश्वर; **नाई** - न्याय; **भाखिआ** - भाषा; **भाउ** - भाव, प्रेम; **अपारु** - अपार; **आखहि** - सांगतो; **मंगहि** - मागतो; **देहि देहि** - दे, दे, देत राहतो; **दाति** - दान देतो; **दातारु** - देणारा दाता, परमेश्वर; **फेरि** - मग; **कि** - कोणती; **अगै** - समोर; **रखिऐ** - ठेवू; **जितु** - ज्यामुळे; **दिसे** - दिसेल; **मुहौ** - तोंडानें; **कि बोलणु** - काय बोलावे; **जितु** - ज्यायोगे; **अंम्रित वेला** - रामप्रहरी, पंचपंच उषःकाली, (ब्रह्ममुहूर्तावर); **नाऊ** - नाव, हरीचे नाव, (परमेश्वराचे नाव); **बडिआई** - बढाई, मोठेपण; **बडिआई विचारु** - परमेश्वरांच्या मोठेपणाचे गुणगाण करणे; **करमी** - प्रभूकृपा; **कपडा** - कापड, प्रभू कृपेची पाखर; **नदरी** - प्रभूची कृपा दृष्टी; **मोखु** - मोक्ष; **दुआरु** - द्वार, मार्ग, प्रवेशमार्ग; **एवै** - अशाप्रकारे; **जाणीऐ** - जाणणे, प्रचिती येणे; **सभु** - सर्वत्र; (सगळीकडे); **सचिआरु** - परमसत्य,



परमेश्वर;

गुरू नानकदेव पुढे सांगतात –

ह्या संसारात आपणास जे जे दिसते, भासते, ते सारे असत्य आहे. अनित्य आहे. तो एक मात्र 'अकाल पुरुष,' तो परमेश्वर परमात्मा, तोच केवळ एकमात्र सत्य आहे. नित्य आहे. ही सारी सृष्टी - जी त्यानेच निर्माण केली आहे - तिच्या सुसंचालनासाठी त्याने काही व्यवस्थाही निर्माण केल्या आहेत. त्याही सत्य आहेत, नित्य आहेत. त्यानेच निर्माण केलेल्या सर्व जीवांवर त्याचे अत्यंत प्रेम आहे. सर्व जीव त्याच्याकडे सदैव हे दे, ते दे, असे मागत असतात. आणि तोही परमपिता आपल्या ह्या मुलांचे हट्ट अत्यंत प्रेमाने पुरवत असतो. आपल्या मुलांवर (जीवांवर) त्याचे अपार प्रेम आहे. तो परमपिता परमेश्वर अपार प्रेमाचा सागर आहे. प्रेम हीच त्याची भाषा आहे.

परमेश्वर प्राप्तीची, परमेश्वर कृपेची ओढ लागलेल्या शिष्याच्या मनात असा प्रश्न उभा राहतो की आपण त्याच्या (परमेश्वराच्या) दर्शनास जाताना कोणता उपहार न्यावा? कारण हे जे काही माझ्याजवळ आहे ते सारे त्यानेच तर मला दिले आहे. व त्यानेच दिलेले त्यालाच परत देण्यात काय स्वारस्य!

मी माझ्या ह्या मुखाने कोणत्या शब्दांनी त्याच्याशी संवाद साधू? कोणत्या शब्दांनी त्याचे स्तवन करू, की ज्या योगे मी त्याची कृपा, त्याचे प्रेम, प्राप्त करू शकेन?

गुरू नानकदेव सांगतात - परमेश्वराशी सख्य साधण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्याच्याच भाषेत आपण त्याच्याशी संवाद साधू शकणे. त्याची भाषा प्रेमाची भाषा. आपणही सर्व जीवांशी प्रेमाने वागावे, त्यांना सर्वतोपरी मदत करावी, त्यांची सेवा करावी, यानेच देव प्रसन्न होईल. तुम्ही त्याचे कृपेस पात्र व्हाल.

गुरू नानकदेव पुढे सांगतात - पंचपंच उषःकाली, भल्या पाहाटे राम प्रहरी उठावे. या वेळी सर्वत्र नीरव शांतता असते. सर्व वातावरण प्रसन्न असते. ती खरोखर 'अमृतवेळ' असते. अशा ह्या वेळी एकाग्र चित्ताने, आपल्या सर्व वृत्ती प्रभूचरणी अर्पण करून प्रसन्न मनाने त्या परमेश्वराच्या महतेचे गुणगान करावे. असे केल्याने तुम्ही त्याच्या कृपेस पात्र व्हाल. तुमच्यासाठी तो मोक्षाचे द्वार खुले करील.

## पउडी ५

**थापिआ न जाइ, कीता न होइ ॥**
**आपे आपि निरंजनु सोइ ॥**
**जिनि सेविआ, तिनि पाइआ मानु ॥**

नानक, गावीऐ गुणी निधानु ॥
गावीऐ सुणीऐ, मनि रखिऐ भाउ ॥
दुखु परहरि, सुखु घरि लै जाइ ॥
गुरमुखि नादं, गुरमुखि वेदं गुरमुखि रहिआ समाई ॥
गुरू ईसरु, गुरु गोरखु बरमा, गुरु पारबती माई ॥
जे हउ जाणा, आखा नाही, कहणा कथनु न जाई ॥
गुरा, इक देहि बुझाई ॥
सभना जीआ का इकु दाता, सो मै विसरि न जाई ॥५॥

**अर्थ** – **थापिआ** – स्थापन करणे; **कीता** – तयार करणे, बनवणे, निर्माण करणे; **आपे आपि** – आपोआप; **निरंजनु** – मायेविरहित, कलंक रहित, विकाररहित, काळिमारहित; **जिनि** – ज्याने; **तिनी** – त्याने; **सेविआ** – सेवा केली, भक्ती केली; **पाइआ** – मिळवला; **मानु** – सन्मान; **गाविऐ** – गातात; **गुणी निधानु** – गुण निधान, गुणांचे भांडार; **सुणीऐ** – ऐकतात, श्रवण करुन; **भाऊ** – भाव; **रखिऐ** – ठेवून, ठेवावे; **दुखु परहरि** – दुःख निवारण; **घरि** – ह्दयात; **लै जाई** – प्राप्त करतात; **गुरूमुखि** – संतजनांच्या, सज्जनांच्या मुखात; **नादं** – आवाज, ध्वनी; **वेदं** – वेद, ज्ञान; **रहिआसमाई** – व्यापून राहतात; **ईसरू** – शिव; **बरमा** – ब्रह्मा; **गोरखु** – गोरखनाथ; **पारबती माई** – माता पार्वती; **हउ** – मी, **जाणा** – जाणणे, समजणे अनुभूती घेणे, ज्ञान होणे; **आखा नही** – वर्णन करता येत नाही; **कहणा कथनु न जाई** – शब्दात व्यक्त करता येत नाही; **गुरा** – गुरू; **एक बुझाई** – ज्ञान दिले; **विसरि न जाई** – विसरू नकोस.

शिष्याचे मनात प्रश्न उत्पन्न होतो की सारी सृष्टी, सारे ब्रह्मांड, त्यावरील जल वायू रत्ने माणके, वृक्ष, वल्ली, जीव, जंतू, पशुपक्षी, मानव आदि सर्व काही त्या परमेश्वराने उत्पन्न केले हे जरी खरे असले तरी. सर्व प्रथम त्या परमेश्वरास कोणी निर्माण केले ?

गुरू नानकदेव सांगतात – तो स्वयंभू आहे. परमेश्वास कोणीही उत्पन्न केले नाही. त्यास कोणीही निर्माण केलेले नाही. ह्या ज्या वस्तू आपणास दिसतात भासतात ती सारी मायेची रुपे आहेत. ईश्वर तर मायेपासून मुक्त आहे. तो निरंजन आहे. तेजोमय आहे. अनादि अनंत आहे. व त्यानेच ही सारी सृष्टी निर्माण केली आहे. ज्याने हे जाणले व ज्याने त्या चिन्मयरुपाचे ध्यान केले, स्मरण केले तो त्या परमेश्वरास प्राप्त करतो. म्हणून तू त्या गुणनिधानाचे सदैव गुणगान कर. त्याचे भजन कर. त्याच्या कीर्तन श्रवणात रममाण हो. तोच तुझ्या सर्व दुःखाचे निवारण



करून तुला सुखसमृद्धीकडे घेवून जाणार आहे, हा भाव तुझ्या मनी सदैव राहू दे. आणि हे सर्व सदगुरू कृपेनेच शक्य होणार आहे.

परमात्म्याचे नाम आणि ज्ञान हे सद्गुरू द्वारेच प्राप्त होऊ शकते. परमेश्वर सर्वत्र भरून राहिलेला आहे हे आपणास गुरुकडूनच कळते म्हणून भक्तांसाठी गुरू हाच शिव आहे, गोरखनाथ आहे, ब्रह्म आहे. गुरुच सारे सारे काही आहे. त्या सद्गुरूचे किती वर्णन करू? त्याचे शब्दात वर्णन करणे शक्य नाही. त्याची अनुभूती घ्यावी लागते. सद्गुरुच आम्हास परमेश्वराप्रत जाण्याचा मार्ग दाखवतात. त्यांच्याच कृपेने त्या निरामय परमेश्वरास आपण जाणू शकतो. हे परमेश्वरा, साऱ्या जगाचा तू पालनकर्ता. तुझे मला कधीही विस्मरण होऊ देऊ नकोस.

## पउडी ६

तीरथि नावा जे तिसु भावा, विणु भाणे कि नाइ करी ॥
जेती सिरठि उपाई वेखा, विणु करमा कि मिलै लई ॥
मति विचि रतन जवाहर माणिक,
जे इक गुर की सिख सुणी ॥
गुरा, इक देहि बुझाई ॥
सभना जीआ का इकु दाता, सो मैं विसरि न जाई ॥६॥

**अर्थ** – **तीरथि** – तीर्थस्थान; **नावा** – स्नान करणे; **तिसु** – ईश्वरास; **भावा** – भावले, आवडले; **विणु** – विना, शिवाय; **भाणे** – आवडणे; **कि नाइ करी** – स्नान करून काय प्राप्त होणार, काय लाभ होईल ? **जेती** – जितकी; **सिरठि** – सृष्टी; **उपाई** – उत्पन्न केली; **वेखा** – पाहतो; **विणु करमा** – परमेश्वरी कृपेशिवाय; **कि मिलै** – काय मिळेल ?; **किलई** – काय घेऊ शकेल ?

**मति विचि** – बुद्धीतून, बुद्धीतच, **सिख** – शिकवण, उपदेश. **सुणी** – ऐकली. **बुझाई** – समजली. **सभना** – सगळ्या, समस्त, **जीआ** – जीव.

गुरु नानकदेवांनी केलेल्या या मार्गदर्शनानंतरही शिष्याच्या मनात येते की, लोक तर सांगतात तीर्थक्षेत्रात जाऊन तीर्थात स्नान केल्याने साऱ्या पापांचा नाश होऊन माणसास ईश्वराची कृपा प्राप्त होते. या शंकेचे निराकरण करताना गुरुनानक देवजी सांगतात, असे असते तर तीर्थक्षेत्री राहणाऱ्या व रोज तीर्थस्नान करणाऱ्या सर्वांनाच ईश्वरी कृपा प्राप्त झाली असती; पण तसे घडलेले दिसत नाही. मग परमेश्वर कृपेची खात्री नसेल तर व्यर्थ तीर्थक्षेत्री जाऊन तीर्थस्नानाचा वृथा खटाटोप का करावा ? या सृष्टीतील प्रत्येक जीवास. परमेश्वरी इच्छेशिवाय काहीही मिळत

नाही. किंवा परमेश्वरी इच्छेशिवाय त्याचेकडून कोणी काहीही काढून घेऊ शकत नाही. म्हणून जीवाने तीर्थस्थानी जा, इकडे जा, तिकडे जा, अशी व्यर्थ खटपट न करता परमेश्वराचे नामस्मरण करत स्वतःस त्याचे आधीन करावे हे चांगले.

माणसाला रत्न, माणके, जवाहर, सोने नाणे ह्याची फार हाव असते. पण ही सर्व माया आहे. त्याच्या मोहात न पडता सद्गुरु चरणी नतमस्तक व्हावे ह्यातच त्याचे हित आहे. गुरुमुखातून निघणारा प्रत्येक शब्द, गुरुने केलेला उपदेश हीच खरी संपत्ती आहे. गुरु कृपेने जी अध्यात्मिक गुणसंपदा प्राप्त होते. तीच खरी रत्न माणके होत. हे सद्गुरु, मला अशी बुद्धी दे की जेणे करून मी त्या सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या परमेश्वरास कधीही विसरणार नाही. माझे मन सदैव त्याचे चरणी लीन होऊ दे.

## पउडी – ७

जे जुग चारे आरजा, होर दसूणी होइ ॥
नवा खंडा विचि जाणीऐ, नालि चलै सभु कोइ ॥
चंगा नाउ रखाइ कै जसु कीरति जगि लेइ ॥
जे तिसु नदरि न आवाई त वात न पुछै के ॥
कीटा अंदरि कीटु, करि दोसी, दोसु धरे ॥
नानक निरगुणि गुणु करे गुणवंतिआ गुणु दे ॥
तेहा कोई न सुझई, जि तिसु गुणु कोइ करे ॥७॥

अर्थ – **जुग चारे** – चारही युगा इतकी; **आरजा** – आयुष्य, जीवन; **दसुणी** – दसपट; **नवा खंड विचि** – नवखंड पृथ्वी मध्ये; **जाणिऐ** – प्रसिद्ध पावणे; **सभु कोई** – सर्वजण, प्रत्येक मनुष्य; **नालि चलै** – त्याचे अनुसरण करणे; **चंगा** – चांगले; **नाउ** – नाव, कीर्ती; **रखाई** – मिळवले, प्राप्त केले; **जसु** – यश; **कीरति** – कीर्ती; **जगि** – जगात; **लई** – मिळवली; **तिसु** – परमेश्वराची; **नदरि** – कृपा, कृपादृष्टी; **न आवई** - येत नाही; उपयोगी पडत नाही; **वात** – वार्ता, बातमी, वृत्त; **न पुछै के** – कोणी माणूस विचारत नाही; **कीटा** – कीटक; **अंदीर** – पैकी; **कीटु** – क्षुद्र कीटक; **करि** – करून; **दोसु घरे** – दोष लागतो; **निरगुणि** – निर्गुण; **गुणवंतिआ** – गुणी माणूस, गुणवंतमाणूस; **दे**- देतो; **करे**- उत्पन्न करतो; **तेहा**- त्यासारखा; **न सुझई**- मिळत नाही.

माणसाच्या ठाई धनाचा मोह असतो. त्याबद्दल सहाव्या पउडीत गुरू नानकदेवांनी खऱ्या धनाची, गुरूकृपेची महती सांगितली. धनाप्रमाणेच माणसाला



मोठेपणाची, कीर्तीची हाव असते. अर्थेषणा, लोकेषणा, सत्तेषणा अशा अनेक ईषणांनी (मोहांनी) माणूस ह्या मोहमायेच्या जाळ्यात गुंतून पडतो. व प्रभूकृपेस पारखा होतो. ह्या सातव्या पउडीत गुरू नानकदेव लोकेषणेबद्दल शिष्यास सावध करत आहेत. ते म्हणतात -

जर एखाद्या माणसास चारी युगा इतकेच नव्हे तर त्याच्या दसपट आयुष्य मिळाले, त्याने आपल्या ह्या प्रदीर्घ आयुष्यात साऱ्या जगावर आपले प्रभुत्व प्राप्त केले, जगात अत्यंत यशस्वी माणूस म्हणून त्यांची कीर्ती झाली, तरी अंती जर तो प्रभू चरणी लीन झाला नाही व आपल्याच भौतिक यशात, कीर्तीत, अडकून पडला, तर तो नर कवडीमोल समजावा. हे सर्व यश, कीर्ती, प्रदीर्घ आयुष्य, सारे सारे त्याला मिळाले आहे ते ईश्वरीकृपेने आहे, ह्याची त्याला जाणीव नसेल तर तो क्षुद्रातल्या क्षुद्र कीटकाहूनही हीन आहे. परमेश्वर त्याच्या ह्या अहंकाराला कधीही क्षमा करणार नाही.

गुरू नानकदेव पुढे सांगतात - गुरूकृपेमुळे गुणहीन माणूस गुणवंत बनतो. परमेश्वरी कृपेनं मुक्याला वाचा फुटते पंगू माणूस पर्वत ही पार करू शकतो. एवढे सर्व करण्याची शक्ती एकमात्र परमेश्वराचीच आहे. अन्य कोणी ही हे करू शकणार नाही. म्हणून हे शिष्या, त्या परमपित्यास शरण जा आणि त्याच्या इच्छेप्रमाणे आपले जीवन चालवून जीवनाचे सार्थक कर.

## पउडी ८

**सुणिऐ, सिध पीर सुरि नाथ ॥**
**सुणिऐ, धरति धवल आकाश ॥**
**सुणिऐ, दीप लोअ पाताल ॥**
**सुणिऐ, पोहि न सकै कालु ॥**
**नानक, भगता सदा विगासु ॥**
**सुणिऐ, दूख पाप का नासु ॥८॥**

**अर्थ – सुणिऐ** – ऐकल्याने, (श्रवण केल्याने); **सिध** – सिद्ध; **सुरि** – सुर, देव; **दीप** – द्वीप, सातद्वीप, जगातील सात खंडे; **लोअ** – लोक, सप्तलोक; **पोही न सकै** – पोहचू शकत नाही, प्रभाव पाडू शकत नाही; **विगासु** – प्रसन्नता.

पहिल्या सात पउडींमध्ये गुरू नानक देवांनी ईश्वराच्या स्वरूपाचे वर्णन करून नामजपाद्वारे आपण त्याच्या समीप पोहचू शकतो हे सांगितले. आता ह्या

पुढील चार पउडींमध्ये गुरू नानकदेव नाम श्रवणाचे महात्म्य वर्णन करत आहेत. ईश्वर भक्तीचे नवविध मार्ग आहेत त्यातील 'श्रवणभक्ती' हा एक मार्ग आहे.

नाम श्रवणाने काय होते ? गुरू नानकदेव सांगतात - नाम श्रवणाने ऐकणाराचे मन, चित्त एकाग्र होते. तो प्रभू नामात तल्लीन होऊन जातो. एकरूप होऊन जातो. व अंती तो सिद्धपुरुष, परमभक्त एवढेच नव्हे तर देवपदी जाऊन ह्या साऱ्या ब्रह्मांडाचा आधार असलेल्या परमेश्वराचे ज्ञान त्याला होते. सप्तद्वीप, लोक, पाताल साऱ्या साऱ्यामध्ये तो परमेश्वर विद्यमान आहे असे त्याला ज्ञान होते. त्याच्यापर्यंत कळीकाळाही पोहचण्याची हिमंत करत नाही, मृत्यूची ही भीती त्याला रहात नाही. तो सर्व दुःखांपासून पापतापांपासून मुक्त होतो. नामश्रवणात तल्लीन होऊन ईश्वरापाशी एकरूप झालेल्या भक्ताचे मुखावर एक दिव्य प्रभा दिसू लागते. तो सदैव शांत प्रसन्न चित्त असतो.

### पउडी ९

**सुणिऐ, ईसरु बरमा इंदु ॥**
**सुणिऐ, मुखि सलाहण मंदू ॥**
**सुणिऐ, जोग जुगति तनि भेद ॥**
**सुणिऐ, सासत सिम्रिति वेद ॥**
**नानक, भगता सदा विगासु ॥**
**सुणिऐ, दूख पाप का नासु ॥९॥**

**अर्थ** - **ईसरू** - शिव; **बरमा** - ब्रह्मदेव; **इंदु** - इंद्रदेव; **मुखि** - मुखाने; **सलाहण** - गौरव, गुणगान, महत्त्व; **मंदु** - मतिमंद, मूढ; **जोग** - योग, **जुगति** - युक्ती; **तनि** - शरिरांतर्गत; **सासत** - शास्त्र, **सिम्रिति** - स्मृति; **नासू** - नाश करतो; नाश होतो;

नाम श्रवणाचे महत्त्व सांगताना गुरू नानकदेव पुढे सांगतात -

नाम श्रवणात पूर्ण तल्लीन होऊन एकाग्र चित्त झालेलया, दिव्य प्रभेने मंडित झालेल्या, प्रसन्न चित्त भक्ताची सर्व दुःखे, क्लेश, पाप, तापातून मुक्ती होते. नामस्मरणातून भगवंताशी एकरूप झाल्याने भक्त शिव, ब्रह्मा, इंद्रपद ही प्राप्त करू शकतो. योगीलोक खूप खडतर योगसाधने द्वारा शरीरांतर्गत क्रियांचे मनोव्यापारांचे जे ज्ञान प्राप्त करतात ते ज्ञान अगदी मंदबुद्धीचा भक्त केवळ श्रवणभक्तीद्वारा प्राप्त करतो.

ज्ञानमार्गी लोक आपल्या कुशाग्र, बुद्धीद्वारे चारही वेद, चौसष्ट स्मृती, सर्व



शास्त्रे आदींचे ज्ञान प्राप्त करून घेतात. पण खऱ्या भक्तास केवळ नामश्रवणाने हे सर्व ज्ञान प्राप्त होते. नामस्मरणाने भक्ताच्या सर्व दुःखांचा परिहार होतो. सर्व पापतापांपासून तो मुक्त होतो. व त्यामुळे भक्ताच्या मुखावर एक दिव्य प्रभा झळकू लागते व तो सदैव नुकत्याच फुललेल्या पुष्पाप्रमाणे ताजा, टवटवीत व प्रसन्न दिसतो.

### पउडी १०

**सुणिऐ, सतु संतोखु गिआनु ॥**
**सुणिऐ, अठसठि का इसनानु ॥**
**सुणिऐ, पड़ि पड़ि पावहि मानु ॥**
**सुणिऐ, लागे सहजि धिआनु ॥**
**नानक, भगता सदा विगासु ॥**
**सुणिऐ, दूख पाप का नासु ॥१०॥**

**अर्थ** - **सतु** - दान; **संतोखु** - संतोष; **अठसठी** - अडुसष्ट; **इसनानु** - स्नान; **पढिपढि** - वारंवार वाचून, पाठ करून; **पावहि** - मिळवतो, प्राप्त करतो; **सहजि** - सहज, आपोआप; धिआनु - ध्यान.

नामस्मरणाने भक्ताला असा बोध होतो की, हे सारे आहे ते परमेश्वराचे आहे. मी ही परमेश्वराचा आहे. माझे माझे म्हणून मी जे म्हणतो, ते ही त्याचेच आहे. ह्या सत्याचा प्रकाश भक्ताचे मनात उदित झाला, की तो संतोष पावतो. त्याची दानाकडे प्रवृत्ती वाढते. सर्व अडुसष्ट तीर्थात स्नान केल्याने जे परमपुण्य प्राप्त होते, ते भक्तास केवळ नामश्रवणाने प्राप्त होते. ज्ञानी जनांना अनेक ग्रंथांचे समग्र अध्ययन केल्याने जो मानसन्मान समाजात प्राप्त होतो तोच मानसन्मान केवळ श्रद्धापूर्वक नाम श्रवणाने भक्तास प्राप्त होतो. योग्यांना एकाग्र चित्त करून ध्यानमग्न होण्यास फार परिश्रम करावे लागतात! पण हीच गोष्ट भक्ताला मात्र अगदी सहज प्राप्त होते. नामश्रवणात तल्लीन झालेला भक्त सहजीच ध्यानमग्न होतो. त्याच्या सर्व पापतापांचा नाश होऊन तो सदैव प्रसन्न चित्त असतो.

### पउडी ११

सुणिऐ, सरा गुणा के गाह ॥
सुणिऐ, सेख पीर पातिसाह ॥
सुणिऐ, अंधे पावहि राहु ॥
सुणिऐ, हाथ होवै असगाहु ॥

नानक, भगता सदा विगासु ॥
सुणिऐ, दूख पाप का नासु ॥११॥

अर्थ – सरा - सरोवर; गाह - ज्ञान; पावही - सापडतो; अंधे - अंध माणूस; हाथ - सखोल ज्ञान; असगाहू - अवघडातील अवघड, (कठीणाहून कठीण).

गुरू नानकदेव सांगतात - अरे नाम श्रवणाचे महत्त्व किती किती वर्णन करू ? नाम श्रवणाने मूढ माणसांसही सारे सारेज्ञान प्राप्त होते. तो गुणांचा सागर बनून जातो. इह परलोकातील सर्वश्रेष्ठ पदाचा तो अधिकारी बनतो. अज्ञान अंधकारात बुडून गेलेला ज्ञानाचा सागर होतो. अहंकाराने अंध झालेल्यास सन्मार्ग सापडतो. एवढेच नव्हे तर दुर्लध्य असलेला हा भवसागर तो सहजी पार करून जातो. नाम श्रवणाने आत्मविश्वास प्राप्त झाल्याने तो सदैव प्रसन्न चित्त होतो. व अंती परमेश्वराशी एकरूप होऊन जातो.

अशाप्रकारे पउडी ८ ते ११ मध्ये गुरू नानकदेवांनी नाम श्रवणाचे महत्त्व भक्तांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून योग्य तो बोध घेऊन आपण आपले जीवन सार्थकी लावू या.

## पउडी १२

मंने की गति कही न जाइ ॥
जे को कहै, पिछै पछुताइ ॥
कागदि, कलम न लिखणहारु ॥
मंने का, बहि करनि वीचारु ॥
ऐसा नामु निरंजनु होइ ॥
जे को मंनि जाणै मनि कोइ ॥१२॥

अर्थ – मंने - श्रद्धावान, ईश्वरावर पूर्ण विश्वास असणारा, (ईश्वरी इच्छेप्रमाणे जीवन जगणारा); गति - रहाणी, (वागणूक), दैनंदिन व्यवहार; कहिन जाई - वर्णन करून सांगता येत नाही; पिछै - नंतर; पछुताई - पश्चाताप पावेल; ऐसा - असा; मंनि - श्रद्धायुक्त, एकाग्रचित्त; मनि - मनात.

गुरू नानकदेवांच्या मुखाने ईश्वराचे स्वरूप, नाम जपाचा, नाम संकीर्तनाचा, नाम श्रवणाचा महिमा ऐकल्यावर व त्यामुळे सामान्यातला सामान्य माणूसही आपला उद्धार करून घेऊन परमपद प्राप्त करून घेऊ शकतो हे जाणल्यावर, असा



परमतत्त्वाशी एकरूप झालेला माणूस कसा दिसतो, कसा वागतो, कसा बोलतो, कसा राहतो हे जाणून घेण्याची उत्सुकता शिष्यांच्या मनात जागृत झाली. ती त्यांनी गुरूदेवां पुढे व्यक्त केली. त्यावर गुरू नानकदेव शिष्यांना सांगतात –

काय सांगू - अशा परमपदाला पोहोचलेल्या माणसाचे वर्णन करणे फार फार अवघड आहे. तो दिसायला वागायला बोलायला सामान्य माणासाझारखाच दिसतो, राहतो. पण इतरांपासून तो वेगळा असतो. त्याचे हे आगळे वेगळेपण शब्दात वर्णन करणे शक्य नाही. जर कोणी तसा प्रयत्न केला तर लवकरच त्याच्या लक्षात येईल की आपण केलेले वर्णन फारच अपुरे आहे. कोणी लेखक जगातले सारे कागद, साऱ्या लेखण्या घेऊन अशा परमभक्ताचे वर्णन लिहायला बसला, तर सारे कागद संपले तरी लेखन अपुरेच राहील.

परमेश्वराचे स्वरूप केवळ अवर्णनीय आहे. अत्यंत श्रेष्ठ व गहन आहे. तो मोहमायेच्या पलीकडे आहे. निष्कलंक परम प्रकाशमान आहे. अशा परमेश्वराशी तादात्म्य पावलेल्या, एकरूप झालेल्या परमभक्ताची अध्यात्मिक अवस्था इतकी उंच असते, की त्याचे ज्ञान सामान्य जनास होणे अत्यंत अवघड आहे. आपण त्या स्थितीत पोहोचल्यावरच ते शक्य होईल एरवी नाही.

## पउडी १३

मंनै, सुरति होवै मनि बुधि ॥
मंनै, सगल भवण की सुधि ॥
मंनै, मुहि चोटा न खाइ ॥
मंनै, जम कै साथि न जाइ ॥
ऐसा नामु निरंजनु होइ ॥
जे को मंनि जाणै मनि कोइ ॥१३॥

अर्थ – मंनै - प्रभू नामाशी एकरूप झाल्यावर; सुरति होवै - अवस्था प्राप्त होते; मनि - मनात; बुधि - जागृती; सुधि - ज्ञान; चोटा - धोका, फसगत; जम - यम; जमके साथि - यमाबरोबर.

जो परमात्म्याच्या नामात लीन झाला तो अध्यात्मिक दृष्ट्या श्रेष्ठ पदावर पोहचतो. त्याची बुद्धी शुद्ध होते निर्मळ होते. त्याची विचारधारा अत्यंत प्रबळ होते. त्याला साऱ्या ब्रह्मांडाचे सत्य स्वरूप समजून येते. मग तो ह्या माया मोहापासून मुक्त होतो. तो मग भवसागरात गोते खात नाही. संसारिक विकार त्यास विचलित करू शकत नाहीत. तो सदैव ईश्वर नामात निमग्न असतो. सदैव त्याचेच चिंतन

करत असतो. तोच खऱ्या अर्थाने परमेश्वराचा महिमा जाणतो. परमेश्वर सर्वत्र असल्याचा, सर्वव्यापी असल्याचा साक्षात्कार त्याला होतो. मग मृत्यूसुद्धा त्याला शिवू शकत नाही. जो नामस्मरणाने परमेश्वराप्रत पोहोचला आहे, तोच त्या अकाल पुरुषास जाणतो.

## पउडी १४

मंनै, मारगि ठाक न पाइ ॥
मंनै, पति सिउ परगटु जाइ ॥
मंनै, मगु न चलै पंथु ॥
मंनै, धरम सेती सनबंधु ॥
ऐसा नामु निरंजनु होइ ॥
जे को मंनि जाणै मनि कोइ ॥१४॥

अर्थ – **मारगि** - मार्गात; **ठाक** - विघ्न, अडथळा; **ठाक न पाई** - अडचणी उत्पन्न होत नाहीत, अडथळे येत नाहीत; **पति सिउ** - प्रतिष्ठा प्राप्त होते, मान मिळतो; **परगटू** - प्रसिद्ध पावतात; **मगु** - मार्ग; **पंथु** - मार्ग, रस्ता; **सेती** - सह; **सनबंधु** - संबंधित, परिवार, आप्तेष्ट, सहचर.

जो भक्त प्रभुनामाशी एकरूप झाला त्याला कोणताही मोह मायापाश सन्मार्गा पासून विचलित करू शकत नाही. त्याचे पाऊल कुमार्गाकडे वळत नाही. संसारात तो पूर्णपणे यशस्वी होऊन सर्वांच्या आदरास पात्र होतो. परमेश्वराकडे जाणारे अनेक मार्ग लोक सांगतात पण त्यापैकी कोणत्याही मार्गाकडे त्याचे पाऊल वळत नाही. तो आपल्या भक्ती मार्गावर अढळ राहून, धर्माचे आचरण करून केवळ स्वत:चाच उद्धार करून घेतो असे नव्हे, तर आपले आप्त स्वकीय, सहकारी, शेजारपाजारी साऱ्यांनाच सन्मार्गावर चालण्यास मार्गदर्शक ठरतो.

## पउडी १५

मंनै, पावहि मोखु दुआरु ॥
मंनै, परवारै साधारु ॥
मंनै, तरै तारे गुरू सिख ॥
मंनै, नानक भवहि न भिख ॥
ऐसा नामु निरंजनु होइ ॥
जो को मंनि जाणै मनि कोइ ॥१५॥



अर्थ – **पावही** - प्राप्त करतो, शोधून काढतो; **मोख** - मोक्ष, मुक्ती; **दुआरू** - द्वार, दरवाजा; **परवारै** - परिवाराचा; **साधारू** - आधारासहित; **तरै** - तरून जातो; **तारे** - तारून नेतो; **सिख** - शिष्यांनां; **भवहि न भिख** - भीक मागत हिंडावे लागत नाही.

प्रभू नामाशी एकरूप झालेल्या भक्तास त्याच्या ह्या नामभक्तीमुळे मोक्षाचे दार उघडले जाते. तो मोक्षाचा अधिकारी बनतो. एवढेच नव्हे तर त्याच्या आसपासच्या सर्वजणांच्या परिवारातील सर्वांच्या, अध्यात्मिक उन्नतीचा तो आधार होतो. तो स्वत: तर भवसागर तरून जातोच, पण गुरू बनून, मार्गदर्शक बनून तो इतर शिष्यांनाही भवसागर तरून जाण्यास सहाय्यभूत होतो. अशा भक्ताचा एक परमेश्वर मात्र तारणहार होतो. त्याला इतर कोणापुढे हात पसरावे लागत नाहीत. भगवद् गीतेत भगवान श्रीकृष्णानी सांगितले आहे की 'योगक्षेम वहाम्यहम्' ह्या वचनाची त्यास पूर्ण प्रचिती येते. त्या नि:ष्कलंक परमतत्त्वाशी तो एकरूप होऊन जातो. असा आहे नामजपाचा, नामसंकीर्तनाचा, नामश्रवणाचा महिमा.

## पउडी १६

पंच परवाण, पंच परधानु ॥
पंचे, पावहि दरगहि मानु ॥
पंचे, सोहहि दरि राजानु ॥
पंचा का गुरु एकु धिआनु ॥
जे को कहै, करै वीचारु ॥
करते कै करणै, नाही सुमारु ॥
धौलु धरमु, दइआ का पूतु ॥
संतोखु थापि रखिआ जिनि सूति ॥
जे को बुझै होवै सचिआरु ॥
धवलै उपरि केता भारु ॥
धरती होरु, परै होरु होरु ॥
तिस ते भारु, तलै कवणु जोरु ॥
जीअ जाति, रंगा के नाव ॥
सभना लिखिआ वुड़ी कलाम ॥
एहु लेखा लिखि जाणै कोइ ॥
लेखा लिखिआ केता होइ ॥

केता ताणु, सुआलिहु रूपु ॥
केती दाति, जाणै कौणु कूतु ॥
कीता पसाउ, एको कवाउ ॥
तिस ते होए लख दरीआउ ॥
कुदरति कवण, कहा वीचारु ॥
वारिआ न जावा एक वार ॥
जो तुधु भावै साई भली कार ॥
तू सदा सलामति निरंकार ॥१६॥

अर्थ – **पंच** – पांच, श्रेष्ठ पुरूष, सन्त पुरुष, पंच, पुढारी; **परवाण** – मान्य करणे, कबूल, मान्य; **परधानु** – प्रधान; **दरगहि** – दरबारात; **मानु** – सन्मान, आदर; **सोहहि** – शोभून दिसतो, सुशोभित होतो; **दरि** – द्वारी, दरबारात; **धिआनु** – ध्यान, चित्ताची एकाग्रता; **कहै** – सांगितले, कथन केले; **विचारू** – विचार केला, परमेश्वरी लीलेचा विचार; **सुमारु** – हिशोब, जमा खर्च; **धौलु** – बैल; **धरमु** – धर्म; **दइआ** – दया; **पूतु** – पुत्र; **थापि रखिआ** – निर्माण केले, प्राप्त केले; **जिनी** – ज्याने, ज्यामुळे. **सूति** – सूत्रात; **बुझै** – समजणे, समजावणे; **सचिआरु** – सत्याचा प्रकाश. **केता** – किती; **भारु** – भार, वजन, ओझे. **धरती होरु** – पृथ्वीच्या खाली; **परै** – नंतर, त्याच्या खाली; **तिस ते** – त्या बैलाच्या; **तलै** – खाली. **कवणू जोरु** – कोणाचा आधार; **जीअ** – जीव; **वुड़ी** – सतत, अविरत, न थांबता; **कलाम** – लेख; **लिखि जाणै** – लिहिल्याप्रमाणे; **कोई** – क्वचितच, विरळा; **लेखा लिखिआ** – जमा खर्च लिहिला, गणती केली; मोजमाप केले; **केता होई** – किती होईल, अगणित होईल, अपरंपार होईल; **पसार** – पसारा, व्याप; **ताणु** – बळ, सामर्थ्य; **सुआलिहु** – सुंदर; **कूतु** – कुवत, क्षमता; **दाति** – दान.

ह्या पउडीमध्ये गुरु नानकदेवांनी 'पंच' 'पंचे' हे शब्द जे वापरले आहेत त्याचा अर्थ नीट समजावून घेतला पाहिजे. रूढ अर्थाने ग्रामाचा कारभार पहाण्यासाठी निवडून आलेला 'पंच', या अर्थाने गुरू नानक देवांनी हा शब्द वापरलेला नाही. तर ज्याने स्वतःचे पंचप्राण परमेश्वराच्या नामरूपाशी एकरूप केलेले आहेत, अशा ईश्वर भक्तास गुरू नानक देव 'पंच' ह्या संबोधनाने संबोधतात. अर्थात 'पंच' ह्या पदास पोहोचण्यासाठी काही गुण अंगी बाणवावे लागतात. काही गोष्टींचा त्याग करावा लागतो.

पांच गुण – निवृत्ती, धैर्य, निर्मलता, समानता आणि यथालाभ संतोष हे



पाच गुण 'पंचा' जवळ असले पाहिजेत. तसेच काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या विकारांवर विजय प्राप्त केलेला भक्तच 'पंच' ह्या उपाधीस योग्य ठरतो. अशा संतत्वाप्रत पोहोचलेला भक्त. परमेश्वराचे दरबारात सन्मानास प्राप्त होतो.

पण अशा रीतीने सन्मानित झालेल्या कोणाच्या मनात असा भाव उत्पन्न झाला की मी परमेश्वराला पूर्णपणे जाणले आहे, परमेश्वरी लीलेचे मला पूर्ण ज्ञान झाले आहे, तर हा त्याचा भ्रम आहे. कारण परमेश्वराचे, त्याच्या लीलेचे, त्याच्या रचनेचे, कार्याचे पूर्ण ज्ञान कोणास ही झालेले नाही. परमपिता परमेश्वर अनंत आहे. त्याचे कार्य कर्तृत्त्व अपार आहे.

ह्या साऱ्या सृष्टीचे व्यवहार सुचारू रूपाने कसे चालतात? हे स्थैर्य कसे प्राप्त झाले? कोणी विद्वान तर्कद्वारे त्याचे विवेचन करू जाईल तर तो फसेल. हे तर्कवादी म्हणतात की पृथ्वी बैलाच्या पाठीवर स्थिर आहे. काय हे खरे आहे? काय बैल एवढा भार सहन करू शकेल? बरे तर्कासाठी क्षणभर हे मानले की सृष्टी बैलाच्या पाठीवर उभी आहे, मग प्रश्न उत्पन्न होतो की बैल कोणत्या आधारावर उभा आहे? उत्तर येईल धरती. मग ही धरती कशाच्या आधारे स्थिर आहे? उत्तर – बैलाच्या. ही प्रश्नोत्तरे कितीही वेळा केली तरी मूळ प्रश्न अनुत्तरीतच राहातो. म्हणून भक्ताने अशा तर्काटापासून दूर रहावे.

गुरू नानक देव म्हणतात – ह्या साऱ्या सृष्टीचे व्यवहार धर्माच्या आधारावर चालतात. धर्म हाच तो बैल आहे. आपल्या पूर्वजांनीही सांगितले आहे. "धारणात धर्मइत्याहू, धर्मो धारयते प्रजा." धर्मानेच ह्या सृष्टीची धारणा झाली आहे. आणि धर्माचे मूळ एकच आहे 'दया.' दया ही धर्माची माता आहे. आणि दयामूलक धर्माच्या आधारावरच सृष्टीचे सर्व व्यवहार आधारित आहेत. सृष्टी स्थिर आहे. खरा भक्त हे जाणतो. तो वर वर्णन केलेले पांच गुण (सत्य, संतोष, धैर्य, धर्म, दया) अंगी बाणवून व पंचेंद्रियांच्या विषयांवर (शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध) ताबा मिळवून परमेश्वराच्या नामरूपात एकरूप होतो. तो भक्त प्रभूच्या दरबारात श्रेष्ठ पदास प्राप्त करतो.

परमेश्वराची लीला अगाध आहे. त्याचा पार कोणालाही लागू शकलेला नाही. ह्या सृष्टीत त्याने अगणित प्रकारचे जीव, जंतू, वृक्ष, वल्ली, पशुपक्षी, प्राणी निर्माण केले आहेत. प्रत्येकाचे रूप वेगळे, रंग वेगळा, शरीराची रचना वेगळी, आहार विहार वेगळा, एवढेच नव्हे तर प्रत्येकाचा कर्म लेख ही वेगळा. त्या सृष्टीच्या सौंदर्याचा, विविधतेचा, कोणाला तरी पार लागणे शक्य आहे का? केवळ अशक्य

आहे ! आणि मग मनात प्रश्न उत्पन्न होतो. की - परमेश्वराने हे सारे का निर्माण केले असावे ?

परमेश्वर एक आणि एकच आहे. पण त्याच्या मनात आले. ''एको हं, बहुस्यामि '' मी एकाचा अनेक होईन आणि त्यानेच ही विविध रूपे धारण करून, सृष्टीची रचना केली आहे.

त्या सर्वांची यादी करणेही कोणास शक्य होईल का ? त्या प्रत्येकाचे रुप, गुण, क्षमता यांचा पार लागत नाही. हे परमेश्वरा, तुझ्या लीलेची पारख करावयाची माझ्यात मुळीच क्षमता नाही. नामस्मरणाने तुला प्रसन्न करून घेणे येव्हढेच मी जाणतो. हे प्रभो, तुझे अस्तित्व सर्वत्र आहे. तू सर्वशक्तीमान आहेस. सर्व समर्थ आहेस. मी इतका क्षुद्र आहे की त्या प्रभू परमेश्वराच्या चरणी एकवेळही समर्पित होण्यास लायक नाही. हे परमेश्वरा तू जे करतोस ते योग्य आहे. त्याचे विश्लेषण करण्याची माझी क्षमता नाही. तुझ्या आज्ञेत राहून तुझे नामस्मरण करावे हेच माझे काम मी जाणतो. हा प्रभू परमेश्वर भूत, वर्तमान, भविष्य, सर्वकाळ स्थिर व अस्तित्वमान आहे.

### पउडी १७

असंख जप असंख भाउ ॥
असंख पूजा असंख तप ताउ ॥
असंख गरंथ मुखि वेद पाठ ॥
असंख जोग मनि रहहि उदास ॥
असंख भगत, गुण गिआन वीचार ॥
असंख सती, असंख दातार ॥
असंख सूर, मुह भख सार ॥
असंख मोनि, लिव लाइ तार ॥
कुदरति कवण, कहा वीचार ॥
वारिआ न जावा एक वार ॥
जो तुधु भावै साई भली कार ॥
तू सदा सलामति निरंकार ॥१७॥

अर्थ – असंख- असंख्य, अगणित; भाउ – भाव, श्रद्धा, प्रेम; तपताउ – तपश्चर्या; गरंथ- ग्रंथ, पोथी; मुखि- मुखोद्गत, जोग – योग, मनि- मनात; रहहि- रहातात; गिआन- विचार, ज्ञानाचा विचार; सती- सत्यधर्मी; दातार- दाते; सूर- शूरवीर; मुह भखसार- शस्त्रास्त्रांच्या घावांना धैर्याने सामोरे जातात; मोनि- मौनव्रत धारण करणारे; लिवलाइ तार- अखंड समाधीत मग्न असतात; वारिआ – समर्पित होणे; बलिदान करणे; तुधु- तुला.



परमेश्वरी लीलेचे काय वर्णन करावे ! ह्या जगात असंख्य लोक नामजपाद्वारे परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात; तर अनेक लोक श्रद्धायुक्त अंत:करणाने परमेश्वरास भजताना दिसतात. अगणित लोक निरनिराळ्या प्रकारे तुला पूजत असतात; तर कितीतरी लोक निरनिराळ्या तप:साधनेद्वारा तुला प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. अनेक ग्रंथांचे पारायण करणारेही असंख्य लोक आढळतात. तर कैक लोकांनी सारे वेद मुखोद्गत केले आहेत.

नाना प्रकारच्या योगसाधनांद्वारा परमेश्वरप्राप्तीच्या प्रयत्नात निमग्न झालेले अनेक लोक दिसतात. अनेकजण सर्व संग परित्याग करून ईश्वरचरणी लीन झालेले आढळतात. अनेक भक्त परमेश्वरीगुणांचा, परमेश्वरी ज्ञानाचा विचार करतात, तर अनंत सत्यव्रताचे पालन करून परमेश्वर प्राप्तीच्या प्रयत्नात असतात. कोणी दानांचे मार्गाने तुझ्याजवळ येण्याचा प्रयत्न करतात. असंख्य शूरवीर तुझ्याच प्राप्तीसाठी रणांगणात आनंदाने शस्त्रांचे वार झेलत आत्मबलिदान करतात. अनेक लोक मौनव्रत धारण करून, तर अनेकजण अखंड समाधीद्वारे तुला प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

परमेश्वरा तुझ्या लीलेचे मी किती वर्णन करू ? माझ्यात ते सामर्थ्य नाही, क्षमता नाही. वरीलपैकी कोणता ही गुण माझ्यात नाही. मी एक गरीब पामर आहे. तू अनंत आहेस. अटल आहेस. तुझे सामर्थ्य अगाध आहे. तुला योग्य वाटेल तेच कार्य योग्य आहे. मी त्याच मार्गाने जाईन.

### पउडी १८

असंख मूरख अंध घोर ॥
असंख चोर हरामखोर ॥
असंख अमर करि जाहि जोर ॥
असंख गलवढ, हतिआ कमाहि ॥
असंख पापी, पापु करि जाहि ॥
असंख कूड़िआर, कुड़े फिराहि ॥
असंख मलेछ, मलु भखि खाहि ॥
असंख निंदक, सिरि करहि भारु ॥

नानकु नीचु कहै वीचारु ॥
वारिआ न जावा एक वार ॥
जो तुधु भावै साई भली कार ॥
तू सदा सलामति निरंकार ॥१८॥

**अर्थ – मुरख अंध घोर**- तमोगुणाने घोर अंधकारात बुडालेले महामूर्ख लोक; **हरामखोर**- दगलबाज, विश्वासघातकी, दुसऱ्याचे धन हडप करणारे; **अमर**- ताकतवान, सत्ताधीश; **जोर**- अन्याय, अत्याचार; **करिजाहि**- सतत करत असतात; **गलवढ**- गळा घोटणे, जीव घेणे; **हतिआ**- हत्या; **हतिआ कमाई** - दुसऱ्याची हत्या करून त्याची संपत्ती लुटणारे; **कुड़िआर** - असत्याचे मायेत गुरफटलेले; **कूड़े** - असत्यात, खोटेपणात, मायेच्या भोवऱ्यात; **फिरहि**- फिरत राहतात; **मलेछ**- वाईट विचाराचे, मलीन विचाराचे; **खाहि**- खातात; **मलु भखि खाहि**- अर्धाशासारखे सतत वाईट कर्म करत राहतात; **निंदक**- निंदा करणारे; **सिरि करहि भारू**- डोक्यावर पापाचा भार वाहतात; **नानक नीचु**- (गरीब बिचारा), पामर, क्षुद्र; **कहै विचारु** - काय विचार करु शकणार.

सतराव्या पउडीमध्ये गुरु नानक देवांनी सत्वगुणी लोकांचे वर्णन केले आहे. आता ह्या पउडीत ते तमोगुणी लोकांचे वर्णन करत आहेत.

नानक म्हणतात, परमात्म्याची लीला अगाध आहे. ह्या जगात जसे सत्वगुणी भले लोक असंख्य आहेत, तसेच पापी दुराचारी तमोगुणी माणसेही अगणित आहेत. असंख्य महामूर्ख लोक तमाच्या घोर अंधःकारात गोते खात आहेत. असंख्य चोर, दगलबाज विश्वासघातकी लोक आहेत. आपल्या शक्तीसामर्थ्याच्या जोरावर, सत्तेच्या जोरावर, अनंत अत्याचार करणारेही अगणित आहेत. दुसऱ्यांचा गळा घोटून, त्यांचे प्राण घेऊन, त्यांची संपत्ती हडप करणारे असंख्य लोक आहेत. असंख्य पापी लोक अहर्निश पापकर्म करत असतात. अनेक लोक मोहमायेच्या, असत्याच्या, भोवऱ्यात चक्कर काटताना दिसतात. अनेक दुष्ट विचारी माणसे आपल्या दुष्ट विचारामुळे अधाशासारखी सतत दुष्कृत्ये करतात. अनेक लोक सतत दुसऱ्यांची निंदा करतात. अशी दुराचारी तमोगुणी असंख्य माणसे तमोगुणाने लिप्त झालेली आपण पाहतो. गुरुनानक देव म्हणतात. त्यांची यादी, त्यांचे वर्णन करण्याचे सामर्थ्य मज पामरास नाही. मी एकच जाणतो ते हे की तो प्रभू परमेश्वर सदा स्थिर आहे.



## पउडी १९

असंख नाव, असंख थाव ॥
अगंम अगंम असंख लोअ ॥
असंख कहहि, सिरि भारु होइ ॥
अखरी नामु अखरी सालाह ॥
अखरी, गिआनु गीत गुण गाह ॥
अखरी, लिखणु बोलणु बाणि ॥
अखरा सिरि, संजोगु वखाणि ॥
जिनि एहि लिखे, तिसु सिरी नाहि ॥
जिव फुरमाए, तिव तिव पाहि ॥
जेता कीता, तेता नाउ ॥
विणु नावै, नाही को थाउ ॥
कुदरति कवण, कहा वीचारु ॥
वारिआ न जावा एक वार ॥
जो तुधु भावै साई भली कार ॥
तू सदा सलामति निरंकार ॥१९॥

**अर्थ – नाव**- पशुपक्षी, पदार्थांची नावे; **थाव**- स्थान; **अगंम**- अगम्य; ज्याचा अंत लागत नाही, जे समजू शकत नाही असे; **लोअ**- लोक, स्थान, ठिकाण; **कहही**- सांगतात; **सिरी**- शिरावर; **अखरी** - अक्षरात; **सालाह** - प्रशंसा; **संजोगु** - भाग्यलेख; **वखाणि** - वाणीने सांगणे; **तिसू** - त्याच्या; **जिनि** - ज्याने, ज्या परमेश्वराने; **एहि** - भाग्य लेखाची ही अक्षरे; **जिव** - ज्या तऱ्हेने, ज्या रितीने, जसा; **फुरमाए** - फर्मावतो, (हुकुम करतो), आज्ञा देतो; **तिव तिव** - तसे तसे; **पाहि** - प्राप्तकरतो, भोगतो; **जेता** - जितका; **कीता** - निर्माण केलेला हा संसार; **तेता** - ते सगळे; **नाऊ** - नाव, रुप, स्वरुप; **विणु नावै** - (नावा शिवाय), नामाविना;

तो परमपिता परमेश्वर कोठे कोठे आहे? तो तर सर्वत्र सर्वव्यापी आहे तो नाही असे स्थान शोधून ही सापडणार नाही. ही जी सारी सृष्टी आहे त्यात ज्या नाना वस्तू आहेत, जीव जंतू आहेत, पशू, पक्षी, प्राणी आहेत ही सारी त्याचीच रुपे आहेत. त्यांची मोजदाद करता येत नाही. त्या सर्वांची नावे असंख्य, रुपे असंख्य, शब्दांनी ती लिहिणे, अंकांनी ती मोजणे केवळ अशक्य. जे असंख्य

लोक- इंद्रलोक, वैकुंठलोक, देवलोक आदी अगणित लोक हीसुद्धा त्याचीच रुप आहेत. ह्या सर्वांची नावे सांगणे लिहिणे केवळ असंभव आहे. सारे शब्द अपुरे आहेत. ईश्वर हा त्या सर्व शब्दांच्या पलीकडे आहे. पण काय करणार ? आपण मानव प्राणी शब्दाच्या माध्यमातूनच त्याला जाणू शकतो. शब्दाच्या सहाय्यानेच त्याची स्तुती करू शकतो. शब्दांच्या सहाय्याने, गीतांच्या माध्यमातून, त्याचे गुण कीर्तन करू शकतो. परमेश्वराने प्रत्येकाचे ललाटी त्याचा त्याचा कर्मलेख लिहिला आहे. पण विशेष गोष्ट ही की- परमेश्वराच्या ललाटी कोणताच कर्मलेख नाही. तो स्वतः निरंकुश आहे. कर्म, अकर्माच्या पलीकडे. कर्तुम अकर्तुम, सर्व शक्तीमान आहे. ही सारी सृष्टी परमेश्वराच्या इच्छेनेच चालत आहे. त्याच्याच आज्ञेने सर्व काही घडत असते. म्हणूनच परमेश्वराचे पूर्ण वर्णन करण्याची क्षमता कोणातही नाही. जे त्याला आवडेल (तेच चांगले), तेच योग्य, तसेच घडणार. तो सदा सर्वत्र विद्यमान आहे. तो मायेच्या अतीत आहे. स्वयं प्रकाशी, नित्य स्वरुप आहे.

## पउडी २०

**भरीऐ हथु पैरु तनु देह ॥**
**पाणी धोतै, उतरसु खेह ॥**
**मूत पलीती कपडु होइ ॥**
**दे साबूणु, लईऐ ओहु धोइ ॥**
**भरीऐ मति, पापा कै संगि ॥**
**ओहु धोपै, नावै कै रंगि ॥**
**पुंनी पापी, आखणु नाहि ॥**
**करि करि करणा, लिखि लै जाहु ॥**
**आपे बीजि, आपे ही खाहु ॥**
**नानक, हुकमी आवाहु जाहु ॥२० ॥**

अर्थ – **भरीऐ** - भरतात, मलीन होतात; **धोतै** - धुतल्याने; **उतरसु** - निघून जातो, स्वच्छ होते; **खेह** - माती, मळ, धूळ; **मूत** - मूत्र, लघवी; **पलीती** - अपवित्र होणे; **ओहु** - तो खराब झालेला; **धोइ** - धुतले जाते; **मति** - बुद्धी, विचार; **संगी** - संगतीने; **धोपै** - धुतले जाते; **नावै** - नामजपाने; **नावै के रंगि** - परमात्म्याच्या नामजपाच्या सहाय्याने; **पुंनी** - पुण्यवान; **आखणु** - नावापुरते, **करिकरि करणा** - जसे कर्म करू त्याप्रमाणे; **लिखि** - लिहून; **लिखि लै जाहू** - बरोबर घेवून जातो; **आपे** - आपण स्वतः; **बीजि** - पेरले; **खाहु** - प्राप्त करतो; **आवहु जाहु** - येतो व जातो;



नामजपाचे महत्त्व समजावून सांगतांना गुरु नानकदेवजी साधा दैनंदिन जीवनातील दृष्टांत देतात. ते म्हणतात -

दैनंदिन व्यवहार करत असताना आपले शरीर, कपडे धुळीने माखतात. ते पुनरपी स्वच्छ करण्यासाठी आपण ते पाण्याने स्वच्छ करतो. लहान मुलांचे कपडे मलमूत्राने मलिन होतात. साबण लावून आपण ते धुवून स्वच्छ करतो. त्याचप्रमाणे कुसंगतीने, वाईट विचाराने आचाराने आपले मन सदैव मलिन होते व त्यांचीओढ पापाकडे, दुराचरणाकडे निर्माण होते. नाम जपाच्या सहाय्याने ते शुद्ध होते. पण केवळ मुखाने नामस्मरंण, पण हाताने मात्र मिथ्याचरण करणे हा मिथ्याचार होय. नामस्मरणा बरोबर आपले कर्म ही शुद्ध असले पाहिजे. प्रत्येक कर्म ईश्वरार्पण बुद्धीने केले पाहिजे.

पाप पुण्य हे केवळ शब्द नाहीत. ईश्वरी नियमच आहे की पेरावे तसे उगवते. वाईट कर्माचे फळ नेहमी वाईटच असते. ते आपणास पापाकडे नेते. ह्या उलट चांगले कर्म केले तर त्याचे फळही चांगले, पुण्यप्रद होते. म्हणून नामजपाबरोबरच हातून चांगले कर्म घडेल ह्याचे सदैव ध्यान ठेवावे. तू जे जे कर्म करतोस त्याची गणती, नोंद, प्रभूकडे ठेवली जाते. व त्याप्रमाणे तुला पुढचा जन्म प्राप्त होतो. व तो जन्ममृत्यूच्या चक्रात फिरत राहतो. जो आपले जीवन प्रभू इच्छेप्रमाणे चालवतो, त्याचे जीवन सफल होते. तो प्रभूपदापर्यंत पोहोचतो.

मनुष्य मायेच्या प्रभावाने विकारवश होतो. ही विकारवशता त्याची बुद्धी भ्रष्ट करते, मलीन करते. ही मलीनता माणसास प्रभूपासून दूर नेते. त्याला माया पाशात जखडून टाकते. त्यास अनंत दुःखे, अनंत यातना भोगावयास लावते. नामस्मरणाने व शुद्ध आचरणाने हे बुद्धिमालिन्य दूर होते. मन स्वच्छ होते. निर्मल होते. जसजसा माणूस नामस्मरणात रंगून जातो, तसतशी त्याची बुद्धि अधिकाधिक स्वच्छ होते. मायेच्या पाशातून तो मुक्त होतो. दुःखसागरातून पार होतो व अंती परमेश्वराच्या दरबारात, प्रभूच्या सानिध्यात, त्यास स्थान प्राप्त होते.

## पउडी २१

**तीरथु तपु दइआ दतु दानु ॥**
**जे को पावै, तिल का मानु ॥**
**सुणिआ, मंनिआ, मनि कीता भाउ ॥**
**अंतरगति तीरथि, मलि नाउ ॥**

सभि गुण तेरे, मै नाही कोइ ॥
विणु गुण कीते, भगति न होइ ॥
सुअसति आथि बाणी बरमाउ ॥
सति सुहाणु सदा मनि चाउ ॥
कवणु सु वेला, वखतु कवणु कवण थिति, कवणु वारु ॥
कवणि सि रुती, माहु कवणु, जितु होआ आकारु ॥
वेल न पाईआ पंडती, जि होवै लेखु पुराणु ॥
वखतु न पाईओ कादीआ, जी लिखनि लेखु कुराणु ॥
थिति वारु न जोगी जाणै, रुति माहु न कोई ॥
जा करता सिरठी कउ साजे, आपे जाणै सोई ॥
किव करि आखा किव सालाही, किउ वरनी किव जाणा ॥
नानक, आखणि सभु को आखै, इक दू इकु सिआणा ॥
वडा साहिबु वडि नाई, कीता जा का होवै ॥
नानक, जे को आपौ जाणै, अगै गइआ न सोहै ॥२१ ॥

**अर्थ – तिरथु**- तीर्थस्थान; **तपु**- तप; **दइया**- दया; **दानु**- दान; **जे को;** - जे काही; **पावै**- मिळवतात, मिळते; **तिल**- तीळ, **तिला का मानु**- तिळमात्र, अगदी कमी, नगण्य; **सुणिआ**- नामश्रवण; **मनिआ**- आत्मसात केले; **किता भाउ**- प्रेम केले, आचरणात आणले; **अंतरगति**- आंतरिक; **तीरथि**- तीर्थात; **मलि**- चोळून मोळून; **नाऊ**- स्नान केले; **विणु गुण कीते**- परंतु तुझे गूण माझ्यात उत्पन्न केले नाहीस; **भगति**- भक्ति, **सुअसति**- तुझा सदा जय जयकार असो. **सति**- सदा स्थिर, परमसत्य; **अति**- तू स्वत:; **बाणी**- वाणी, वाचा; **बरमाउ** - ब्रह्मा; **सुहाणु** - सुन्दर; **मनि**- मनात; **चाउ**- प्रफुल्लता; **जितु**- जेव्हा; **होआ**- निर्माण झाले; **आकारु**- सृष्टी; **पाइआ**- माहीत होणे; प्राप्त होणे; **जि**- नाहीतर; **लिखू**- लिहिणे; **कादीआ**- काजी; **जा करता**- कर्ता; **सिरठीकउ साजे**- सृष्टी केव्हा निर्माण केली; **आपे सोई**- (परमेश्वर) तू स्वत:; **किव करि**- कशा तऱ्हेने, कोणत्या शब्दात; **आखा** - व्यक्त करु; **सालाहि**- प्रशंसा करणे; **वरनि**- वर्णन; **जाणा**- जाणणे, ज्ञान होणे; **सभु**- सगळे; **आखणि आखै**- सांगण्याचा प्रयत्न करतात; **इकु दु सिआणा**- प्रत्येक जण दुसऱ्यापेक्षा स्वत:स अधिक शहाणा समजून; **वडा**- मोठा, श्रेष्ठ; **साहिबु**- परमेश्वर; **नाई**- श्रेष्ठता, मोठेपणा; **जे को** - ज्याचा (परमेश्वराचा); **आपौ**- आपल्या बुद्धिचे जोरावर; **जाणै**- जाणण्याचा प्रयत्न



करतो; **न सोहै**- आदरास प्राप्त करू शकत नाही. **अगै गइआ**- परमेश्वराचे दरबारात गेल्यावर;

गुरु नानक देवांनी पापपुण्याचा विचार मांडल्यावर शिष्यांना परत एकदा तीर्थ स्थाने, व्रतवैकल्पे आदीची आठवण झाली. ते गुरुदेवांना म्हणतात, ''तीर्थ स्थानी जाऊन तीर्थात अंघोळ केल्यानेही पुण्य प्राप्त होते ना ? दुसऱ्यावर दया केल्याने, दान केल्याने ही पुण्य लाभते ना ?

गुरु नानक देवजी म्हणतात. होय तीर्थस्थान केल्याने, दया केल्याने, दान केल्याने पुण्य लागते हे खरे आहे; पण नामजप, नामश्रवण केल्याने, प्रभूशी एकरूप झाल्याने मिळणाऱ्या पुण्याशी तुलना करता ते अत्यल्प, तीळमात्र असते. नामजपाने प्रभूशी नाते जोडल्याने अंत:करण शुद्ध होते, पवित्र होते. आपल्या प्रत्येक कृतीत अहंकार असतो. मी तीर्थस्थान केले, मी दान केले, मी दया केली. हा मी, मी, मीच आपणास प्रभूपासून दूर ठेवतो. ही मीपणा, हा अहंकार सोडून दिला पाहिजे. मी कोणी नाही. माझ्या अंगी असलेले सारे गुण तूच दिले आहेस. जर तू हे गुण माझ्यात पैदा केले नसतेस तर मी काहीही करू शकलो नसतो. तुझी भक्तीही करू शकलो नसतो. हे परमेश्वरा तुझा सदा जयजयकार असो. तूच वाणी आहेस, तूच परमब्रह्म आहेस, तू सदा स्थिर आहेस, सुंदर आहेस, प्रफुल्लित आहेस, तेजस्वी आहेस.

हे परमेश्वरा तू ही सृष्टी केव्हा निर्माण केलीस ? कोणत्या ऋतूत, कोणत्या महिन्यात कोणत्या वारी, कोणत्या तिथीस, कोणत्या वेळी, कोणत्या सुमुहुर्तावर ही सृष्टी निर्माण केलीस हे कोणासही माहीत नाही ? कारण कोणा शास्त्रीपंडितास हे कळले असते तर त्याने त्यावर एक पुराणच लिहिले असते. कोणा काजीला हे कळले असते तर त्याने त्यावर कुराणच लिहिले असते. कोणा योग्यालाही सृष्टीची उत्पत्ती केव्हा झाली हे योग सामर्थ्याने जाणता आलेले नाही. हे परमेश्वरा, ही सृष्टी तू निर्माण केलीस. त्यामुळे ती केव्हा केलीस हे केवळ तू एकटाच जाणतोस. मी तुझे मोठेपण कसे वर्णन करू ? तुझ्या गुणांची महती मी कशी वर्णन करू ? हे परमेश्वरा तू सर्व श्रेष्ठ आहेस. जे काही जगात घडत आहे ते तूच घडवतोस. तुझे मोठेपण ह्या सर्वाहून महान आहे. तरीही प्रत्येक माणूस स्वत:ला दुसऱ्यापेक्षा अधिक शहाणा समजून तुझे मोठेपण वर्णन करण्यांचा प्रयत्न करतच असतो. बुद्धीच्या जोरावर तुला जाणण्याचा प्रयत्न करणाऱ्यास तुझ्या दरबारात मुळीच स्थान नाही. हे परमात्मा ! तू खरोखर सर्व श्रेष्ठ आहेस. तूच हे सारे घडवले आहेस. तूच त्यांचा चालक मालक पालक आहेस.

## पउडी २२

पातल पाताल लख, आगासा आगास ।।
ओड़क ओड़क भालि थके, वेद कहनि इक वात ।।
सहस अठारह कहनि कतेबा, असुलू इकु धातु ।।
लेखा होइ त लिखीऐ, लेखै होइ विणासु ।।
नानक वडा आखीऐ, आपे जाणै आपु ।।२२ ।।

अर्थ – **आगास** - आकाश; **ओड़क** - अंत, परिसीमा; **भालि थके** - शोधता शोधता थकून गेले; **एक वात** - एक मताने; **सहस** - सहस्र, हजार; **कतेबा** - इसाई, इस्लाम, चे धर्म ग्रंथ; **असलु** - मूलतः; **इकु धातु** - परमेश्वर, मूळ पुरुष; **विणासु** - विनाश, अंत; **वडा** - मोठा, महान; **जाणै** - जाणतो;

परमात्म्याने निर्माण केलेल्या ह्या बहुविधा सृष्टीचे वर्णन ऐकून शिष्यांच्या मनात सृष्टीचा पसारा जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यावर गुरू नानकदेव सांगतात– आपणास दिसते त्या आकाशावर लाखो आकाशे, पाताळा खाली लाखो पाताळांची कल्पना केलीत तरी, ह्या सृष्टीच्या पसाऱ्याचा अंत लागत नाही, असे सारे वेद एक मुखाने सांगत आहेत. इस्लामी व ख्रिश्चन धर्म ग्रंथाप्रमाणे अठरा हजारपट सृष्टीचा पसारा आहे. पण हे सारे गहन आहे. ह्याची गणती होत नाही. अनेक ऋषीमुनी विद्वान पंडित हा शोध घेता घेता थकले, या जगातून निघून गेले. त्यांनाही या सृष्टीचा अंत सापडला नाही. मग आपणही ह्या चर्चेत आपली बुद्धी व्यर्थ का वाया घालवता ? एक गोष्ट स्पष्ट आहे व ती एक मात्र खरी आहे, की ही सृष्टी त्या परमेश्वराने निर्माण केली आहे त्यालाच ह्या सृष्टीच्या पसाऱ्याचे ज्ञान आहे. अन्य कोणासही नाही. तीच गोष्ट परमेश्वराची, सारेजण परमेश्वराच्या मोठेपणाचे वर्णन करतात. पण कोणीही ते पूर्णत्वाने करू शकलेला नाही. ज्या परमेश्वराने ही सारी सृष्टी उत्पन्न केली त्याचे मोठेप ा केवळ तोच जाणतो.

## पउडी – २३

सालाही सालाहि, एती सुरति न पाईआ ।।
नदीआ अतै वाह, पवहि सामुंदि न जाणीअहि ।।
समुंद साह सुलतान, गिरहा सेती मालु धनु ।।
कीड़ी तुलि न होवनी, जे तिसु मनहु न विसरहि ।।

अर्थ – **सालाही** – स्तुती करण्यायोग्य; **सालाहि** – स्तुती करून; **एती** - इतकी; **सुरति** - ज्ञान, समज; **न पाईया** - प्राप्त होत नाही; **अतै** - जसे;



**समुंद साह सुलतान** - समुद्रांचा सुलतान; **गिरहा सेती** - पर्वता एवढे; **तुलि**- तूलना; **न होवनी**- होणार नाही; **तिसु मनहु**- त्याच्या मनात; **न विसरहि**- जर तू नसशील; **वाह** - ओहोळ; **पवहि** - जावून मिळतो; **न जाणी अहि** - कळत नाही;

परमेश्वराचे मोठेपण कोणासही समजलेले नाही असे गुरू नानकदेवांच्या तोंडून ऐकल्यानंतर, शिष्यांच्या मनात विचार आला की जे भक्त नाम जपाच्या सहाय्याने ईश्वराचे जवळ जावून पोहोचले त्यांना तरी ईश्वराचे मोठेपण निश्चित समजलेले असणार. त्यांचा हा गैरसमज दूर करण्यासाठी गुरू नानकदेवांनी ओहोळ व समुद्राची गोष्ट सांगितली ते म्हणतात–

एक लहान ओहोळ वहात वहात समुद्रास जाऊन मिळतो. पण समुद्रास मिळाल्यावर त्या ओहोळाचे स्वतंत्र अस्तित्व शिल्लकच रहात नाही. तो समुद्राशी एकरूप होऊन जातो. पण तरीही त्यास समुद्राच्या अथांगपणाचे पूर्ण ज्ञान होत नाही. तसेच नामजपाने प्रभू परमेश्वराप्रत पोहोचलेला भक्त परमेश्वराशी एकरूप होतो पण तरीही त्यास परमात्म्याच्या अगाध शक्तीचे ज्ञान होत नाही.

ईश्वर भक्ती केल्यानंतरही परमेश्वराच्या महानतेचा अंत लागत नाही. याचा अर्थ असा नाही की ईश्वर उपासनेचा काहीही लाभ नाही. असा भक्त परमेश्वराच्या दरबारात अत्युच्च स्थान प्राप्त करतो. ईश्वरनामात मग्न झालेल्या भक्तास जगातील धनसंपदा, सत्ता सर्व काही प्रभु नामापुढे क्षुद्र कीटकांहूनही तुच्छ वाटू लागते.

## पउडी २४

अंतु न सिफती, कहणि न अंतु ।।
अंतु न करणै, देणि न अंतु ।।
अंतु न वेखणि, सुणणि न अंतु ।।
अंतु न जापै, किआ मनि मंतु ।।
अंतू न जापै कीता आकारु ।।
अंतु न जापै पारावारु ।।
अंत कारणि केते बिललाहि ।।
ता के अंत न पाए जाहि ।।
एहु अंतु न जाणै कोइ ।।
बहुता कहीऐ बहुता होइ ।।
बडा साहिबु, ऊचा थाउ ।।

ऊचे उपरि ऊचा नाउ ॥
एवडु ऊचा होवै कोइ ॥
तिसु ऊचे कउ, जाणै सोइ ॥
जेवडु आपि जाणै आपि आपि ॥
नानक नदरी करमी दाति ॥२४॥

**अर्थ** – **सिफती** - गुणांचे; **कहणि** - सांगून; **करणै** - केलेला, परमेश्वराची करणी, लीला; **देणि** - दान देणे; **वेखणि** - पाहणे; **सुणणि** - ऐकणे; **न जापै** - समजत नाही, कळत नाही, दिसत नाही; **मनि** - मनात; **मंतु** - विचार; **कीता** - बनवलेले; **आकारु** - आकार, दिसणारे जग; **पारावारु** - पारावार, अंत; **अंत कारणि** - अंत, शेवट पाहण्यासाठी; **केते** - कित्येक माणसे; **बिललाहि** - व्याकुळ होतात; **ता के अंत** - परमेश्वराच्या क्षमतेची कल्पना; **न पाए जाहि** - सापडत नाही, प्राप्त होत नाही;

परमेश्वराच्या अनंतत्वाचे अधिक वर्णन करताना गुरूनानक देवजी पुढे सांगतात –

प्रभूच्या गुणांना अंत नाही. त्याचे गुणांचे वर्णन करण्यास शब्द अपुरेच पडतात. प्रभूची लीला ही अनंत आहे. त्याच्या निर्मितीला ही अंत नाही. त्यांची मोजदाद करताच येणार नाही. त्याचे दातृत्व ही असेच अनंत आहे. तो सदैव सर्वांना सर्व काही देतच असतो. कितीही पाहिले, ऐकले, तरी त्यांच्या गुणांचे, लीलांचे, दातृत्वाचे, पूर्ण वर्णन करता येणार नाही. तो आता आणखी काय काय करणार आहे, कोणत्या लीला दाखवणार आहे, ह्याचा कोणी काहीही अंदाज करू शकत नाही. परमेश्वराने ही सृष्टी निर्माण केली आहे, ती आपण पाहतो. पण पुढे त्याची काय काय स्थित्यंतरे होणार आहेत ते कोणालाच सांगता येत नाही. ते तोच एकटा जाणतो. कित्येक जण परमेश्वराचे, त्याच्या लीलेचे, ज्ञान करून घेण्यासाठी आटोकाट जीव तोडून प्रयत्न करत असतात. पण त्यांचे ते सारे प्रयत्न विफल होतात. वास्तविक परमेश्वराच्या मोठेपणाचा कोणासही पार लागत नाही. त्याच्या मोठेपणाचा जोजो विचार करावा तोतो आपल्या लक्षात येते की परमेश्वर त्या ही पेक्षा मोठा आहे. त्याचे मोठेपण, हेच खरे तर त्याचे वैशिष्ट आहे. जो त्याच्या इतका मोठा होईल त्यालाच त्याचे मोठेपण समजू शकेल. पण ती उंची कोणीही गाठू शकत नाही. जो नामजपाने त्याच्यापर्यंत पोहचतो, तो परमेश्वराशी एकरूपच होऊन जातो. त्याचे मोठेपण तोच एकटा जाणो ! गुरू नानकदेव म्हणतात. त्याच्या (परमेश्वराच्या) कृपा दृष्टीनेच आपणास सारे काही प्राप्त होते.



## पउडी २५

बहुता करमु, लिखिआ न जाई ॥
वडा दाता, तिंलु न तमाई ॥
केते मंगहि जोध अपार ॥
केतिआ गणत नही वीचारु ॥
केते, खपि तुटहि वेकार ॥
केते लै लै मुकरु पाहि ॥
केते मूरख खाही खाहि ॥
केतिआ, दूख भूख सद मार ॥
एहि भि दाति तेरी, दातार ॥
बंदि खलासी, भाणै होइ ॥
होरु आखि न सकै कोइ ॥
जे को खाइकु आखणि पाइ ॥
ओहु जाणै, जेतीआ मुहि खाइ ॥
आपे जाणै, आपे देइ ॥
आखहि सि भि केई केइ ॥
जिस नो बखसे सिफति सालाह ॥
नानक, पातिसाही पातिसाहु ॥२५॥

**अर्थ** – **करमु** - कृपा; **तिलु** - तीळमात्र, थोडीसुद्धा; **तमाइ** - लोभ, तृष्णा, हाव; **केते** - कितीतरी, अनेक; **मंगहि** - मागत असतात; **जोध अपार** - अनेक योद्धे; **गणत** - गणती, मोजणी; **नही विचारु** - विचार करता येत नाही; **खपि खपिके** - उपभोग घेत घेत; **तुटही** - नष्ट होतात; **वेकार** - विषय विकार; **लै लै** - घेत घेत; **मुकर पाहि** - कृतघ्न होतात, परमेश्वरास विसरतात; **केतिआ** - किती तरी जीव; **दूख** - दुःख; **भूख** - उपासमार; **सद मार** - सदा भोगतात, भोगत असतात; **एहि** - ही सुद्धा; **दाति** - कृपा, देणगी; **दातार** - देणारा, दाता, परमेश्वर; **बंदि** - बंदी, बांधलेला; **खलासी** - मुक्तता; **भाणै होइ** - परमेश्वरी आज्ञेत राहिल्याने होते; **होरू** - अन्य मार्ग; **आखि** - सांगू शकणे; **जे को** - जो कोणी; **खाइकु** - मूर्ख मनुष्य; **आखणि पाइ** - सांगण्याचा प्रयत्न करील; **ओहु** - तो मनुष्य; **जाणै** - जाणतो; **जेतीआ** - जितके; **मुहि** -

तोंडावर; खाइ - खातो; आपे - ईश्वर; जाणै - जाणतो; देइ - देतो; आखहि - सांगतो; सि भि - ही गोष्ट ही; केइ केइ - कोणी कोणी; जिस नो - ज्याने; सिफति सालाह - गुण कीर्तन; पातसाही पातिसाहु - राजांचा राजा, महाराज.

प्रभू परमेश्वरांचे गुणगान करताना गुरू नानकदेव पुढे सांगतात– परमेश्वरासारखा श्रेष्ठ दानी दुसरा कोणीही नाही. तो अनंत हस्तांनी देतच राहातो. त्यात यत्किंचितही कृपणपणा करत नाही. येव्हढेच नव्हे तर त्या बदल्यात तो कोणतीही अपेक्षा ठेवत नाही. अगदी निरपेक्षपणे मुक्त हस्ताने तो देत आणि देतच राहातो. अनेक सामर्थ्यशाली लोकही परमेश्वरापुढे याचक बनून उभे असतात. त्याच्या दातृत्वाला कोणतीही सीमा नाही. जो जे मागेल, ते, ते, तो मुक्त हस्ताने देतो त्याची मोजणी गणती करणे ही अशक्य आहे.

पण काय आश्चर्य आहे पहा. ईश्वराकडून सर्व काही घेवूनही, अनेक लोक त्याला पूर्णपणे विसरून जातात व जणू काही हे सारे आपण आपल्याच कर्तृत्वाने मिळवले असे समजून, अहंकाराच्या, मायेच्या मोहपाशात अडकून ईश्वर विमुख होवून विषयोपभोगात रंगून जातात. त्यातच त्यांचा विनाश ही होतो.

या उलट काही लोक जन्मभर दु:ख दैन्यात पिचत असतात. अर्थात ही सुद्धा ईश्वराचीच करणी. पण ही माणसे त्यामुळे नाउमेद होत नाहीत. उलट परमेश्वराचे आभारच मानतात. प्रभू कृपेची आराधना करतात. मोहमायेच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी प्रभूनामाचा आधार घेतात.

काही लोक मोहमायेच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी अन्यमार्गही चोखाळतात. पण त्यांच्या पदरी सर्वत्र निराशा आणि निराशाच येते. प्रभू नामाच्या स्मरणा शिवाय प्रभूनामात लीन होण्याशिवाय मुक्तीचा अन्य मार्ग नाही.

आणखी एक प्रकारचे लोक असतात. ते परमेश्वराकडे काही मागत नाहीत. ते म्हणतात की प्रभू परमेश्वर सर्व काही जाणतो. कोणाला काय हवे आहे हे त्याला माहीत असते. व ते तो त्यास देतो. मग मागायचे कशाला ? मागायचेच झाले तर एकच मागणे मागावे–

"हे देवा मला तुझा कधीही विसर पडू देवू नकोस. माझ्या मनात तुझाच सदैव वास असू दे. तुझ्यातच मला लीन होवू दे." ज्यांच्यावर परमेश्वर आपली कृपा करतो तो राजांचा राजा सर्वश्रेष्ठ महाराज होतो.



## पउडी २६

अमुल गुण, अमुल वापार ॥
अमुल वापारीए, अमुल भंडार ॥
अमुल आवहि, अमुल लै जाहि ॥
अमुल भाई, अमुला समाहि ॥
अमुलु धरमु, अमुलु दीबाणु ॥
अमुलु तुलु, अमुलु परवाणु ॥
अमुलु बखसीस, अमुलु नीसाणु ॥
अमुलु करमु, अमुलु फुरमाणु ॥
अमुलो अमुलु आखिआ न जाइ ॥
आखि आखि रहे लिव लाइ ॥
आखहि, वेद पाठ पुराण ॥
आखहि पड़े करहि वखिआण ॥
आखहि बरमे, आखहि इंद ॥
आखहि, गोपी तै गोविंद ॥
आखहि ईसर, आखहि सिध ॥
आखहि, केते कीते बुध ॥
आखहि दानव, आखहि देव ॥
आखहि, सुरि नर मुनि जन सेव ॥
केते आखहि, आखणि पाहि ॥
केते कहि कहि, उठि उठि जाहि ॥
एते कीते, होरि करेहि ॥
ता, आखि न सकहि केई केइ ॥
जेवडु भावै, तेवडु होइ ॥
नानक, जाणै साचा सोइ ॥
जे को आखै बोलु विगाड़ु ॥
ता लिखिऐ सिरि गावारा गावारु ॥२६॥

अर्थ – अमुल - अमूल्य, अनमोल; वापार - व्यापार; वापारिए - व्यापारी; भंडार - खजिना; आवहि - (व्यापारासाठी) येणारे; लैजाहि - घेऊन जातात; भाइ - भाव (भक्ती भावें); समाहि - सामावून जातात, एकरूप होऊन

जातात; **धरमु** - नियम, कायदेकानू; **दिवाणू** - कचेरी, राज दरबार; **तुलु** - तराजू, तागडी; **परवाणु** - वजन मापे, परिमाण; **बखसीस** - बक्षीस, फळ; **निसाणु** - निशाण, चिन्ह; **करमु** - कृपा; **फुरमाणु** - फर्मान, हुकूम; **अमुलु** - कल्पने पलीकडे, अमूल्य; **आखि आखि** - विचार करता करता; **रहे** - थकून जातो, मग्न होतो; **लिव लाइ** - ध्यान मग्न होवून ज़ातो; **आखहि** - वर्णन करतात; **पढ़े** - विद्वान, पंडित; **वखिआण** - व्याख्या करतात, वर्णन करून सांगतात; **बरमे** - ब्रह्म (अनेकवचन); **इंद** - इंद्र (अनेक वचन); **तैतथा** - आणी; **ईसर** - शिव; **सिध** - सिद्धपुरुष; **बुध** - महात्मा बुद्ध; **सुरि नर** - देवतास्वरूप, पुण्यवान लोक; **सेव** - ईश्वराचे सेवक, परम भक्त; **केते** - किती तरी जीव; **आखणि पाहि** - सांगण्याचा प्रयत्न करतात; **कहिकहि** - सांगता सांगता; **उठि उठि जाहि** - निघून जातात, मृत्यू पावतात; **एते किते** - अनेक जीव उत्पन्न केले आहेत; **होरि** - अन्य, अनंत जीव; **करेहि** - उत्पन्न केले; **ता** - तरीही; **केई केइ** - कोणी सुद्धा; **जेवडु** - जेवढा; **तेवडु** - तेवढा; **साचा सोइ** - सदा स्थिर असलेला, परमेश्वर; **बोलु विगाडु** - बोलून बिघडवणारा; **गवारा गवारु** - गावंढळाहून गावंढळ, महामूर्ख;

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे इथे ईश्वर भक्तांची मंदियाळी आहे. अठरा पगड जातीत संतांनी जन्म घेतला आहे ज्याने त्याने आपापल्या व्यवसायाच्या रुपकातून भावभक्ती साकार केली आहे. सावता माळी म्हणतात... "सावत्याने केला मळा, विठ्ठल पायी गोविला गळा." नरहरी सोनार म्हणतात– "आम्ही सोनार सोनार, करतो नामाचा व्यवहार." या ठिकाणी गुरू नानक देवांनी ईश्वराचे व्यापारी म्हणून वर्णन केले आहे. ते म्हणतात–

परमेश्वरा ! तुझे गुण अमोल आहेत. तुझ्या नामाचा व्यापार ही अनमोल आहे. तुझे भांडारही नाना गोष्टीने भरपूर भरलेले आहे. तुझ्याकडे येणारे नामाचे व्यापारीही अनंत आहेत. अगणित लोक येतात, त्यांना हवे ते खरेदी करून घेवून जातात. पण ह्या सर्वात जो मनुष्य परमात्म्याच्या स्वरूपाशी एकरूप होतो, लीन होऊन जातो, तोच खरोखर धन्य होय.

परमेश्वराच्या दरबारातील नियम, कायदेही अमोल आहेत. त्याचा दरबारही वैशिष्टपूर्ण आहे. त्याच्या व्यापारात वापरला जाणारा तराजू, वापरायची वजने मापे ही वैशिष्टपूर्ण आहेत. मनुष्यास त्याच्या कर्माचे मिळणारे फळ, परमात्म्याची होणारी कृपा ह्या कशाचाही अंदाज करता येत नाही. परमात्मा अगम्य आहे. अनाकलनीय आहे. अनंत आहे. जो मनुष्य चित्त एकाग्र करून त्याच्या नामात मग्न होतो तो



अंती त्याच्यात विलीन होवून जातो.

वेद, पुराणे आदि सर्व धर्मग्रंथ परमेश्वराचे स्वरूप वर्णन करण्याचा प्रयत्न करतात. अनेक विद्वान, पंडित, आपापल्या बुद्धीप्रमाणे परमेश्वराचे वर्णन करतात. ब्रह्मा, इंद्र, गोप गोपी, श्रीकृष्ण, शिव, महात्मा बुद्ध, देव, दानव, मुनिजन, भक्तगण, सर्वजण आपल्या कुवतीनुसार भगवंताचे वर्णन करत असतात. त्यास जाणण्याचा प्रयत्न करीत असतात. अनेकजण त्याचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न करतात, अनेक जण परमेश्वराचा शोध घेता घेता ह्या जगातून निघून जातात. पण त्यांना त्याचा पार लागत नाही. परमेश्वराने इतके अनंत कोटी जीव जन्मास घातले आहेत आणखी अनंत जीव जरी पैदा झाले तरी कोणासही परमेश्वराचे पूर्ण ज्ञान होणार नाही.

परमेश्वर त्याला स्वतःला वाटेल तितका मोठा होऊ शकतो. तो सदैव अनंत अपार आहे. त्याचा ठाव कोणासही लागणे शक्य नाही. जर कोणी मनुष्य असे म्हणेल की होय मी परमेश्वरास पूर्णांशाने जाणले आहे, तर खुशाल समजा की तो माणूस मूर्खाहून मूर्ख आहे! महामूर्ख आहे!

## पउडी २७

**सो दरु केहा, सो घरु केहा, जितु बहि सरब समाले ॥**
**वाजे नाद अनेक असंखा, केते वावणहारे ॥**
**केते राग परि सिउ कहीअनि, केते गावणहारे ॥**
**गावहि तुहनो, पउणु पाणी बैसंतरु, गावै राजा धरमु दुआरे ॥**
**गावहि चितु गुपतु लिखि जाणहि, लिखि लिखि धरमु वीचारे ॥**
**गावहि इसरू बरमा देवी, सोहनि सदा सवारे ॥**
**गावहि इंद इदासणि बैठे, देवतिआ दरि नाले ॥**
**गावहि सिध समाधी, अंदरि, गावनि साध विचारे।**
**गात्रनि जती सती संतोखी, गावहि वीर करारे ॥**
**गावनि पंडित पड़नि रखीसर, जुगु जुगु वेदा नाले ॥**
**गावहि मोहणिआ मनु मोहनि, सुरगा मछ पइआले ॥**
**गावनि रतन उपाए तेरे, अठसठि तीरस नाले ॥**
**गावहि जोध महाबल सूरा, गावहि खाणी चारे ॥**
**गावहि खंड मंडल वरभंडा करि करि रखे धारे ॥**
**सेई तुधनो गावहि, जो तुधु भावनि, रते तेरे भगत रसाले ॥**
**होरि केते गावनि से मै चिति न आवनि, नानकु किआ विचारे ॥**

सोई सोई सदा सचु, साहिबु साचा, साची नाई ॥
है भी होसी, जाइ न जासी, रचना जिनि रचाई ॥
रंगी रंगी भाती करि करि, जिनसी माइआ जिनी उपाई ॥
करि करि वेखै कीता आपणा, जिव तिस दी वडिआई ॥
जो तिसु भावै सोई करसी, हुकमु न करणा जाई ॥
सो पतिसाहु, साहा पातिसाहिबु, नानक रहणु रजाई ॥२७॥

**अर्थ – सो** – ते; **दरू** – द्वार; **केहा** – कसे; **जितु** – जेथे; **बहि** – बसून; **सरब** – सर्व जीवांचा; **समाले** – संभाळ करतो; **वाजे** – वाजतात; **नाद** – वाद्ये; **असंखा** – असंख्य; **केते** – कितीतरी; **वावण हारे** – वाजवणारे; **परि** – रागिण्या; **सिउ** – बरोबर; सह, सोबत; **कहिअनि** – सांगतात; **गावहि** – गातात, गुणगान करतात; **तुहनो** – तुला तुझे; **पउणु** – पवन; **बैसंतरू** – आग, अग्नी; **चितु गुपतु** – चित्रगुप्त; **लिखिलिखि** – लिहून लिहून; **धरमु**- धर्मराज; **विचारु**- विचार करणे; **ईसरू** – शिव; **बरमा** – ब्रह्मदेव; **सोहनि** – सुंदर दिसतात, शोभून दिसतात; **सवारे** – तूच निर्माण केलेले; **इदासणि** – इंद्राचे आसन; **देवतिआ नाले** – देवतांसह; **दरि** – द्वारी, दारी; **समाधि अंदरी** – समाधी अवस्थेत; **साध** – साधु; **जती** – यती; **सती** – दान करणारे, दानी; **वीर करारे** – बलशाली शूरवीर; **रखीसर** – ऋषी, मुनी; **मोहणीआ** – सुंदर स्त्रिया; **मछ**- मातृलोक; **पइआले** – पाताळात; **उपाए तेरे** – तू उत्पन्न केलेले; **जोध** – योद्धा; **महा बल** – बलशाली, महाबळी; **सुरा** – शूरवीर; **खाणी चारे** – चार योनी (अण्डज, जारज, स्वेदज, उद् भिज); **खंड** – पृथ्वी; **मंडल** – सौर मंडल; **वरभंडा** – ब्रह्मांड; **सेई** – हे सर्वजीव; **तुधनो** – तुला; **तुधु भावनि** – तुला आवडतात; **रते** – रत झालेले, रंगून गेलेले; **से मै चितिन आवनि** – त्याची मला कल्पनाही करता येत नाही; **जाइ न जासी** – जन्मत ही नाही; **रंगी रंगी** – अनेक रंगाचे; अनेक प्रकारचे; **करि करि** – उत्पन्न करून; **जिनसी** – जिन्नस, वस्तू; **जिनि** – ज्याने, ज्या परमेश्वराने; **उपाई** – उत्पन्न केले; **करिकरि वेखै** – उत्पन्न करून त्यांचा सांभाळ करतो; **जिव** – जसे; **करसी** – करशील; **न करणा जाई** – करता येत नाही, **रहणु** – राहणे.

गुरू नानक देवजींचे मुखातून परमेश्वराची एवढी महती ऐकल्यावर शिष्यांच्या मनात एक जिज्ञासा जागृत झाली की साऱ्या विश्वाचा कारभार चालवणारा प्रभु परमात्मा जेथे राहतो तो प्रासाद, तेथील त्याचा दरबार कसा असेल ? ह्या प्रश्नाचे उत्तर देताना गुरू नानकदेव सांगतात- त्या परम पित्याच्या प्रासादाचे काय वर्णन



करावे ? तो प्रासाद परम मंगल आहे. त्याच्या प्रवेशद्वारात अनेक वाजंत्री आपल्या सुमधुर वाद्यांचा घोष करत आहेत. अनेक गायक आपल्या स्वर्गीय आवाजात अनेक राग रागिण्यांच्या आलापात प्रभूच्या गुणांची महती गात आहेत. पृथ्वी, आकाश, आप, तेज, वायू आदी पंच महाभूतेही त्याचेच गुणगान गात आहेत. त्याचेच गुणांचे स्मरण करत चित्रगुप्त सर्व सृष्टीतील जीवांच्या कर्मांची - पापपुण्यांची नोंद करून धर्मराजांना सादर करत आहे. धर्मराजही त्याच दरबारात बसून परमात्म्याच्या चिंतनात निमग्न होऊन जीवांच्या बऱ्या वाईट कर्मांचा निवाडा करत आहेत. शिव, ब्रह्मदेव, देवी भगवती, प्रभूची महती गाण्यात रंगून गेले आहेत. सिद्ध योगी, योगद्वारे समाधीत निमग्न होऊन, त्याचेच चिंतन करत आहेत. साधूसंन्यासीही परमात्म्याचाच विचार करत आहेत. यती, दानी, प्रभूने दिलेल्यात समाधान मानून संतोष मानून जगणारे जीवही, त्याचेच गुणगान करत आहेत. बलशाली शूरवीर सदैव त्याचाच जयजयकार करतात. अनेक विद्वान पंडीत, ऋषीमुनी, महर्षी युगानयुगे वेदमंत्राद्वारे त्याचीच महती सांगत असतात. आकाश, पाताळ, पृथ्वी तीनही लोकांतील अप्सरा, आपल्या मोहित करणाऱ्या अंगाविक्षेपांनी व सुमधुर आवाजाने, त्याचेच श्रेष्ठत्व ऐकवत असतात. क्षीरसागराच्या मंथनातून वर आलेली चौदा रत्ने, अडुसष्ट तीर्थे, त्याचाच महिमा वर्णन करतात.

महाबलाढ्य बाहुबली शूरवीर, तू निर्माण केलेले पशु, पक्षी, कीटक, जीवजंतू, मानव आदीसर्व प्राणी त्याचेच स्मरण करतात. ही सारी पृथ्वी, सूर्य मंडल, ब्रह्मांड त्याच्यात कृपेने कार्यरत आहेत. गुरू नानकदेव म्हणतात, हे भगवन जे जीव तुला आवडतात तेच तुझ्या गुणगानात लीन होतात. अजूनही अनेक लोक तुझ्या गुणगानात निमग्न आहेत. ज्यांची गणना करणे माझ्या कुवती बाहेरचे आहे.

सृष्टी निर्माता परमात्मा आजही सत्य आहे व सदा सत्य रहाणार आहे. हा अजन्मा आहे. अमर आहे. अनंत आहे. हा परमात्मा अटल आहे. सदा सत्य आहे. त्याचे मोठेपण, त्याची महती ही निरंतर टिकणारी आहे.

ज्या परमात्म्याने ही विविधांगी बहुरूपी सृष्टी निर्माण केली आहे, तोच आपल्या कृपेने ह्या सर्वांचे रक्षण करत आहे. तो परमात्मा त्याला जे योग्य वाटते तेच करतो. त्याला शिकवण्याची 'असं नाही असं कर' असं सांगण्याची कोणाची ही क्षमता नाही. तो तर बादशहांचा बादशहा ! त्याच्या इच्छेनुरूप आपण आपले जीवन जगावे व त्याच्या कृपेस पात्र व्हावे व परमेश्वराशी एकरूप होऊन आपले जीवन सार्थकी लावावे.

## पउडी २८

**मुंदा संतोखु, सरमु पतु झोली, धिआन की करहि बिभूति ॥**
**खिंथा कालु, कुआरी काइआ जुगति, डंडा परतीति ॥**
**आई पंथी, सगल जमाती, मनि जीतै जगु जीतु ॥**
**आदेसु, तिसै आदेसु ॥**
**आदि अनीलु अनादि अनाहति, जुगु जुगु एको वेसु ॥२८॥**

**अर्थ – मुंदा** – मुद्रा, आई पंथी योगी कानात घालतात ती कुंडले; **संतोख** – संतोष; **सरमु** – श्रम, उद्योग, कर्म; **पतु** – पात्र, कटोरा, भिक्षापात्र; **धिआन** – ध्यान; **बिभूती** – राख; **खिंथा** – कांबळे, गोधडी; **कालु** – काळ, मरण; **कुआरी काइआ** – ब्रह्मचर्य, विषय विकारांपासून मुक्त असलेले शरीर; **जुगति** – युक्ती; **परतीति** – प्रचिती, विश्वास; **आई पंथ** – योग्यांचा एक पंथ; **सगल** – सगळे जीव; **जगु जीतु** – जग जिंकले; **आदेसु** – नमस्कार, प्रणाम; **तिसै** – त्या परमेश्वराप्रत; **आदि** – आद्य, पहिला; **अनिलु** – पवित्र, शुद्ध स्वरूप; **अनादि अनाहति** – अविनाशी; **जुगु जुगु** – प्रत्येक युगात; **वेसु** – वेश, रूप.

करतारपूर मुक्कामी गुरू नानक हे शिष्यांना उपदेश करत असताना तेथे काही 'आई'पंथी योगी आले होते. त्यांनी काही प्रश्न विचारले. हे योगी 'आई' पंथाचे चिन्ह म्हणून कानात कुंडले घालतात त्यांना मुद्रा म्हणतात. सर्वांगाला विभूती राख फासतात, हातात कटोरा, खांद्याला झोळी, हातात दंडा व अंगावर कांबळे पांघारतात. अशा ह्या योग्यांना त्यांच्या ह्या बाह्य चिन्हांचा अध्यात्मिक अर्थ समजावून सांगताना गुरू नानकदेवजी म्हणतात - योगी जन हो ! ह्या मुद्रा हे संतोषांचे चिन्ह आहे. परमेश्वराने आपणांस जसे ठेवले आहे, जे दिले आहे, त्यात सदैव संतोष मानून त्याच्याच नामात दंग रहावे ह्यासाठी ही मुद्रा धारण करण्यास आपणास सांगितले आहे. तुमचे हातातील कटोरा व झोळी ही कर्म मार्गाचे प्रतीक आहे. तुम्ही सतत कर्मरत असले पाहिजे. जगात कर्म करत असताना कोणत्याही फळाची अपेक्षा न करता निष्काम कर्म करा, हे तुमच्या हातातील कटोरा व झोळी तुम्हाला सांगत आहेत. सर्व संग परित्याग करून सदैव प्रभू नामाच्या ध्यानात निमग्न होण्याचा संदेश अंगाला फासलेली राख तुम्हाला देत आहे. सर्व मायेतून मुक्ततेचे प्रतिक आहे विभूती. तुम्ही अंगावर घातलेले कांबळे, घोगंडी हे तुम्हास सदैव मृत्यूचे स्मरण देत असतात. ही दिसते भासते ती सारी सृष्टी नश्वर आहे. नाश पावणारी आहे. कायम रहाणारा एकमात्र परमेश्वर अविनाशी आहे. म्हणून जे



प्रभूने दिले आहे त्यात समाधान संतोष मानून सदैव परमात्माचे गुणगान करणे हाच मुक्तीचा खरा मार्ग आहे. योगमार्गाने जाणाऱ्याने काया, वाचा, मने शुद्ध असले पाहिजे. त्यासाठी आपल्या मार्गावर दृढ श्रद्धा असली पाहिजे. व मनाला ताब्यात ठेवण्यासाठी ब्रह्मचर्य रुपी वज्र कठोर निश्चय पाहिजे. ह्यासाठी हातात दंड धारण करायचा असतो.

हे योगी जन हो, केवळ बाह्य चिन्हांनी नव्हे तर त्यामागील हा गूढ अर्थ समजावून घेऊन त्याप्रमाणे आचरण केलेत तरच तुम्ही खरे आईपंथी म्हणवून घेण्यास पात्र व्हाल. तोच खरा आईपंथी योगी ज्याने मन जिंकले आहे. कारण ज्याने मन जिंकले त्याने सारे जग जिंकले. तसे केल्याने प्रभूने निर्माण केलेल्या सृष्टीतील सर्व जीवांबद्दल आपले मनात समदृष्टी भाव निर्माण होतो. खरा आईपंथी योगी साऱ्या जीवांवर सारखेच प्रेम करतो. त्यामध्ये तो त्या प्रभू परमात्म्यासच पाहतो. त्या परमेश्वरास कोटि कोटि प्रणाम.

जो अनादी, अनंत, शुद्ध, सत्य स्वरूप, ज्याच्या स्मरणाने मायापाशातून मुक्ती प्राप्त होते, त्या परमेश्वराचे सदैव चिंतन करा आणि आपले जीवन सार्थ करा.

## पउडी २९

**भुगति गिआनु, दइआ भंडारणि, घटि घटि वाजहि नाद ॥**
**आपि नाथु, नाथी सभ जा की, रिधि सिधि अवरा साद ॥**
**संजोगु विजोगु दुइ कार चलावहि, लेखे आवहि भाग ॥**
**आदेसु तिसै आदेसु ॥**
**आदि अनीलु अनादि अनाहति, जुगु जुगु एको वेसु ॥२९॥**

अर्थ – **भुगति** – भोजन; **भंडारणि** – भोजन वाटणारे; **गिआनु** – ज्ञान; **दइआ** – दया; **घटिघटि** – प्रत्येक शरीरात; **आपि** – स्वतः परमेश्वर; **नाथु** – परमेश्वर; **नाथी** – परमेश्वरास वश झालेला; **अवरा** – अन्य, देवापासून दूर नेणारा; **साद** – स्वाद; **संजोगु** – संयोग, मीलन; **विजोगु** – वियोग; **कार** – जगाचा व्यवहार; **चालवहि** – चालवतात; **लेखे** – प्राक्तन, केलेल्या कर्मानुसार; **आवहि** – मिळते; **भाग** – वाटा, आपल्या कर्माप्रमाणे मिळणारे फळ.

नाथ पंथामध्ये भंडाऱ्याचा प्रघात आहे. त्या भंडाऱ्याचे वेळी कोणी तो वाटण्याचे काम करतात. योग्यांच्या गळ्यात शिंग असते. भोजन करताना त्याचा आवाज होत असतो. हे योगी योगद्वारा ऋद्धी-सिद्धी प्राप्त करून सर्व भौतिक गोष्टी प्राप्त करतात व त्यामुळे ते परमेश्वरापासून दूर जातात.

त्या नाथपंथी योग्यांना भंडाऱ्याचा अध्यात्मिक अर्थ समजावून देताना गुरु नानक देव सांगतात–

भंडारा म्हणजे केवळ शिजवलेल्या अन्नाचे सेवन नव्हे. परमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीचे ज्ञान. परमेश्वराच्या कर्तुम-अकर्तुम शक्तीचे सम्यक ज्ञान. परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान. हाच खरा भंडारा होय. परमेश्वराने निर्माण केलेल्या सर्व जीवांप्रती प्रेमभाव, दया, कणव यातूनच हे ज्ञान प्राप्त होते. म्हणून ज्ञान हा भंडारा व दया हे ते ज्ञान वाटणारे होत. आपण प्रत्येक कर्म करत असताना प्रत्येक जीवाच्या श्वास-उच्छ्वासातून 'सो हं' हा ध्वनी निनादत असतो. त्याचे प्रतिक म्हणजे आई पंथियाने गळ्यात घातलेले शिंग होय. ह्या 'सो हं' ध्वनीतून ईश्वर व आपण एकरूप आहोत. हा संदेश आपणास मिळतो. भंडाऱ्याचा हा खरा अर्थ आहे. ह्या साऱ्या सृष्टीचा मालक, पालक, चालक एकमात्र परमेश्वर आहे. त्याने ही सर्व सृष्टी आपले आधीन ठेवली आहे.

आपण योग सामर्थ्याने ऋद्धी-सिद्धी प्राप्त करून साऱ्या भौतिक गोष्टी प्राप्त करून घेता, पण हा मार्ग धोकादायक आहे.

ऋद्धी-सिद्धी हे सारे मायेचे खेळ आहेत. त्यामुळे माणसाचा अहंकार बळावतो. तो माणसास परमेश्वरापासून दूर नेतो. म्हणून त्यापासून सावध रहा, दूर रहा. संयोग आणि वियोग हा ह्या सृष्टीचा नियमच आहे. त्या आधारेच ह्या सृष्टीचा सारा कारभार चालतो. संयोगातून नवनवीन जीव उत्पन्न होतात. परिवार वाढतो. एकमेकांविषयी प्रेम वाढते, सुख वाढते. पण कालांतराने त्यांचा वियोग होतो. माणूस दुःखी होतो. हे चक्र असेच चालू असते. हे सारे त्या परमेश्वराच्या इच्छेनेच होत असते. ज्याला त्याला, त्याने केलेल्या कर्माप्रमाणे फळ मिळते. नामस्मरणाने हे ज्ञान प्राप्त होते. म्हणून मायेच्या पाशात गुंतून न पडता परमेश्वराचे नामस्मरण करावे. त्या अनादि, अनंत, अविनाशी, स्थिर रहाणाऱ्या परमेश्वराचे आदेशाप्रमाणे जीवन व्यतीत करणे हाच परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचा एकमेव मार्ग आहे.

## पउडी – ३०

एका माई, जुगति विआई, तिनि चेले परवाणु ॥
इकु संसारी, इकु भंडारी, इकु लाए दीबाणु ॥
जिव तिसु भावै, तिवै चलावै, जिव होवै फुरमाणु ॥
ओहु वेखै, ओना नदरि न आवै, बहुता एहु विडाणु ॥
आदेसु तिसै आदेसु ॥
आदि अनीलु अनादि अनाहति जुगु जुगु एको वेसु ॥३०॥



**अर्थ – एका** - एकटी; **माई** - माया; **जुगति** - युक्ती, **विआई** - प्रसूत झाली; **तिनी** - तीन; **परवाणू** - प्रत्यक्ष दाखवली; **जिव** - जसे; **तिसु** - त्याला; त्या परमेश्वराला; **भावै** - वाटेल, **तिवै** - त्याप्रमाणे; **चलावै** - चालवतो, **ओहु** - परमात्मा; **वेखै** - पाहतो, इच्छितो, ठरवतो; **ओना** - जीवांना, **नदरि न आवै** - नजरेस पडत नाही; **एहु** - हेच; **विडाणू** - आश्चर्य.

एकटी माया युक्तीने प्रसूत होऊन तिने तीन पुत्रांना जन्म दिले. ते म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश. ते मायेच्या आधीनं असल्यानं स्वतः काहीही करू शकत नाहीत. काय आश्चर्य आहे पहा! आपण म्हणतो ब्रह्मा उत्पन्न करतो. विष्णू - पालनपोषण करतो, शिव संहार करतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की ते खरोखर त्यांच्या स्वतःचा इच्छेने, त्यांच्या स्वतःच्या शक्तीने, काहीही करू शकत नाहीत. तो जगत्चालक परमेश्वर त्यांना जसा आदेश देईल तसे ते करत असतात. त्यांच्या हाती काही नसते. सर्व काही तो परमेश्वर ठरतो. करता-करविता एकमात्र परमेश्वर आहे. तो सारे पहात असतो, त्याला सर्व दिसत असते, पण त्याला मात्र कोणीही पाहू शकत नाही. तो केवळ शुद्धरुप आहे. आदि आहे, अनादि, अनंत आहे व सदा एकाच (अव्यक्त) रूपात स्थिर आहे. म्हणून सदैव त्याचेच स्मरण करणे हाच प्रभू प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे.

## पउडी ३१

आसणु लोइ लोइ भंडार ॥
जो किछु पाइआ, सु एका वार ॥
करि करि वेखै सिरजणहारु ॥
नानक, सचे की साची कार ॥
आदेसु, तिसै आदेसु ॥
आदि अनीलु अनादि अनाहति, जुगु जुगु एको वेसु ॥३१॥

**अर्थ – आसणु** - आसन, स्थान; **लोइ लोइ** - प्रत्येक ठिकाणी, **भंडार** - भंडार गृह; **पाइआ** - ठेवले; **करि करि** - जिवाची उत्पत्ती करून; **वेखै** - संभाळ करतो; **सिरजण हारु** - सृष्टी उत्पन्न करणारा, परमेश्वर; **साची** - सदा स्थिर असणारा, परमेश्वर; **कार** - व्यवहार.

गुरु नानक देवांचा उपदेश ऐकून शिष्यांच्या मनात प्रश्न उत्पन्न झाला. परमेश्वर कोठे रहातो? तो ह्या सृष्टीतील जीवांचे भरणपोषण कसे करतो? त्याचे उत्तर देताना गुरु नानक देव सांगतात –

अरे तो परमेश्वर कोठे रहातो, ते काय विचारता ? तो तर सर्वत्र भरून राहिलेला आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषणी जेथे पहाल तेथे त्याचे वास्तव्य आहे. तो नाही अशी एकही जागा शोधून सापडणार नाही. त्यानेच ही सारी सृष्टी निर्माण केली. त्याचे नियोजनही किती अचूक! सृष्टी निर्माण करतानाच त्यात वावरणाऱ्या सर्व जीवांच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचीही सारी व्यवस्था त्याने त्याच वेळी करून ठेवली आहे. अमृत मधुर पाण्याचे निर्झर, फुला-फळांनी लगडलेली वृक्ष वल्लरी, ही त्याची सर्वत्र पसरलेली कोठारे आहेत. तो कोणालाही काही कमी पडू देत नाही. ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे. अशा ह्या अनादी, अनंत, अचल, अव्यक्त परमेश्वराचे सदैव स्मरण करावे, त्याच्या आज्ञेत सदैव रहावे.

## पउडी ३२

**इक दू जीभौ लख होहि, लख होवहि लख वीस ॥**
**लखु लखु गेड़ा आखीअहि, एकु नामु जगदीस ॥**
**एतु राहि पति पवड़ीआ, चड़ीऐ होइ इकीस ॥**
**सुणि गला आकास की, कीटा आई रीस ॥**
**नानक नदरी पाईऐ, कूड़ी कूड़ै ठीस ॥३२॥**

**अर्थ – इक दु** - एकापासून; **जिभो** - जीभ; **होहि** - होतील; **गेडा** - फेऱ्या; **आखीअहि** - वर्णन करून सांगणे; **एतु राहि** - ह्या मार्गावर; **पति पवडीआ** - पायऱ्या; **चडिऐ** - चढतात; **होइ इकीस** - एक रूप होणे; **सुणि** - ऐकून, **नदरी** - परमात्माची कृपा दृष्टी; **कुड़ै** - खोटा माणूस, पापी माणूस, दांभिक; **कुड़ी ठीस** - आपली आपण खोटी प्रशंसा करणे;

परमेश्वराने माणसाला परमेश्वराचे गुणगान करण्यासाठी फक्त एकच जीभ दिली आहे. जर ह्या जिव्हेच्या लाख जिव्हा झाल्या, त्या प्रत्येकीच्या आणखी लाख जिव्हा झाल्या. अशा ह्या लक्ष लक्ष जिव्हांनी त्या परमेश्वराचे, त्या जगदीशाचे नामस्मरण करून मी त्या जगदीशास प्राप्त करून घेईन, असे जर कोणास वाटत असेल तर तो त्याचा पोकळ अहंकार होय. अशाने देव प्राप्त होत नाही. तुम्ही त्याचे नाव एकदा घेता का लक्ष लक्ष वेळा घेता त्यास काहीच मोल नाही. तुम्ही कोणत्या भावाने हे सारे करता ते महत्त्वाचे आहे. परमेश्वराचे वर्णन ऐकल्यावर एका क्षुद्र कीटकाला आपण ही आकाशात उंच उडून आपल्या ताकदीवर परमेश्वराप्रत पोहचू शकू असे वाटते; पण हे शक्य होईल का? होय त्या क्षुद्र कीटकावर त्या प्रभू परमात्म्याची कृपा होईल तरच ते शक्य होईल. आपलीही स्थिती त्या क्षुद्र



कीटकासारखीच आहे. आपण अहंकार सोडून परमेश्वर चरणी लीन होऊन त्याची कृपा संपादू शकलो तर आपलाही उद्धार होईल. आपण ही ईश्वराप्रत पोहचू शकू.

परमार्थाच्या मार्गावर, ईश्वर प्राप्तीच्या मार्गावर आतापर्यंत ज्या पायऱ्यांचे विवरण केले त्यात सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे अहंकाराचा त्याग. अहंभाव त्यागून परमेश्वराप्रती संपूर्ण समर्पणाचे भावाने प्रत्येक पायरी चढली तर आणि तरच तुम्ही ईश्वराच्या कृपेस पात्र व्हाल.

पुढे गुरू नानक देवजी सांगतात की, जर परमेश्वराने तुमच्यावर कृपा केली तरच तुमचे जीवन सफल होईल. अन्यथा मी इतके लाख वेळा नाम जप केला असा खोटाच दंभ तुम्ही मिरवत रहाल.

## पउडी ३३

**आखणि जोरु, चुपै नह जोरु ॥**
**जोरु न मंगणि, देणि न जोरु ॥**
**जोरु न जीवणि, मरणि नह जोरु ॥**
**जोरु न राजि मालि मनि सोरु ॥**
**जोरु न सुरती गिआनि वीचारि ॥**
**जोरु न जुगती छुटै संसारु ॥**
**जिसु हथि जोरु, करि वेखै सोइ ॥**
**नानक, उतमु नीचु न कोइ ॥३३॥**

**अर्थ – आखणि** - बोलणे; **चुपै** - गप्प रहाणे, मौन रहाणे; **मंगणि** - मागणे, **देणि** - दान देणे; **जीवणि** - जन्मास येणे; **मरणि** - मृत्यू पावणे; **राजि मालि** - आत्मिक जागृती; **गिआनि** - ज्ञानी; **जुगति** - युक्ती; **छुटै** - सुटका होणे; **जिसु हथि** - ज्याचे हाती; परमेश्वरा हाती; **जोरु** - सामर्थ्य; **करि वेखै** - रचना करून संभाळ करतो; **सोइ** - तोच परमात्मा;

माणूस अहंकाराने लिप्त होऊन म्हणत असतो की, 'मी हे केले, मी ते केले' पण ही सारी माया आहे. गुरु नानक देव सांगतात, वस्तुस्थिती अशी आहे की या सृष्टीत घडणाऱ्या सर्व घटना त्या प्रभू परमात्म्याच्याच इच्छेने होत असतात. तुमचे बोलणे वा मुके राहणे हेही त्याच्याच इच्छेने होत असते. तू कोणाकडे काही मागू शकत नाहीस. कोणास काही देऊ शकत नाहीस. जन्म-मरणही तुझ्या हाती नाही. सारे काही त्या परमेश्वराचे आधिन आहे. तुला राजमहालात ठेवायचं की रंक बनवायचं हेही त्याच्याच इच्छेवर अवलंबून आहे. पण मीच माझ्या बळावर हे

वैभव प्राप्त केले असा वृथा अहंकार माणूस बाळगतो.

तुम्ही अध्यात्मिक मार्गावर प्रगती करायची की, ज्ञान मार्गावर अग्रेसर व्हायचं, हेही तोच ठरवतो. जन्म-मरणाचा फेरा चुकवण्यासाठी योग मार्गावर चालण्याचे हेही तोच ठरवणार. सारी सारी काही त्याचीच लीला.

ही सृष्टी त्या परमेश्वरानेच उत्पन्न केली आहे. त्याचा संभाळही तोच करतो. त्याच्या नामस्मरणात गुंग होऊन जाणे, हाच ईश्वर प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे.

वाचक हो, आपणास आठवत असेल की, पहिल्या पउडीमध्ये शिष्यांनी गुरु नानक देवांना प्रश्न केला – 'किव सचि आरा होईऐ किव कूडै तुटै पालि ॥' "ह्या मोहमायेच्या बंधनातून आमची कशी सुटका होईल? व आम्ही त्या प्रभू परमात्म्याशी कसे एकरुप होऊ?" ह्या प्रश्नाच्या उत्तरात गुरु नानक देवांनी पुढील बत्तीस पउडींमध्ये शिष्यांना सविस्तर मार्गदर्शन केले व त्यांना परमेश्वराचे स्वरुप, त्याच्या लीला, त्याला प्राप्त करून घेण्यासाठी अहंकाराचा त्याग व समर्पणाच्या भूमिकेतून त्याच्या नाम जपाची, नाम श्रवणाची महती सांगून गुरू नानक देवांनी शिष्यांची मनोभूमिका सिद्ध केली आहे.

आता या पुढील चौतीस ते अडतीस पउडींमध्ये परमेश्वराप्रत पोहोचण्याच्या अंतिम पायऱ्यांचे विवेचन केले आहे. त्यास त्यांनी खंड असे म्हटले आहे. त्या पायऱ्या अशा – १) कर्मखंड, २) धर्मखंड, ३) ज्ञानखंड, ४) श्रमखंड, ५) सचखंड.

ह्या धरतीवर जन्म घेतल्यावर मानवप्राणी मायेच्या मोहजाळात जखडला जातो. विषयविकारांच्या आधिन होतो. आपल्या मूळ स्वरूपाचा त्यास विसर पडतो व तो परमेश्वरापासून दूर जातो.

पण मुक्ती मार्गावर अग्रेसर होणारा जीव हळूहळू विचार करू लागतो की, 'मी कोण? (को हं) मी ह्या संसारात का आलो आहे? का जन्माला घातला गेलो आहे? माझे कर्तव्य काय आहे? माझ्या जीवनाचे प्रयोजन काय?' हे विचार मनात येणे, ही मुक्तीमार्गावरची पहिली पायरी होय. हाच धर्मखंड.

हा विचार जसजसा प्रबळ होत जाईल तसतशी ही मायेची बंधने ढिली होऊ लागतील. स्वार्थ गळून पडू लागेल.

अगदी पहिल्यांदा माणूस स्वतःचा विचार करत असतो. तो स्वकेंद्रीत असतो. 'मी आणि माझे' एवढेच तो जाणतो. हळूहळू तो स्वतःबरोबर स्वतःच्या परिवाराचा विचार करू लागतो. हळूहळू त्याचे हे स्वकेंद्रीत मन विशाल होऊ



लागते. ते विस्तारत विस्तारत शेवटी तो ब्रह्मांडाशी एकरुप होतो. परमेश्वराच्या असीम स्वरुपाची, त्याच्या अपार शक्तीची, त्याच्या अगाध लीलेची त्याला प्रचिती येऊ लागते. ज्ञानरवि त्याच्या हृदयात उदित होतो. सर्व भ्रम, भ्रांती, दूर होऊन वरील सर्व प्रश्नांची उत्तरे त्यास सापडतात. विषय-वासनांत त्याला रुची रहात नाही. हळूहळू तो आत्मानंदात निमग्न होतो. ह्यासच गुरु नानक देव 'ज्ञानखंड' म्हणतात.

पण केवळ ज्ञान होऊन काय उपयोग?

चौऱ्यांशी लक्ष योनीतून फिरल्यानंतर जीवाला हा मानव जन्म प्राप्त होतो. ह्या लक्षलक्ष योनीतून फिरताना त्या जीवावर झालेले कुसंस्कार केवळ ज्ञानाने नष्ट होत नाहीत. त्यासाठी निश्चयपूर्वक कठोर परिश्रम करावे लागतात. आता पहा व्यसनी माणसाला व्यसन करणे वाईट आहे हे माहीत का नसते? पण तो व्यसनातच गुंतून पडतो. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्याला प्रयत्नपूर्वक अथक परिश्रम करावे लागतात. त्याचप्रमाणे मायापाशातून मुक्त होण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात. साधना करावी लागते. यासच गुरु नानक देव 'श्रम खंड' म्हणतात. अशा साधकाची साधना जसजशी दृढ होत जाईल तसतसे त्याच्या जीवनात परिवर्तन येत जाते. मुखावर एक अलौकिक तेज विलसू लागते. त्याचेवर प्रभूकृपा अवतरू लागते. तो हळूहळू सिद्ध कोटीस जावून पोहोचतो. मग तो विषय विकारांनी विचलित होत नाही. त्याला सर्वत्र प्रभू परमात्म्याचे अस्तित्व जाणवू लागते. तो सदैव प्रभूच्या ध्यानात निमग्न राहतो. त्याला जन्ममरणाचे भय रहात नाही. तो सदैव तेजस्वी टवटवीत. प्रफुल्ल दिसतो. ह्यास गुरु नानकदेव 'करम खंड' (कृपा खंड) म्हणतात.

परमेश्वराच्या पूर्ण कृपेस पात्र झाल्यावर तो आत्मा परमात्म्यात विलिन होऊन जातो, एकरूप होतो. परमात्मास्वरूप होतो. ह्यालाच गुरु नानक देव 'सच खंड' म्हणतात.

ह्यापुढील पाच पउडींमध्ये गुरु नानकदेव ह्या सर्व खंडांचे सविस्तर वर्णन करत आहेत.

### पउडी ३४

**राती रुती थिती वार॥**
**पवण पाणी अगनी पाताल॥**
**तिसु विचि, धरती थापि रखी धरम साल॥**
**तिसु विचि, जीअ जुगति के रंग॥**

तिन के नाम, अनेक अनंत ॥
करमी करमी होइ वीचारु ॥
सचा आपि, सचा दरबारु ॥
तिथै सोहनि पंच परवाणु ॥
नदरी करमि पवै नीसाणु ॥
कच पकाई, ओथै पाइ ॥
नानक, गइआ जापै जाइ ॥३४॥

अर्थ – राती- रात्र; रुती- ऋतु; थिती- तिथी; पवण- पवन; तिसु विची- हे सगळे; थापिरखी- निर्माण केले; धर्मशाळा- धर्मभूमी; जीअ- जीव; तिसुविची- या भूतलावर

त्या प्रभू परमेश्वराने हीसृष्टी निर्माण करताना सूर्य, चंद्र, तारे, ग्रह, नक्षत्रे, दिवस, रास, तिथी, वार आदीसह कालचक्र निर्माण करून, त्यामध्ये आप, तेज, वायू सह ही पृथ्वी, आकाशाच्या पोकळीत सदैव फिरत ठेवली आहे. या पृथ्वीवर प्रभूने नाना रंगाचे, नाना जातींचे, नाना नावांचे, आकार प्रकारांचे, जीव-जंतू, पशु-पक्षी, वृक्षवल्लरी निर्माण केले आहेत. ह्या पृथ्वीवरील सर्व जीवांना आपले जीवन सुचारूपणे जगता यावे यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू परमेश्वराने येथे निर्माण करून ठेवल्या आहेत. ह्यासच गुरू नानक देव 'धर्मखंड' म्हणतात.

या पृथ्वीवर जन्मास आलेल्या प्रत्येक जीवास प्रभू परमेश्वराने आपापले कर्तव्य नेमून दिले आहे. सर्वांनी आपापली नेमुन दिलेली विहित कर्मे करावीत. आपापल्या धर्माचे पालन करावे, ही परमेश्वराची इच्छा आहे.

प्रत्येक जीवाने केलेल्या कर्माची नोंद परमेश्वराच्या दरबारी ठेवली जात असते. त्यात तो यत्किंचितही चूक होऊ देत नाही. तो परम न्यायी आहे. प्रत्येक जीवास त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परमेश्वर सत्य आहे. त्याचा दरबारही सत्य आहे. जे जीव आपापली विहित कर्मे प्रभूच्या आज्ञेप्रमाणे करून त्याच्या नामस्मरणाने संत पदास पोहोचतात, त्यांना प्रभूच्या दरबारात प्रत्यक्ष स्थान प्राप्त होते. त्यांच्या चेहऱ्यावर प्रभू कृपेचे तेज विलसत असते. ह्यालाच गुरू नानक देव 'कर्मखंड' म्हणतात.

ह्या मायेच्या सृष्टीत कोणीही कोणत्याही पदावर असो, तो धनवंत असो वा सत्ताधीश असो, त्याचा काहीही उपयोग नाही. परमेश्वराचे दरबारात प्रत्येक व्यक्तीचा – तो राव असो की रंक-प्रभू परमात्म्याने आखून दिलेल्या कर्तव्याचे



त्यानी किती पालन केले आहे, हेच पाहून त्याला प्रभूच्या दरबारात स्थान प्राप्त होते. तेथे कोणताही भेदभाव नाही. सर्व जन्मभराच्या कर्मांचा विचार करूनच जे 'पक्के' पूर्णत्वास पोहोचले, त्यांना प्रभूचे दरबारात स्थान प्राप्त होते. जे अजून अपूर्ण आहेत, त्यांना परत जन्मास घालून पूर्णत्वास पोहोचण्यासाठी कर्म करण्याची संधी दिली जाते, यास गुरू नानक देव 'कर्म खंड' म्हणतात.

## पउडी ३५

धरम खंड का एहो धरमु ॥
गिआन खंड का आखहु करमु ॥
केते पवण पाणी वैसंतर, केते कान महेस ॥
केते बरमे घाड़ति घड़ीअहि, रूप रंग के वेस ॥
केतीआ करम भूमी, मेर केते, केते धू उपदेस ॥
केते इंद चंद, सूर केते, केते मंडल देस ॥
केते सिध बुध नाथ केते, केते देवी वेस ॥
केते देव दानव, मुनि केते, केते रतन समुंद ॥
केतीआ खाणी, केतीआ बाणी, केते पात नरिंद ॥
केतीआ सुरती, सेवक केते, नानक, अंतु न अंतु ॥३५॥

अर्थ – आखहु – समजावून घेवू; केते – किती तरी; अनंत; वैसंतर – अग्नी; कान – कान्हा; कृष्ण; घाडति घडी अहि – घडवतात; उत्पन्न करतात; के वेस – अनेक वेश; अनेक प्रकार; धू – ध्रुव भक्त (ध्रुवासारखी अढळ निष्ठा असणारे भक्त); धू उपदेश – निष्ठावंत भक्तांचा उपदेश, मंडल देश – ब्रह्मांड, पात – बादशहा; नरिंद – नरेंद्र; राजे; सुरती – विचार;

धर्मखंडाचे विवेचन झाल्यावर गुरु नानक देव 'ज्ञानखंड' कडे आपले ध्यान वेधताना म्हणतात – माणूस जसा जसा विचार करू लागतो तसतसा ज्ञानरवि त्याचे हृदयात प्रकाशू लागतो. ह्यापूर्वीच्या विवेचनात आपल्याला ह्या वसुंधरेतील विविध गोष्टीचे ज्ञान झालेले आहे. अधिक विचार करताना भक्तांच्या हे लक्षात येते की, प्रभूने निर्माण केलेली पृथ्वी ती ज्या सूर्यमालेत फिरते आहे, ती सुर्यमाला व ही सूर्यमाला एका ब्रह्मांडात समाविष्ट आहे. हे केवळ एकच ब्रह्मांड प्रभू परमात्म्याने निर्माण केलेले नसून अशी अगणित, अनंत, ब्रह्मांडे प्रभूने निर्माण केली आहेत. एवढेच नव्हे तर त्या सर्वांचा कारभार इतक्या शिस्तबद्ध व सुचारूपणे तो चालवीत

असल्याचे पाहून मानवी मन आश्चर्याने थक्क होऊन जाते.

माणूस स्वत:स सर्व श्रेष्ठ समजतो. स्वत:च्या अल्पस्वल्प कर्तृत्वाचा टेंभा मिरवतो. अहंकाराने स्वत:च्या सामर्थ्याचा मोठेपणा मिरवत असतो. पण त्या परमात्म्याने निर्माण केलेली ही अनंत ब्रह्मांडे त्यातील अनंत ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र, अन्य देव देवता, सुर, असूर, सिद्ध, बुद्ध, निष्ठावान ध्रुवमती भक्त, राजे-महाराजे, शूर-वीर, योद्धे, सारे सारे अगदी कल्पने पलिकडे! हे पाहिल्यावर माणूस आपोआप त्या प्रभू परमात्म्यापुढे नतमस्तक होतो. आपले क्षुद्रपण त्याचे त्याला जाणवू लागते. हळूहळू त्याची दृष्टी विशाल होऊ लागते. मी, माझे कुटुंब एवढीच संकुचित भावना न रहाता आता तो समाजाभिमुख होतो. पुढे तो परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी अग्रेसर होतो. अशा रीतीने 'ज्ञानखंडात' व्यक्तीची उन्नती व्यष्टीकडून समष्टीकडे व समष्टीकडून परमेष्टीकडे होते. ज्ञानखंडाचाहा महिमा आहे.

**पउडी ३६**

**गिआन खंड महि, गिआनु परचंडु ॥**
**तिथै, नाद बिनोद कोड अनंदु ॥**
**सरम खंड की बाणी रूपु ॥**
**तिथै घाड़ति घड़िऐ, बहुतु अनूपु ॥**
**ता कीआ गला, कथीआ न जाहि ॥**
**जे को कहै पिछै पछुताइ ॥**
**तिथै घड़ीऐ, सुरति मति मनि बुधि ॥**
**तिथै घड़ीऐ, सुरा सिधा की सुधि ॥३६ ॥**

**अर्थ** – **महि** – मध्ये; **परचंडु** – प्रचंड; **तिथै** – तेथे, **ज्ञानखंडात; नाद** – कला; ललित कला; **बिनोद** – विनोद; **अनंदु** – आनंद; **सरम** – श्रम; **बाणी** – घडण; रुप – सौंदर्य; **घाड़ति घड़ीऐ** – घडवले जाते; **बहुत अनूपु** – अत्यंत सुंदर; **ता कीआ** – त्या अवस्थेचे; **कथिआ न जाहि** – सांगणे अशक्य आहे; **पिछै** – नंतर, **पछुताई** – पश्चाताप पावेल; **घड़िऐ** – घडवले जाते; **मनिबुधि** – मनात जागृती; **सुरा** – ईश्वर; **सिधा** – सिद्ध, **सुधि** – वृत्ती, स्वरुप.

ज्ञानखंडामध्ये सर्व ज्ञान, विज्ञान, ललित कलांच्या प्राप्तीने मन आनंदाने भरून जाते. त्या काळात ज्ञानाचा प्रचंड साठा हाती येऊन बुद्धीचा पूर्ण विकास होतो. त्यानंतर माणूस श्रमखंडात प्रवेश करतो. श्रम खंडात माणसाच्या मनाचा व हृदयातील भाव-भावनांचा विकास होतो. ज्ञानखंडात प्रभू-परमेश्वराच्या प्रचंड व्यापाची अमर्याद व असीम रचनेचे ज्ञान प्राप्त झाल्यावर मानवाच्या क्षुद्रत्वाची जाणीव होते व परमेश्वराने उत्पन्न केलेल्या सर्व जीवांविषयी प्रेम, ममत्व, उत्पन्न होते. सर्व विषय विकार तुच्छ वाटू लागतात. त्याचा फोलपणा जाणवतो व त्याकडे साधक अलिप्तपणे पाहू लागतो.



श्रमखंडात जीवाचा परमेश्वराकडे जाण्याचा प्रवास सुरू होतो. हा त्याच्या जडण-घडणीचा काळ असतो. ही जडण-घडण कशी होते तें सांगणे अवघड आहे. एवढेच नव्हे तर ते केवळ अशक्य आहे. पण ह्या मार्गावर तो जसजसा पुढे पुढे जातो तसतसा त्याच्या वृत्तीत, कृतीत फरक पडत जातो. तो स्वत:चा स्वार्थ पूर्ण विसरून जातो. प्रभू परमात्म्याच्या रचनेशी एकरूप होऊन जातो व अंती परमेश्वराप्रत पोहोचतो. 'सचखंडात' पोहोचतो.

**पउडी ३७**

**करम खंड की बाणी जोरु ॥**
**तिथै, होरु न कोई होरु ॥**
**तिथै, जोध महाबल सूर ॥**
**तिन महि रामु रहिआ भरपूर ॥**
**तिथै, सीतो सीता, महिमा माहि ॥**
**ता के रूप, न कथने जाहि ॥**
**ना ओहि मरहि न ठागे जाहि ॥**
**जिन कै, रामु वसै, मन माहि ॥**
**तिथै भगत वसहि, के लोअ ॥**
**करहि अनंदु, सचा मनि सोइ ॥**
**सच खंडि वसै निरंकारु ॥**
**करि करि वेखै, नदरि निहाल ॥**
**तिथै, खंड मंडल वरभंड ॥**
**जे को कथै, त अंत न अंत ॥**
**तिथै, लोअ लोअ आकार ॥**
**जिव जिव हुकमु तिवै तिव कार ॥**
**वेखै विगसै, करि वीचारु ॥**
**नानक, कथना करड़ा सारु ॥३७ ॥**

अर्थ – **करम** - कृपा; **बाणी** - घडण; **जोरु** - जोर, बळ, ताकद; **होरु** - परमेश्वराशिवाय अन्य; **जोध** - योद्धा; **महाबळ** - बलवान, महाबळी; **सूर** - शूरवीर; **महि** - त्यामध्ये; **रामू** - राम, परमेश्वर; **रहिआ भरपूर** - रोमरोमात भरून राहिलेला; **सितो सीता** - परिपूर्ण एकरुप झालेला; काठोकाठ भरलेला; **त अंत न अंत** - त्याचा अंतच लागत नाही; **विगसै** - आनंद होतो; **सारू** - सार, सत्व; **करड़ा सारु** - लोखंडासारखे कठीण, अवघड;

अशा रीतीने मोहमायेच्या पाशातून मुक्त झालेल्या साधकावर प्रभूची पूर्ण कृपा होते. त्याच्या अंगी प्रचंड आत्मिक शक्ती उत्पन्न होते. विषय वासना त्याला यत्किंचितही प्रभावित करू शकत नाही. त्याच्या मनात परमेश्वराखेरीज अन्य विचार प्रवेशही करू शकत नाहीत. ज्याप्रमाणे कापडातील उभे आडवे धागे एकमेकांत घट्ट गुंतलेले असतात, त्याप्रमाणेच भक्त व परमेश्वर अगदी एकरूप झालेले असतात. अशा भक्तास मग कोणीही परमेश्वरापासून दूर नेऊ शकत नाही. तो परमेश्वराशी पूर्णरूपाने एकरूप झालेला असतो. ज्याच्या रोमरोमात परमेश्वर भरून राहिला आहे, असा हा साधक महाबळी शूर योद्ध्यासारखा तळपू लागतो. अशा साधकाचे काय वर्णन करू?

ह्या अवस्थेस पोहोचलेला साधक सदैव परमेश्वराच्या गुण कीर्तनात तल्लीन झालेला असतो. त्याच्या चेहऱ्यावर एक विलक्षण दैवी तेज विलसत असते. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. अशा ह्या साधकाने स्वत:च्या हृदय सिंहासनावर प्रभू परमात्म्याची प्रतिष्ठापना केलेली असते. व स्वत:चा देहभाव विसरून तो प्रभूसेवेत निमग्न होऊन जातो असा साधक जन्म-मरणापलीकडे जाऊन पोहोचतो. तो परमेश्वर रूपात एकरूप होऊन जातो. परमेश्वरच त्याचा प्रतिपाल संभाळ करतो.

सचखंडात-सत्यलोकात जाऊन पोहोचलेल्या साधकास अनंत मंडले, अनंत खंड, अनंत ब्रह्मांडांचे साक्षात दर्शन होते. ह्या सर्वांचे व्यवहार परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणेच होताना तो ते समक्ष पाहातो. प्रभू परमात्मा अत्यंत काळजीपूर्वक सर्व जीवांचा संभाळ करत आहे, ह्याची अनुभूती त्यास येते. मग असा साधक स्वत:सही प्रभू चरणी समर्पित करून त्याच्याच आज्ञेत रहाणे पसंत करतो, सत्य लोकाप्रत जाऊन पोहोचलेल्या त्या परमभक्ताचा कर्मलेख प्रभू परमात्मा स्वत:च्या हाताने लिहितो येव्हढेच नव्हे त्यास स्वत:मध्ये लीन करून घेऊन प्रसन्न होतो. अशा ह्या प्रभूमय झालेल्या साधकाचे काय वर्णन करावे? त्याचे वर्णन करण्यास सगळ्या भाषांतील सर्व शब्दही अपुरेच पडतील.



## पउडी ३८

**जतु पाहारा, धीरजु सुनिआरु ॥**
**अहरणि मति, वेदु हथीआरु ॥**
**भउ खला, अगनि तप ताउ ॥**
**भांडा भाउ, अंम्रितु तितु ढालि ॥**
**घड़ीऐ सबदु, सची टकसाल ॥**
**जिन कउ नदरि करमु तिन कार ॥**
**नानक, नदरी नदरि निहाल ॥३८ ॥**

अर्थ – **जतु** - इंद्रिय निग्रह; **पाहारा** - सोनाराचे दुकान; **मति** - बुद्धी; **धीरजु** - धैर्य; **अहरणि** - ऐरण; **वेदु** - ज्ञान; **हथिआरु** - हतोडा; **भउ** - भय; **खली** - फुंकणी; **तप ताउ** - तापवणे; **भाउ** - भाव, प्रेम; **भांडा** - मूस; **तितू** - त्या भांड्यात, त्या मुशीत; **घड़ीऐ** - घडवले जाते; **सबदु** - प्रभुनाम; **जिन कऊ** - ज्या कोणा साधकावर; **नदरि** - कृपा दृष्टी; **तिन कार** - अशा माणसाचे काम; **निहाल** - प्रसन्न, आनंदी;

वर वर्णन केलेली स्थिती सचखंडात - सत्यलोकाप्रत जाऊन पोहोचलेल्या साधकाची आहे. पण एक गोष्ट नीट ध्यानात ठेवली पाहिजे की, ही अवस्था प्राप्त करण्यासाठी निर्मल, पवित्र आचरणाची नितांत आवश्यकता असते. ह्या पवित्र आचरणाने निर्मल मनाने नामस्मरण करत करत तो साधक सत्य लोकांप्रत पोहोचतो. त्यावेळी तो परमेश्वराशी एकरूप होतो. पण ही अवस्था प्राप्त करण्यासाठी अग्नीदिव्य करावे लागते, जसे सोन्याला आपले शुद्धत्व सिद्ध करण्यासाठी करावे लागते. हे समजावून देण्यासाठी गुरु नानक देव सांगतात.

इंद्रिय निग्रह ही सोनाराची भट्टी होय, धैर्य हा सोनार आहे. बुद्धीरूपी ऐरणीवर, ज्ञानरुपी हातोड्याचे घाव सोसून आकार प्राप्त होतो. नंतर त्यास प्रेमरुपी मुशीत तापवून, नामरुपी अमृताने शुद्ध केले जाते.

सोनार प्रथम सोन्याला प्रखर जाळात, खूप तापवतो व त्या सोन्यास चिकटलेले 'हीण' जाळून टाकतो. त्याप्रमाणे साधकासही परमेश्वर प्राप्तीसाठी, सत्य लोकाप्रत पोहोचण्यासाठी खूप मोठे अग्निदिव्य करावे लागते. जीव ह्या संसारात मोह-मायेच्या बंधनात अडकलेला असतो. इंद्रियजन्य सुखांना चटावलेला असतो. अहंकाराने मत्त झालेला असतो. यामुळे तो प्रभुकृपेपासून दूर गेलेला असतो. प्रभूकृपेस पात्र होण्यासाठी प्रथम हे सर्व 'हीण' जाळून टाकणे आवश्यक आहे.

त्यासाठी इंद्रिय निग्रह आवश्यक आहे. पण ही महाकर्मकठीण गोष्ट आहे. खरोखरीच हे अग्निदिव्यच आहे. इंद्रिय निग्रह केल्याने जीवास चिकटलेले षट् विकार, अहंकार आदि 'हीण' जळून जाते व साधक शुद्ध होऊन त्यास प्रभुकृपेची ओढ लागते. तो प्रभूनामात दंग होऊन जातो. येथूनच त्याच्या जडण घडणीस सुरुवात होते.

ज्याप्रमाणे अग्निदिव्य करून शुद्ध बनलेल्या सोन्यास सोनार ऐरणीवर ठेवून हातातील हातोडीने हळूवार घाव घालून त्यास योग्य आकार देऊन सुंदर अलंकार बनवतो. त्याप्रमाणे साधकासही सद्सद विवेक बुद्धिरूपी ऐरणीवर ज्ञानरूपी हातोडीने स्वत:वर संस्कार करून घ्यावे लागतात. एवढे करूनही मन केंव्हा इंद्रिय विषयांकडे ओढ घेईल हे सांगता येत नाही म्हणून साधकास सदैव सावध असावे लागते. सोने घडणीसाठी आवश्यक तेवढे लवचिक रहावे म्हणून सोनार मधूनमधून फुंकणीच्या सहाय्याने अग्नीज्वाला त्या सोन्यावर फुंकून ते सोने सदैव तप्त ठेवतो त्याप्रमाणे साधकाला परमेश्वरावरील दृढभावरूपीं फुंकणीने मन सदैव इंद्रिय निग्रहावर स्थिर ठेवावे लागते.

अशा रीतीने शुद्ध व सिद्ध झालेला साधक सचखंडात, सत्यलोकात प्रवेश करण्यास पात्र होतो. ही उच्च अध्यात्मिक अवस्था प्राप्त होण्यासाठी साधकाचे आचरण शुद्ध व पवित्र असले पाहिजे, अनन्यसाधारण सहनशक्ती, विशाल हृदय व अध्यात्मिक बुद्धी असावी लागते. अंत:करणात परमात्म्याचा धाक, तप:पूत सेवामय जीवन व सर्व जीवांप्रती प्रेम असावे लागते.

हृदयात प्रभू परमात्म्याविषयी विशुद्ध प्रेम, इंद्रिय निग्रह, धैर्य, स्थिरमती ज्ञान, श्रम, आदि सद्गुणरूपी टांकसाळीमध्ये गुरुवाणीची मुद्रा घडवली जाते. अशी अध्यात्मिक अवस्थारूपी मुद्रा धारण करणाऱ्या साधकास परमेश्वराचे दरबारात सहज प्रवेश प्राप्त होतो.

ज्या साधकांवर प्रभू परमात्म्याची कृपा झाली. त्याच भक्तास हे अग्नीदिव्य शक्य होते.

असा साधक मग इंद्रिय निग्रह करून विषय-वासनेला दूर सारून धैर्य, विवेक, ज्ञान व प्रेम यांनी मन ओतप्रोत भरुन, अत्यंत आदरपूर्वक व संपूर्ण तन्मयतेने नामस्मरण करतो व परमेश्वराच्या त्या अनाहत नाद लहरींशी एकरुप होऊन परमेश्वराप्रत पोहोचतो व अंती परमेश्वरात लीन होऊन जातो.



**श्लोक**

**पवणु गुरू, पाणी पिता, माता धरति महतु ॥**
**दिवसु राति दुइ दाई दाइआ, खेलै सगल जगतु ॥**
**चंगिआईआ बुरिआईआ, वाचै धरमु हदूरि ॥**
**करमी आपो आपणी, के नेड़ै के दूरि ॥**
**जिनी नामु धिआइआ, गए मसकति घालि ॥**
**नानक ते मुख उजले, केती छुटी नालि ॥१॥**

**अर्थ – महतु** - मोठी; **सगल** - सगळे; **चंगीआईआ** - चांगली कामे, **बुरिआईआ** - वाईट कर्मे; **वाचै** - वाचतो; ध्यान देणे; **हजूरी** - परमेश्वराच्या दरबारात, **करमी** - कर्माप्रमाणे, **के** अनेक जीव, **नेड़ै** - ईश्वराजवळ, **के दुरि** - अनेक जण दूर केले जातात; **जिनी** - जे लोक, **धिआइआ** - ध्यान करतात; चिंतन करतात; **मसकति** - प्राप्ती, लाभ; मेहनत; **घालि** - सफल; **छुटी** - सुटतात; बंध मुक्त होतात; **नाल** - त्यांच्या संगतीत

आध्यात्मिक जीवनात ईश्वराप्रत जाण्यासाठी अडतीस पायऱ्यांची 'पउडीची' ही शिडी सांगून झाल्यानंतर ह्या मानवी जीवनाचे अस्तित्व, स्थिती व स्वरूप याचे यथार्थ वर्णन एका सुंदर रूपकाद्वारे केले आहे. मानवी जीवनाचे यथार्थ लक्ष्य काय? ते कसे साध्य होऊ शकेल हे सांगताना गुरुनानक देवजी म्हणतात, "पंचमहाभूतांपैकी 'वायू' ह्या संसारातील सर्व जीवांचा गुरू आहे. 'आप' (पाणी) हा पिता आहे. तर 'पृथ्वी' ही माता आहे. गुरुचे काम मार्गदर्शन करणे. वायू जीवांच्या चलनवलनादी क्रिया घडवून आणतो. म्हणून तो गुरू आहे. पाणी आणि जमिन यांचे संयोगाने सर्व जीव सृष्टी निर्माण झाली आहे. म्हणून ते जनक, जननी होत. दिवस व रात्र हे सेवक आहे. दिवस रात्रीच्या सहाय्याने जीवांचे सर्व व्यवहार चालतात.

परमेश्वराच्या दरबारात बसून धर्मराज सर्व जीवांचा कर्मलेख लिहीत असतो. आपापल्या कर्मानुसार प्रभू कृपेस पात्र होणे न होणे ठरत असते. कोणास तो जवळ करतो तर कोणास तो दूर लोटतो. सत्कर्मी जीव स्वत: परमेश्वराप्रत जाऊन तर पोहोचतातच पण इतर मुक्तार्थी जीवांनाही सहाय्यभूत होतात व या मोहमायेच्या बंधनातून कायमचे मुक्त होतात.

जग ही एक रंगभूमी आहे. परमेश्वराने प्रत्येक जीवास जन्मास घालताना त्याच्यासाठी काही एक काम (भूमिका) योजून ठेवली आहे. ती भूमिका, तो

जीव योग्य प्रकारे पार पाडतो की नाही ह्याची नोंद यमराज ठेवत असतो. जो जीव त्यास दिलेली भूमिका योग्य प्रकारे पार पाडतो, तो प्रभूच्या दरबारात बक्षिसास पात्र ठरतो. जो आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडू शकत नाही त्यास परमेश्वर दूर लोटतो व पुन्हा जन्म देवून आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडण्याची संधी देतो.

प्रत्येकाने परमेश्वराचे अखंड स्मरण ठेवून परमेश्वराने नेमून दिलेले कार्य योग्य प्रकारे निर्भयतेने, प्रामाणिकपणे पार पाडावे हीच त्याची इच्छा आहे. जो जीव परमेश्वरी इच्छेप्रमाणे जीवन जगतो त्याचे जीवन सार्थ होते व तो अंती प्रभूपदास प्राप्त करतो. हेच जपुजीसाहेबांचे सार आहे.

**



## समारोप

वाचक हो, 'जपुजी साहिब'च्या माध्यमातून गुरु नानकदेवजींनी आपणास मोहमायेच्या पाशातून मुक्त होऊन परमेश्वराप्रत पोहोचण्याचा नामजपाचा साधा, सोपा, सहज मार्ग उपलब्ध करून दिला आहे.

सुरुवातीस गुरु नानकदेव 'परमेश्वर ओंकार स्वरूपचैतन्यरूप असून सद्गुरुच्या कृपेनेच त्यास प्राप्त करता येते' असे सांगतात. साधकांकडून - 'किंव सचिआरा होईल किव कूडै तुडै पालि' आम्ही कोणत्या मार्गाने गेलो असता ह्या संसाराच्या मोहपाशातून मुक्त होऊन प्रभू परमात्म्याच्या कृपेस पात्र होऊ? असे विचारल्यावर नानकदेव केवळ तीन शब्दांत उत्तर देतात की, 'हुकमि रजाई चलणा' अहंकार सोडून देऊन, स्वतःस परमेश्वराचे अधीन करून त्याच्या आज्ञेत वागल्याने तुम्ही परमेश्वराच्या कृपेस पात्र व्हाल. त्यासाठी नामजप साधनेचे विस्तृत वर्णन करून त्यानी साधकास मार्गदर्शन केले आहे.

आपणास दिसते की, सारी सृष्टी ही परमेश्वराने निर्माण केली आहे पण त्याचा निर्माता अन्य कोणी नाही. तो स्वयंनिर्मित स्वयंभू आहे. त्याच्या इच्छे शिवाय कोणास काहीही मिळत नाही. परमेश्वराची कृपा संपादन करण्याआधी सद्गुरुचे मार्गदर्शन आवश्यक आहे. अध्यात्मिक गुणसंपदा हीच खरी संपत्ती आहे. अर्थेषणा, दारेषणा, लोकेषणा आदि सर्व इषणांचा त्याग करून सतसंग व नामजपाच्या मार्गाने जाऊन परमेश्वरी इच्छेप्रमाणे आपले जीवन चालवावे.

नामजपाइतकेच नामसंकीर्तनास व नामश्रवणास गुरु नानकदेवांनी महत्त्व दिले आहे. प्रभूनामाशी एकरूप झालेल्या भक्तास तर परमेश्वरी कृपेचे द्वार उघडतेच, एवढेच नव्हे तर असा भक्त इतरानांही मुक्तीचे द्वारापर्यंत जाण्यास सहाय्य करतो.

ईश्वराचे कृपेस पात्र होण्यासाठी साधकाजवळ निवृत्ती, धैर्य, निर्मलता, समानता व यथा लाभ संतोष हे पाच गुण असले पाहिजेत. तसेच काम, क्रोध,

लोभ, मोह व अहंकार ह्या विकारांवर विजय मिळविला पाहिजे.

ह्या ज़गात सत्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी अशा अनेक प्रकारचे लोक परमेश्वराला आपापल्या बुद्धीनुसार प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करत असतात.

सृष्टीचा आधार धर्म आहे व धर्माचे मूळ दया आहे. परमेश्वराने ही नानाविध सृष्टी निर्माण केली असली व तिचे सर्व व्यवहार तोच चालवत असला तरी तो त्यात लिप्त नाही. तो सर्वत्र असून सर्वांपासून अलिप्त आहे.

नामजपाबरोबरच आपले कर्मही शुद्ध असले पाहिजे. तसेच अहंकाराचा त्यागही आवश्यक आहे. त्यामुळे बुद्धिमालिन्य दूर होऊन साधक मायापाशातून मुक्त होतो व प्रभूकृपेस पात्र होतो. ह्या सृष्टीच्या पसाऱ्याचे यथार्थज्ञान प्रभू-परमात्म्याशिवाय अन्य कोणासही नाही. तसेच परमात्म्याच्या मोठेपणाची कल्पनाही त्याची त्यालाच ज्ञात आहे. परमेश्वरासारखा दानी दुसरा कोणी नाही. जो जे मागेल तो ते त्यास देत असतो. माणसाला भोगावे लागणारे सुखदुःख ही तोच देत असतो. म्हणून परमेश्वराकडे एकच मागणे मागावे - हे देवा ! मला तुझा कधीही विसर पडू देऊ नकोस. तुझ्यातच मला लीन होऊ दे.

धर्माची बाह्य लक्षणे मिरविण्याऐवजी त्याचा अध्यात्मिक अर्थ जाणून घेऊन तसे आचरण करा, असे गुरूनानक देव आपणास सांगत आहेत.

ब्रह्मा, विष्णू, महेश ही सगुण रूपे मायेचीच रूपे आहेत. तो चैतन्य स्वरूप ओंकाररूपी परमेश्वर एकमात्र सत्य आहे. बाकी सर्व सगुण रूपे त्याच्याच आज्ञेत वागतात.

त्या प्रभू परमात्म्याने ह्या सृष्टीतील सर्व जीवांच्या सर्व गरजांची पूर्तता करून ठेवली आहे. त्या योगे जीवाने आपला योगक्षेम सुचारूपणे चालवून नित्य त्या प्रभूपरमात्म्याचे स्मरण करावे. त्याची कृपा झाल्यास क्षुद्राहून क्षुद्र कीटकही प्रभूकृपेने अवघडाहून अवघड कार्यही सहज करू शकतो.

एवढे सगळे सांगून परमेश्वराप्रत पोहोचण्याच्या अंतिम चार पायऱ्यांचे गुरु नानक देव विवेचन करतात. त्यात व्यष्टीकडून समष्टी व समष्टीकडून परमेष्टीपर्यंत या साधकाचा प्रवास कसा होतो, ह्याचे विवेचन केले आहे. त्यात त्यांनी कर्मखंड, धर्मखंड, ज्ञानखंड व सचखंड ही नावे दिली आहेत.

पण ही जडण-घडण अवघड आहे. ते एक अग्निदिव्य आहे. सोनार जसे सोन्यास अग्नीत तापवून त्यावर हातोडीने संस्कार करून सुवर्णमुद्रा घडवतो



त्याप्रमाणे नामजपाच्या मार्गाने साधक प्रभूपरमात्म्याप्रत पोहोचतो व त्याच्याशी एकरूप होतो.

अशा रीतीने जपुजी साहिबच्या रूपाने गुरु नानक देवांनी आपणास मोक्षाचा मार्ग दाखविला आहे.

एक गोष्ट येथे विशेषत्वाने नमूद करावयाची आहे. ती ही की, गुरुनानक देवजी जेव्हा नामजपाची महती सांगतात तेव्हा ते निराकाराची, ओंकाराची उपासना सांगत आहेत. महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय व शिख संप्रदाय यातील मुख्य भेद हाच आहे की महाराष्ट्रातील संतांनी सगुणोपासनेवर भर दिला. पण त्यातून तेही अंती निर्गुण निराकारापर्यंत जाऊन पोहोचले. तुकाराम महाराज म्हणतात, ''देव पहायासी गेलो, देव होवोनी बैसलो'' त्यांना प्रश्न पडतो 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे ?' आणि ते लगेच उत्तर देतात 'सगुण निर्गुण एक गोविंदुरे' ह्यातून एकच बोध म्हणजे सगुणरूपाची उपासना करा किंवा निराकार ओंकार स्वरूपातील परमेश्वराची उपासना करा पण उपासना करा व मोहमायेच्या पाशातून मुक्त व्हा.

पउडी २९ मध्ये गुरु नानक देवजी सांगतात, **'घटि घटि वाजहि नाद'** हा नाद कोणता ? मानवाला प्रश्न पडला 'कोऽहं' ?.मी कोण आहे ? उपनिषदे उत्तर देतात. 'सोऽहं' मी तोच आहे. प्रत्येक देहातून प्रत्येक श्वासातून तो ओंकार ध्वनी उमटत असतो. तो अनाहत नाद, तो ओंकार, हेच मानवाचे सत्य स्वरूप आहे. व तेच परमेश्वराचे रूप आहे. त्याकडे लक्ष द्या असे गुरु नानकदेव सांगत आहेत.

आदि शंकराचार्य माणसाचे सत्य स्वरूप सांगताना म्हणतात, 'चिदानंदरूपो शिवोहं शिवोहं' मी म्हणजे हे शरीर नव्हे. मी 'चिदानंद स्वरूप' आहे. मी 'ओंकार स्वरुप' आहे. गुरु नानक देव ही आपणास जपुजी च्या माध्यमातून तोच संदेश देत आहेत.

चला, आपले सत्य स्वरूप जाणून घेऊ या आणि मोहमायेच्या पाशातून मुक्त होऊ या.

वाचक हो, आम्ही कोणी विद्वान पंडित नव्हे. दोघं साधी संसारी, प्रपंची माणसे. दैवयोगाने जपुजी साहिब हाती आले. ते भावले. आमच्या मराठी बांधवांनाही ते समजावे, म्हणून त्याचा मराठी भाषेत गद्यरुपात भावानुवाद केला. मूळ काव्य तत्कालीन पंजाबी भाषेत आहे. त्यातील अवघड शब्दांच्या अर्थासह

मूळ श्लोक प्रथम देवून मग त्याचा भावानुवाद दिला आहे. तो कितपत चांगला झाला आहे ते तुम्हीच ठरवायचे आहे. पण आपल्या मराठी संतांच्या "वेडा वाकुडा गाईन, परी मी तुझा म्हणवीन" ह्या भावाने हे धाडस केले आहे. गुरू नानकदेवांच्याच सांगीप्रमाणे, त्या प्रभू परमात्मानेच आमच्याकडून हे काम करवून घेतले आहे. ते त्याचेच चरणी समर्पित करून हे लेखन संपवतो.

॥ ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ॥

**

टीप.– कृपया आपला अभिप्राय आम्हांस प्रकाशकाचे पत्यावर कळवावा ही नम्र विनंती.



## अभिप्राय

### ॥ श्री गुरु प्रसन्न ॥

"गुरू नानक देव रचित" 'जपुजी साहिब' याचे मराठी भाषेत केलेला अनुवाद वाचला. "जपुजी साहिब" ही ३८ पायऱ्यांची (पउडी) शिडी, ही मानवी जीवनास उपयोगी आणि त्यांतील 'पउडी' २९ मध्ये "सोऽहम्" हे औपनिषदिक उत्तर दिले, ते महानीय आहे.

धर्मखंड, कर्मखंड आणि ज्ञानखंड यांच्या विभागाने साधक मानवास अत्यंत उपयोग आहे. यांत व्यष्टिजीवनाकडून समष्टि जीवनाकडे नेण्याकरिता त्याचा उपयोग चिंतनीय आहे.

परमेश्वर कसा आहे? तर गुरुदेव सांगतात "तो ओंकाररूप आहे" याचे रहस्य सांगताना ते या अनुवादात "ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१।। श्री ज्ञानराज माऊलींची ज्ञानेश्वरीची पहिली - वहिली ओवी दिली आहे.

परमात्मा "सगुण निर्गुण एक गोविंदु रे" या अभंगाद्वारा श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दिलेला निर्णय तसा आहे, हेहि 'जपुजी साहिब'च्या अनुवादात दिले आहे. "जपुजी साहिबची जन्मकथा व रचना" ही देखील उद्‌बोधक आहे.

गुरु नानक देवजींनी एरमेश्वराचे अनंतत्त्व सांगितले आहे. परमेश्वर अनंतरूपे, अनंत वेष धारण करणारा आहे. तो देश-काल-वस्तु परिच्छेदरहित आहे म्हणून अनंत आहे; आणि "अनंत" हे अनंत नावांपैकी एक नाव आहे. त्याच्या लीला ही अनंत आहेत. महाराष्ट्रांत शिख संप्रदायाचे अनुयायी बरेच आहेत. महाराष्ट्रातील गोदावरी तीरावर मराठवाड्यांत वसलेले "नंदीग्राम" म्हणजेच नांदेड, हे शहर शिख संप्रदायांतील दहावे गुरु गोबिंद सिंह यांच्या वास्तव्याने पुनित झाले आहे. याच ठिकाणी "गुरुद्वारा सचखंड साहेब" हे शिख संप्रदायाचे पावन स्थान व

धर्मपीठ आहे. असे असूनही मराठी भाषिक माणसास म्हणावी अशी ओळख नाही. गुरु ग्रंथ साहेब-मध्ये बालभक्त श्री नामदेव महाराज यांच्या ६१ रचनांचा समावेश आहे. अर्थात् तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात असलेल्या वारकरी संप्रदायाची पंजाबाशी व पुढे शिख संप्रदायाशी संबंध आहे.

शिख संप्रदायाचे सर्व धार्मिक वाङ्मय गुरुमुखी लिपींत व तत्कालीन पंजाबी भाषेत आहे. त्याचा मराठी भाषेत अनुवाद झाला नाही.

श्री गोरोवाडा व लिमये यांनी ''जपुजी साहिब ''चा मराठी अनुवाद छापून तयार केला आहे. यामुळे शिख संप्रदाय हा वेदोक्त अध्यात्मिक संप्रदायद्वारा चालत आलेल्या विचारांशी कसा जवळचा आहे, याचा परिचय करून देण्यास उपयुक्त होईल अर्थात् लेखकाची मनोगतांत व्यक्तविलेली इच्छा पूर्ण होईल असा आम्हास भरवसा वाटतो.

वाचकांनी या ग्रंथाचा संग्रह करून वरील भरवसा अन्वर्थ करावा ही अपेक्षा.

– किसनमहाराज साखरे
संपादक - ''स्वस्तिश्री''
(सांस्कृतिक - मराठी - मासिक)




## श्री गुरुग्रंथ साहिब मध्ये अंकित भक्तांची वाणी


भक्त नामदेवजी


भक्त त्रिलोचनजी


भक्त जैयदेवजी


भक्त रामानंदजी


भक्त कबीरजी


भक्त सेनजी


भक्त रविदासजी


भक्त भीखनजी


भक्त परमानंदजी


भक्त बेनीजी


भक्त पिपाजी


भक्त सूरदासजी


भक्त सधनाजी


शेख फरीदजी


भक्त धन्नाजी

याव्यतिरिक्त भाई सुन्दरजी , भाई मरदानाजी , भाई सत्ताजी , भाई बलवन्तजी आणि ११ भाटांची वाणी श्रीगुरु ग्रंथसाहिब मध्ये अंकित आहे.